University of Mumbai

शीलवृत्तफला विद्या

संभाषित

मुंबई विद्यापीठाची महाजालावरील आंतरविद्याशाखीय तज्ज्ञपरीक्षित संशोधनपत्रिका

(Peer-Reviewed Research Journal)

वर्ष ०१ ❖ अंक ०९

मे २०२१

संभाषित

मुंबई विद्यापीठाची महाजालावरील आंतरविद्याशाखीय तज्ज्ञपरीक्षित संशोधनपत्रिका (Peer-Reviewed Research Journal)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२९व्या जयंतीचे (१४ एप्रिल २०२०) औचित्य साधून अधिष्ठाता, मानव्यविद्याशाखा, मुंबई विद्यापीठ यांच्या कल्पनेतून 'संभाषण' या द्विभाषिक (इंग्रजी आणि मराठी) ऑनलाईन संशोधनपत्रिकेचा जन्म झाला. विभिन्न विद्याशाखांमध्ये समकालीन प्रश्नांबाबतच्या चिकित्सक चर्चेला गतिमान करणे आणि विचारमंथनाद्वारे संवाद प्रस्थापित करणे या भूमिकेचे अधिष्ठान 'संभाषण' संशोधनपत्रिकेच्या मुळाशी कार्यरत असलेले दिसते.

'कोरोना' हा विषय केंद्रस्थानी असलेले 'संभाषण'चे तीन अंक प्रकाशित झाले आहेत. तसेच अण्णा भाऊ साठे जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून 'संभाषण'चा ऑगस्ट महिन्याचा अंक 'अण्णा भाऊ साठे विशेषांक' म्हणून प्रकाशित करण्यात आला आहे. केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे तर संपूर्ण देशातून या विशेषांकाचे भरभरून स्वागत झाले. तसेच विविध अभ्यासशाखेतील अभ्यासकांनीही सदर विशेषांकाचे संदर्भमूल्य मान्य केले, ही अत्यंत आश्वासक बाब आहे.

'संभाषण'च्या माध्यमातून इंग्रजी आणि मराठी असा द्विभाषिक संशोधनपत्रिकेचा एकत्रित सुरू झालेला प्रवास अत्यंत आनंददायी आणि प्रेरणादायी होता. मात्र काही तांत्रिक कारणांसाठी मराठी आणि इंग्रजी भाषेतील संशोधनपत्रिका स्वतंत्रपणे प्रकाशित होणे अपरिहार्य ठरले. तसेच मुंबई विद्यापीठ हे महाराष्ट्रातील सर्वात जुने विद्यापीठ असल्यामुळे राज्यभाषेतून ज्ञानव्यवहार आणि संशोधनव्यवहाराला चालना देण्याचा मुद्दाही अग्रक्रमाने पुढे आला. याला अनुसरूनच मराठी भाषेतील आंतरविद्याशाखीय संशोधनपत्रिका स्वतंत्रपणे प्रकाशित व्हावी असा प्रस्ताव विद्यापीठाने ठेवला. हा प्रस्ताव अनेक अर्थांनी महत्त्वाचा असल्यामुळे सप्टेंबर २०२०पासून 'संभाषित' या नावाने मराठी संशोधनपत्रिकेची स्वतंत्र वाटचाल सुरू झाली आहे.

‘संभाषित’ची रूपरेषा

- सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक अशा विविध स्तरांतील महत्त्वपूर्ण प्रश्न आणि घडामोडींविषयी आंतरज्ञानशाखीय दृष्टिकोणातून सिद्ध होणारी मांडणी पुढे येण्यासाठी अभ्यासक/ संशोधकांना खुला मंच उपलब्ध करून देणे ही ‘संभाषित’ची मूलभूत भूमिका आहे.

- संशोधन आणि संशोधनात्मक लेखन हे अंतिमत: समाजासाठीच आहे. त्यामुळे या लेखनाचा एक गृहीत पैलू हा सामाजिकता आहे, या बांधिलकीतून सैद्धांतिक आणि कृतिशील अशा दोन्ही स्तरांवर काम करणाऱ्या अभ्यासक / संशोधकांचे लेखन समाजाच्या विविध स्तरापर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न आहे. तसेच विविध सामाजिक स्तरांमधील वाचकाची अभिरुची आणि वैचारिक जडणघडण सकस होण्यासाठी आवश्यक असणारा अवकाश सिद्ध करण्याची प्रेरणा ‘संभाषित’च्या मुळाशी कृतिशील आहे.

- भारताच्या बरोबरीने भारताबाहेरील मराठी भाषिक अभ्यासक / संशोधकाच्या परिदृष्टीतून जागतिक आणि भारतीय अवकाशातील विविध प्रश्नांविषयीची विश्लेषक मांडणी समाविष्ट करून घेण्यासाठी प्रयत्न करणे, हे ‘संभाषित’चे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

- संशोधनपर, भाष्यपर आणि पुस्तक परीक्षणपर असे तीन विभाग ‘संभाषित’मध्ये अंतर्भूत आहेत. या विभागांत समाविष्ट होणारे लेख सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक इत्यादी विविध क्षेत्रांशी संबंधित असल्यामुळे ही संशोधनपत्रिका समाजाच्या विविध स्तरांशी आपला वैचारिक अन्वय जोडेल, असा विश्वास आहे.

- मानव्यविद्याशाखेतील विविध अभ्यासविषयांशी निगडित सैद्धांतिक विवेचन करणाऱ्या लेखांच्या बरोबरीने समाजजीवनातील अनेकस्तरीय संदर्भांचे अभ्यासपूर्ण विश्लेषण करणाऱ्या लेखांचाही समावेश सदर संशोधनपत्रिकेत केला जाणार आहे. स्वाभाविकच, विविध अभ्यासविषयांशी संबंधित नवनवी सिद्धांतने मराठी भाषेतून पुढे आणणारा हा अतिशय महत्त्वाचा अकादमिक मंच ठरू शकेल.

शोधनिबंधांसंदर्भातील मार्गदर्शक सूचना

- लेख स्वतंत्र संशोधनावर आधारित असावेत.

- लेखांची शब्दमर्यादा साधारण पुढीलप्रमाणे असेल.
  शोधनिबंध - ३५००-४००० शब्द
  भाष्य - १५००-२००० शब्द
  ग्रंथपरीक्षण - १०००-१२०० शब्द

- शोधनिबंध देवनागरी लिपीमध्ये युनिकोड फॉन्टमध्ये असावेत.
  फॉन्टचा आकार साधारणपणे १२ ते १४ बिंदूमध्ये (point) असावा.

- संदर्भ देण्याविषयीच्या मार्गदर्शक सूचना अंकाच्या शेवटी नोंदविल्या आहेत. लेखात संदर्भ देताना या सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

- संशोधनपर लेख विषयतज्ज्ञांच्या सकारात्मक अभिप्रायानंतरच अंकात समाविष्ट केले जातात.

- लेख editorinchief.sambhashit@mu.ac.in व editor.sambhashit@mu.ac.in या दोन्ही मेलवर पाठवावेत.

प्रकाशक

अधिष्ठाता, मानव्यविद्याशाखा यांचे कार्यालय, मुंबई विद्यापीठ, आंबेडकर भवन, कलिना कॅम्पस, विद्यानगरी, मुंबई – ४०००९८.

ही संशोधनपत्रिका समाजविज्ञान, मानव्यविद्याशाखा आणि विधी या विद्याशाखांमधील सद्य:कालीन प्रश्नांना आंतरविद्याशाखीय दृष्टिकोणातून भिडणाऱ्या अभिनव आणि टीकात्मक निबंधांचा स्वीकार करते.

"मानसिक स्वातंत्र्य कोणाला आहे असे म्हणता येईल? जो आपली बुद्धी जागृत ठेवून आपले हक्क काय, आपले अधिकार काय व आपले कर्तव्य काय यांची जाणीव करून घेतो त्याला मी स्वतंत्र म्हणतो. जो परिस्थितीचा दास झाला नाही, जो परिस्थितीला आपल्या कह्यात आणण्यास सिद्ध असतो, तो माणूस स्वतंत्र आहे, असे मी म्हणतो. जो रूढीच्या स्वाधीन झाला नाही, जो गतानुगतिक बनला नाही,ज्याच्या विचाराची ज्योत विझली नाही तो स्वतंत्र आहे, असे मी म्हणतो. जो पराधीन झाला नाही, जो दुसऱ्याच्या शिकवणीने वागत नाही, जो कार्यकारणभाव ध्यानात घेतल्याशिवाय कशावर विश्वास ठेवित नाही, जो आपल्या हक्कांचा अपहार केला असता, त्याच्या रक्षणार्थ दक्ष असतो, जो प्रतिकूल लोकमताला घाबरून जात नाही, दुसऱ्याच्या हातचे बाहुले न होण्याइतकी बुद्धी, स्वाभिमान ज्याला आहे तोच माणूस स्वतंत्र आहे, असे मी समजतो. जो आपल्या आयुष्याचे ध्येय व आपल्या आयुष्याचा व्यय दुसऱ्याने घालून दिलेल्या आज्ञेप्रमाणे ठरवित नाही, जो आपल्या बुद्धीनुसार आपल्या आयुष्याचे ध्येय काय असावे व आपले आयुष्य कोणत्या कार्यात व कशारीतीने व्यतीत करावे हे आपले आपण ठरवितो, सारांश जो सर्वस्वी स्वाधीन आहे, तोच माणूस स्वतंत्र आहे,असे मी समजतो."

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर

(डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८,भाग १, पृ. ५०६)

संपादकीय मंडळ

मुंबई विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर आणि प्र-कुलगुरू प्रा. रविंद्र कुलकर्णी यांचा '**संभाषित**' ई- नियतकालिकाला असलेला आश्वासक पाठिंबा आणि सहकार्य यासाठी आम्ही आदरपूर्वक आभार मानतो.

मुख्य संपादक : **डॉ. राजेश खरात**
अधिष्ठाता, मानव्यविद्या शाखा
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

सल्लागार संपादक : **डॉ. नीतिन आरेकर**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
श्रीमती चांदीबाई हिम्मतलाल मनसुखानी महाविद्यालय,
उल्हासनगर.

संपादक : **डॉ. शीतल पावसकर-भोसले**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
सेवा सदनचे आर. के. तलरेजा महाविद्यालय, उल्हासनगर.

सहसंपादक : **डॉ. नीतीन रिंढे**
साहाय्यक प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
चेतनाचे श्रीमती कुसुमताई चौधरी कला महाविद्यालय,
वांद्रे (पूर्व), मुंबई.

डॉ. मंगेश बनसोड
वरिष्ठ साहाय्यक प्राध्यापक, अकॅडमी ऑफ थिएटर आर्ट्स
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

परीक्षण संपादक : **डॉ. अश्विनी तोरणे**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
डॉ. टी. के. टोपे रात्र महाविद्यालय, परळ, मुंबई.

साहाय्यक संपादक : **डॉ. अनंत लोखंडे**
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख
संत राऊळ महाराज महाविद्यालय, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.

प्रा. आशा हुंबे-पडळकर
व्याख्याता, मराठी विभाग
भवन्स (कनिष्ठ) महाविद्यालय, अंधेरी, मुंबई.

डॉ. नारायण गडदे
साहाय्यक प्राध्यापक, तत्त्वज्ञान विभाग
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

डॉ. नारायण भोसले
साहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

डॉ. प्रतिभा टेंबे
अभ्यागत व्याख्याता व मुक्त संशोधन-अभ्यासक
बदलापूर, जि. ठाणे.

डॉ. माधुरी पाथरकर
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग
सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे.

डॉ. लता पांचाळ
अभ्यागत व्याख्याता व मुक्त संशोधन-अभ्यासक
कल्याण, जि. ठाणे.

प्रा. संजय इंगोले
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
एल.जी.एम. महाविद्यालय, मंडणगड, जि. रत्नागिरी.

डॉ. सुनील अभिमान अवचार
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

डॉ. सोनाली वाखरडे
साहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

प्रा. विवेक कुडू
साहाय्यक प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
सोनोपंत दांडेकर कला महाविद्यालय, पालघर

रेखाटने : **डॉ. सुनील अभिमान अवचार**

मांडणी व सजावट : **प्रशांत पांचाळ**
ग्राफिक डिजायनर, कल्याण, जि. ठाणे.

तांत्रिक साहाय्य : **डॉ. लता पांचाळ**

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी मुंबई विद्यापीठ, संपादक, संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही.

संपादकीय

भय इथले संपत नाही.....

डिसेंबर २०१९ने एका अतिचिमुकल्या विषाणूने सारे जग वेठीला धरले, आजही त्या विषाणूच्या मिठीतून सुटका झालेली नाही, ही स्थिती भयावह आहे. तसे पाहिले तर जगाला आजवर साडेचार हजारच्या आसपास विषाणू सापडले आहेत आणि त्यांपैकी जेमतेम पाच-सहा विषाणूंवर औषध वा प्रतिबंधक लस उपलब्ध झालेली आहे. हे सारे विषाणू नैसर्गिकरित्या जन्माला आलेले आहेत, पण माणसाने प्रयोगशाळेत जन्माला घातलेल्या विषाणूंपैकी प्रयोगशाळेच्या नजरेतून निसटलेला हा विषाणू भयानक आहे. मानवी विज्ञानाच्या प्रगतीला लगडलेल्या अनेक अपयशांपैकी सर्वात ठसठशीत आणि मानवी संस्कृतीला ग्रासून नष्ट करू पाहणारे अपयश म्हणजे कोविड-१९चा विषाणू. त्याने घडविलेला विनाश हा मानवी संकृतीच्या ज्ञात इतिहासातील सर्वात संहारक असा विनाश आहे.

यानंतर मानव जातीचा जो इतिहास लिहिला जाणार आहे तो कोविडपूर्व आणि कोविडोत्तर कालखंड अशा विभागणीतून लिहिला जाणार आहे. एकविसाव्या शतकातील दुसऱ्या दशकाचा समारोप होत असतानाच या विषाणूने आपल्या समग्र कालखंडाला गदागदा हलवले आहे. त्याने मानव जातीला आपल्या सर्व जीवनधारणा नव्याने तपासून घेण्यासाठी आणि त्यांची पुनर्मांडणी करण्यासाठी भाग पाडले आहे. राजकारण, समाजकारण, तत्त्वज्ञान, कला, शिक्षण, उद्योगधंदा, व्यापार, भाषा, साहित्य, विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यकशास्त्र आणि अन्य सर्वच क्षेत्रांच्या अस्तित्वाचा नव्याने विचार करण्याची गरज आज निर्माण झालेली आहे. कोविडोत्तर काळात भाषेचे स्वरूप कसे असू शकेल, या प्रश्नाचा आता विचार करणे आवश्यक ठरत आहे. येथे एक निरीक्षण नोंदवले पाहिजे ते म्हणजे, कोविडच्या स्फोटामुळे मानवी आयुष्यात घुसू पाहात असलेल्या, पण मागे पडलेल्या काही अत्याधुनिक संकल्पना झपाट्याने पुढे आल्या आणि त्या दैनंदिन जीवनात रुळल्या. शासन, प्रशासन, सामाजिक संस्था आणि शैक्षणिक संस्था यांमध्ये डिजिटल माध्यमांना स्थान मिळाले. 'वर्क फ्रॉम होम' हा शब्द एखाद्या

मंत्रासारखा रुळला. ‘गूगल केलं’, ह्या मागील दहा वर्षांत रुजलेल्या वाक्प्रयोगानंतर मी ‘लेक्चर झूम केलं’, ‘वेबेक्स केलं’, ‘आपण गूगलवर भेटू या’ असे नवे वाक्प्रचार रूढ झाले. ‘वेबिनार’सारख्या संकल्पना काही महिन्यांच्या अवधीत जगभरात सर्वमान्य झाल्या. याचा एक अदृश्य परिणाम जगाला भोगावा लागणार आहे, तो म्हणजे प्रशासकीय इमारती, त्यांच्या देखभालीसाठी लागणारे कर्मचारी, कला-वाणिज्य-व्यवस्थापन अशा क्षेत्रांतील वर्ग अध्यापन (क्लासरूम टीचिंग) या संकल्पना आता मागे पडतील. वर्गांमध्ये साहित्य, कला विषय शिकवतानाही पारंपरिक भाषेबरोबरच तंत्रज्ञानाने व्यापलेली भाषा वापरायला प्रारंभ होईल. मोठ्या आस्थापनांवरील खर्च कमी करण्याकडे भांडवलवादी अर्थव्यवस्थेचा कल असतो, त्याचा अवलंब करून नजीकच्या भविष्यकाळात प्रशासनाचे, सामाजिक संस्थांचे आणि शिक्षणाचे संपूर्ण स्वरूप बदलते आहे. यामुळे कल्याणकारी राज्यसंकल्पनेला मोठा धक्का बसत आहे, ही वस्तुस्थिती स्वीकारणे अपरिहार्य ठरले आहे. परिणामी आज ह्या संस्थांचे पुनर्स्थापन, जतन आणि संवर्धन करणे अत्यंत निकडीचे ठरले आहे. हे कार्य हाती घेणे हे अपरिहार्यपणे समाजातील बुद्धिवादी वर्गासमोरील नवे आव्हान आहे.

-नीतिन आरेकर

शोधनिबंध
आणि
पुस्तक परीक्षण

संभाषित

अनुक्रम...

शोधनिबंध

भाषांतर (Translation),
भाषांतरणीयता (Translatability) आणि झाक देरिदा १४
दीपक बोरगावे

आदिवासी समूहांचे शिक्षण : धोरणात्मक तरतुदी,
आव्हाने व उपाययोजना ४४
विजय गायकवाड

पुस्तक परीक्षण

आत्मनिर्भरतेचा प्रवास : विरंगी मी! विमुक्त मी! ५५
मानसी गानू

थेरीगाथा : नवे आकलन ६३
श्रद्धा कुंभोजकर

बॉंबे बिफोर मुंबई :
एसेज इन ऑनर ऑफ जिम मॅसेलॉस ६९
विद्या प्रभू

शोधनिबंध

संभाषित

भाषांतर (Translation), भाषांतरणीयता (Translatability) आणि झाक देरिदा

दीपक बोरगावे

इंग्रजी विषयाचे निवृत्त प्राध्यापक, अनुवादक व समीक्षक

deepak.borgave7@gmail.com

संक्रमित

भाषांतर, भाषांतरणीयता आणि झाक देरिदा या दोन्ही गोष्टी एकच मानल्या जात असल्या तरी, त्या एक नाहीत. जे भाषांतरणीय आहे त्याचे भाषांतर तर होऊ शकतेच आणि जे भाषांतरणीय नाही त्याचेही भाषांतर होऊ शकते. म्हणजे भाषांतरणीयता ही दोन भाषांमध्ये आणि दोन संस्कृतीमध्ये सतत घडू शकली नाही, तरी ती घडू पाहणारी आणि म्हणून ती सातत्याने घडणारी केवळ भाषिकच नव्हे तर सर्वार्थाने एक मानवी घटित असते. चीन आणि जपान इथे भारतातून बौद्ध साहित्याचा प्रसार झाला. यात केवळ भाषांतर आणि भाषांतरणीयता एवढ्याच गोष्टी नव्हत्या. पाली आणि संस्कृत भाषांतून ही भाषांतरे भारतीय लोकांनीच केली, नंतर ती चीन आणि जपानमधल्या लोकांनीदेखील केली. हे होत असताना चिन्हे, वस्त्र, रंग, प्रवचने, विविध मूर्ती, जीवनव्यवहार, पौर्वात्य जीवनशैली आणि तत्त्वज्ञान (केवळ भाषेतून संक्रमित झालेले नव्हे, तर अनेक माध्यमातून अभिसरित होणारे), सत्ता, राजकारण अशा गोष्टी घडत असताना तत्कालीन संस्कृतीची चौकट, लोकांची जीवनदृष्टी, त्यांच्या गरजा या व अशा अगणित गोष्टी अनेक शतके सुरू होत्या, त्यातून हा बुद्धधर्म चीनमध्ये आणि जपानमध्ये संक्रमित झाला, तो तिथे बऱ्यापैकी रुजलासुद्धा. ही प्राचीन भारतीय धर्म-संस्कृती (जी आज भारतात अस्तित्वात नाही) दुसऱ्या परकीय संस्कृतीमध्ये रुजण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी घडल्या हे सर्व तपासणे, हा भाषांतर अभ्यासातील संशोधनाचा एक मोठा विषय होऊ शकतो. इथे भाषांतर अभ्यासाची साधने भाषेच्या पलीकडे जाणारी आहेत. म्हणून भाषांतर ही गोष्ट केवळ भाषेशी निगडित नसते, ती नेहमीच भाषेच्या सर्व कक्षा ओलांडणारी असते. केवळ ध्वनी (sound/speech) आणि चिन्हे (signs/symbols/ writing) म्हणजे भाषा नव्हे, ही वापरणारी माणसे, ती ज्या कृती करत आहेत त्यांचाही संस्कृतीमध्ये समावेश होतो. थोडक्यात, संस्कृती भाषावहन करत असते. आपण भाषेबद्दल जेव्हा बोलतो तेव्हा खरे तर आपण संस्कृतीबद्दल बोलत असतो.

इतिहास, संस्कृती, इतर देशांशी असलेले राजकीय संबंध, भौगोलिक परिस्थिती, पर्यावरण, भाषांचे विविध प्रकार (varieties), प्रथा-परंपरा/रूढी, विचार करण्याच्या पद्धती, स्त्री-पुरुषसंबंध, विवाहसंस्था, लैंगिक प्रश्न, श्रद्धा/अंधश्रद्धा, मिथके, लोककथा, पुराणकथा, लोकांमध्ये रूढ असलेले समज/अपसमज, या व अशा अनेक भाषांतरबाह्य घटकांचा हस्तक्षेप भाषिक अभिसरणातून होत असतो. समतुल्यता (equivalence) प्राप्त करत

असताना भाषांतरकारासमोर हे सर्व घटक अडथळे म्हणून उभे राहू शकतात. या अर्थाने भाषांतराभ्यास हा अनिवार्यपणे समग्र मानवी संस्कृतीचा आणि मानवी व्यवहाराचा अभ्यास ठरतो. म्हणूनच सर्व मानवी इतिहास हा भाषांतरणाचा इतिहास आहे, असे म्हणणे भाग पडते.

कधी कधी किंवा बऱ्याचदा भाषांतरित केल्या जाणाऱ्या संहितेमध्ये अभिप्रेत असलेला अर्थ त्या संहितेत न सापडता, तो संहितेच्या असतो.

एक उदाहरण घ्यायचे झाल्यास, मराठीतील हे वाक्य पाहा : 'त्याने डोक्यावर घर घेतले' याचे इंग्रजीत समतुल्यन साधताना, 'He took the entire home on his head' असे करता येईल का? 'त्याने डोक्यावर घर घेतले' या मराठी संहितेचा अर्थ प्रत्यक्षात या संहितेत नसून, तो संहितेच्या बाहेर आहे. 'त्याने डोक्यावर घर घेतले' म्हणजे 'त्याने एकूणच घरात भयंकर अशा प्रकारची परिस्थिती निर्माण केली आहे; तो जे करत आहे, ते त्याला काहीच समजत नाही; एकूणच या माणसाचे अवघडच आहे; काय करावं या अशा माणसाचं?' अशी अनेक अर्थविवरणे वरील इंग्रजी वाक्याची होऊ शकतात. He produced a terrible situation in the home किंवा 'He made a mess of himself' असे काहीतरी या वाक्याचे स्थानांतरण होऊ शकते. (अर्थात, हेच बरोबर आहे, असेही म्हणता येत नाही. म्हणून भाषांतरात अंतिम गोष्ट ठरवता येत नसते.) साधारणपणे हे एक असे अर्थविवरण होऊ शकेल, अजूनही अनेक अर्थविवरणे सांगता येऊ शकतात. अर्थात, हे वाक्य कोणत्या भाषिक, सांस्कृतिक आणि संहितात्मक चौकटीमध्ये (textual context) वापरले गेले आहे, यावरून त्याचे विवरण ठरते किंवा भाषांतरबाह्य घटकांचा सांगोपांग विचार करून तिथे काही निर्णय घ्यावे लागतात. प्रत्येक भाषांतरकाराच्या क्षमतेनुसार या अर्थविवरणात अनेक फारकती (differences/shifts) निर्माण होऊ शकतात. अशा परिस्थितीत समतुल्यतेबद्दल चर्चा होऊ शकते. यातील कुठलाही एक पर्याय हा अंतिम आहे, असे म्हणूनच म्हणता येत नाही.

एखाद्या संहितेचा काल्पनिक किंवा होऊ घातलेला अर्थ (hypothetical) आणि प्रत्यक्ष निरीक्षणातून उतरलेला अर्थ या शक्यतांना रूपनिष्ठ साम्य किंवा साम्यता (formal correspondence) आणि संहितानिष्ठ साम्य किंवा साम्यता (textual/contextual correspondence) असे म्हटले जाते. साधारणपणे यंत्राधिष्ठित भाषांतरात रूपनिष्ठ साम्य अधिक असते. ही टेक्नॉलॉजी आज विकासाच्या मार्गावर

आहे. यंत्र उत्तम प्रकारची समतुल्यता साधू शकेल का? याबद्दल आजही शंका आहे. गुगलवर किंवा फेसबुकवर आपणाला ह्याचा वारंवार अनुभव येत असतो. उदाहरणार्थ, यंत्राला लिंगभेद कळत नाही. एखादी वस्तू पुल्लिंगी किंवा स्त्रीलिंगी असेल त्याप्रमाणे मराठीत क्रियापदाचे रूप बदलते, (ही गोष्ट संस्कृतिसापेक्ष [culture specific] असते.) पण ही गोष्ट यंत्राला समजत नाही. म्हणून बऱ्याचदा यंत्राधिष्ठित भाषांतरात समतुल्यता हास्यास्पद होते.

संस्कृतिसापेक्षतेची एक-दोन उदाहरणे पाहिल्यास हे आपणाला समजू शकते. युरोपियन संस्कृतीमध्ये साधारणतः कोणत्याही मानवी व्यवहारात 'Thank you' म्हणण्याची पद्धती आहे. म्हणजे उदाहरणार्थ, बायकोने नवऱ्याला चहा करून दिला, तरी नवऱ्याने बायकोला 'Thank you' असे म्हणायचे असते. असे म्हटले नाही तर या संस्कृतीत या व्यक्तीचे वर्तन असभ्य आणि उद्धटपणाचे आहे, असे मानले जाते. हेच उदाहरण आपण भारतीय म्हणजेच पौर्वात्य संस्कृतीच्या परिप्रेक्ष्यात पाहिल्यास बायकोने नवऱ्याला चहा दिल्यास आणि या कृतीला नवऱ्याने 'Thank you'असे म्हटल्यास, ते हास्यास्पद होऊ शकते.

थाई (Thai) संस्कृतीमध्ये आपण जसे कोणी भेटल्यानंतर नमस्कार (greetings) करतो, तसेच 'आपले जेवण झाले का?' असा शिष्टाचार प्रचलित आहे. आता इथे संबोधित करणाऱ्याला दुसऱ्या व्यक्तीचे जेवण झाले आहे का? हे अर्थातच विचारायचे नसते. सांस्कृतिक अर्थाने (आणि अर्थातच भाषिक अंगानेसुद्धा) greetings ह्या बाबी निरर्थक (phatic) असतात. याला काही अर्थ असेलच तर, तो दोन व्यक्तींमधील होणाऱ्या संभाषणाची ती एक केवळ सुरुवात असते. विलास सारंग यांच्या *एन्कीच्या राज्यात* (१९८३) या कादंबरीतील नायक (प्रमोद वेंगुर्लेकर) आपल्या अमेरिकन मैत्रिणीसोबत एका रस्त्याकडेच्या छोट्या Food Court येथे बाहेरच खाण्यासाठी थांबतो. त्याची मैत्रीण काही खाण्यासाठी घेऊन येते आणि ती नायकाच्या शेजारी बसून स्वस्थ निवांत खात बसते. आपल्या मित्राला त्यातील काही खाऊ द्यावा, हा विचार तिला अजिबात शिवत नाही. याचे नायकाला अर्थातच आश्चर्य वाटते. पण यात आश्चर्य असे काहीच नाही, कारण ही अमेरिकन आणि पाश्चात्त्य मानसिकता आहे. पौर्वात्य संस्कृतीमध्ये ही गोष्ट घडणे/ घडण्याची संभाव्यता कमी आहे. सामाजिक साहचर्य (social corporation) नावाची जी गोष्ट आहे, ती पौर्वात्य संस्कृतीमध्ये पाश्चिमात्य संस्कृतीपेक्षा अधिक प्रमाणात उपस्थित दिसते/

आहे. आजही या गोष्टी पौर्वात्य संस्कृतीमध्ये आहेत (गेल्या दोन दशकांमध्ये मात्र, पश्चिमी संस्कृतीच्या प्रभावामुळे आणि अंधानुकरणामुळे महानगरीय सांस्कृतिक परिप्रेक्ष्य हा बऱ्यापैकी बदललेला दिसतो आहे). आपल्याकडे आपण काही खात असताना, तो खाद्यपदार्थ शेअर करण्याची वृत्ती सहज दिसून येते. (महानगरातदेखील गावाकडची माणसे अशाच पद्धतीने वागत असतात, असाच माझा स्वतःचाही व्यक्तिगत अनुभव आहे). असे वर्तन पाश्चात्त्य संस्कृतीमध्ये संपूर्णतः अनुपस्थित दिसते. टोकाचा व्यक्तिवाद आणि व्यक्तिवादी स्वातंत्र्य याला तिकडे अधिक आदरभाव आणि अधिष्ठान आहे. स्त्री-पुरुषसमतेच्या प्रश्नाची झालरदेखील याला जोडलेली आहे. आपण स्त्री-पुरुषसमतेच्या गोष्टी बोलतो (स्त्रीमुक्ती चळवळीतून या गोष्टी आपल्याकडे आलेल्या आहेत), पण त्या प्रत्यक्ष व्यवहारात जवळपास कधीच उतरत नाहीत, पितृसत्तेचे हे वास्तव/जोखड आपल्याला मान्य करावे लागेल. अलीकडच्या काळात काही प्रमाणात स्त्री-पुरुषलिंगभेदाच्या गोष्टींना अधिक महत्त्व प्राप्त होत चालले आहे. जीवनाची प्रागतिक जाणीव आणि स्त्रियांच्या अनुत्पादक श्रमाचा आदर या गोष्टी जबाबदार आहेत. पण याचे प्रमाण अत्यल्प आहे. असे परिवर्तन (महात्मा जोतीबा फुले यांनी यासाठी एकोणिसाव्या शतकात काही बीजे पेरली होती.) होण्यासाठी अशा प्रकारची भौतिक सांस्कृतिकता/सांस्कृतिक भौतिकतावाद (cultural materialism) निर्माण व्हावा लागेल; ते खूप कठीण दिसते. या अशा अनेक भेदाच्या गोष्टी सांस्कृतिक परिप्रेक्ष्यात आपणाला आढळतात. यालाच संस्कृतिसापेक्षता असे म्हणता येईल. भाषांतर आणि भाषांतरणीयता यामध्ये हा एक मोठा अडथळा असतो.

भाषांतर आणि भाषांतरणीयता यामध्ये एक वर्णनात्मक संज्ञा म्हणूनही समतुल्यतेचा विचार करता येतो. दोन भाषांमधील मूर्त वस्तूंना संबोधित करताना (Referential किंवा Denotative) बोलले गेलेले किंवा लिहिले गेलेले शब्द, यांची समतुल्यता सहज साधता येते. समतुल्यता साधण्यासाठी ही एक अत्यंत व्यावहारिक पद्धती म्हणता येईल. पण यात बऱ्याचदा द्विधा परिस्थिती डोकावत राहते. उदाहरणार्थ, 'त्याला जरा डोके कमी आहे' याची समतुल्यता साधताना, इंग्रजीत 'He has less/small head' असे अर्थातच करून चालणार नाही. 'He is a blockhead' किंवा 'He doesn't understand much' असे काहीतरी करावे लागेल. भाषांतर अभ्यासात अशा समतुल्यतेला कार्यात्मक (Functional Equivalence) किंवा

व्यावहारिक उपयोग लक्षात घेऊन प्राप्त केलेली समतुल्यता असे म्हणावे लागेल.

भाषांतराच्या माध्यमातून जगाच्या इतिहासात काही अभूतपूर्व गोष्टी घडल्या. एक उदाहरण घेऊ या. इस्लामिक संस्कृतीने किंवा त्याही पूर्वीच्या अरेबिक संस्कृतीने युरोपियन संस्कृतीवर मोठा प्रभाव टाकला होता. आठव्या शतकापासून ते तेराव्या शतकापर्यंत इस्लाम सिव्हिलायझेशन (संस्कृती/सभ्यता) ही उच्च आणि अढळपदावर होती.

संस्कृती हा शब्द इंग्रजीतील culture आणि civilization या दोन्हीही शब्दांसाठी समानार्थी म्हणून वापरला जातो. खरं तर culture या शब्दाचा अनुवाद 'सभ्यता' असाच करायला हवा. 'संस्कृती' हा शब्द 'संस्कृत' या उच्चवर्णीय भाषेवरून आलेला आहे. तो भारतीय इतिहासात रूढ झाला. हा एक सांस्कृतिक राजकारणाचा वेगळा विषय आहे.

civilization साठी 'महा'सभ्यता, 'महा'संस्कृती हे शब्ददेखील या क्षेत्रातील अभ्यासकांनी वापरलेले आहेत. 'संस्कृती' ही एका विशिष्ट भौगोलिक परिसरात राहणाऱ्या लोकांची असते. याउलट, civilization मध्ये अनेक संस्कृती नांदत असतात. 'इस्लाम/इस्लामिक संस्कृती असा जेव्हा आपण उल्लेख करतो तेव्हा, आपणाला पठाण, सिया, सुन्नी पंथ, अरब, पर्शियन, यांच्या सरमिसळ भेसळीतून निर्माण झालेलीदेखील एक इस्लामिक संस्कृती आहे असे आढळते. अशा अनेक संस्कृतींचा समुच्चय हा एका civilization मध्ये येतो. हिंदू संस्कृती असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हादेखील हाच अर्थ अभिप्रेत असतो. नाग, दस्यू, मग/मघ/मागधी, आर्य, अनार्य, यवन, मुस्लिम, महार, मांग... फार मोठी यादी आहे. वि. का. राजवाडे यांनी त्यासंदर्भात लिहिले आहे. या अशा अनेक संस्कृतीच्या समुच्चयातून हिंदू/हिंदुस्तानी civilization निर्माण होते. याला पाश्चात्त्य आणि इस्लामिक अभ्यासकांनी 'सोनेरी युग' (Golden Age) असे संबोधले आहे. बर्नड लेविस (१९९४) यांनी मानवी संस्कृती, ज्ञानप्राप्ती आणि ज्ञानसंपदा या क्षेत्रांत काही शतके इस्लाम सिव्हिलायझेशन आघाडीवर राहिली असे म्हटले आहे. विज्ञान, गणित, संख्याशास्त्र, भूमिती, खगोलशास्त्र, हवामानशास्त्र (मान्सून या नैसर्गिक घटितांचा अभ्यास सर्वप्रथम इस्लामिक अभ्यासकांनी केला होता.), वैद्यकशास्त्र, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, दारूगोळा आणि युद्धशास्त्रे, दगड, पाषाण जमिनीत कसे तयार होतात (भूगर्भशास्त्र), पर्वतशिखरांच्या निर्मितीचा अभ्यास, पाणी वितरणाचे शास्त्र (जमिनीखालून

पाण्याचे पाट तयार करून पाण्याचे वितरण करणे) या पद्धतीचा परिचय सर्वप्रथम अरेबिक संस्कृतीने करून दिला. औरंगाबादमध्ये आजही याचे अवशेष शिल्लक आहेत. शाहू महाराजांनी हीच पद्धती कोल्हापूरमध्ये अवलंबली होती (आज याला कोल्हापूरमध्ये 'पाण्याचा खजिना' या नावाने ओळखले जाते), प्रत्येक सिव्हिलायझेशनने इतिहासवाचन आणि लेखनशास्त्र, वास्तुकला, हस्तकला, संगीत... इत्यादीसंबंधी मानवी ज्ञानात भर टाकली आहे. मग ती लॅटिन अमेरिकन संस्कृती असो, वा आफ्रिकन किंवा जापनीज. युद्धशास्त्र आणि प्रवास यामध्ये इस्लामी लोकांचे योगदान फार मोठे आहे. इस्लामी लोकांनी जगभर प्रवास करून मसाल्याचे पदार्थ, कापूस, यंत्रतंत्रांचा प्रसार केला. भारतातील गणितक्षेत्रातील शून्याचा शोध हा इस्लामी प्रवाशांनीच युरोपमध्ये नेला आणि त्यामुळे गणिती अभ्यासक्षेत्रात क्रांतिकारक परिवर्तने झाली.

युरोपने ग्रीकांच्या अभिजात साहित्यातून बरेच ज्ञान प्राप्त केले होते, पण त्याहीपेक्षा अधिक ज्ञान पाश्चात्त्यांनी इस्लामिक सिव्हिलायझेशनकडून मिळवले. अरब-ॲण्डॅलुशियन्स (Arab-Andalusians) या अरेबिक संस्कृतीने निर्माण झालेल्या ज्ञानवारशाने युरोपला अंधारयुगातून (Dark Ages) बाहेर काढले. यादरम्यान बऱ्याच अरेबिक संहिता इंग्रजीत भाषांतरित झाल्या होत्या. तत्त्वज्ञानाचा विकास आणि आधुनिक विज्ञानाला धर्मसंस्था, जादूटोणा, अनिष्ट प्रथापरंपरांच्या विळख्यातून मुक्त करण्याचे धाडस युरोपला या अरेबिक संहितांच्या भाषांतरांतून लाभले, असे अभ्यासकांनी म्हटले आहे (पण दुर्दैवाने असे म्हणावेसे वाटते की, या विळख्यात आज इस्लाम परत अडकला आहे, असे वाटावे इतकी अशांतीची चिन्हे त्याला चिकटलेली आहेत). रेनेसां (सोळावे शतक) ज्याला युरोपमध्ये प्रबोधनयुग, ज्ञानविज्ञान-माहिती, मानव्यज्ञानक्षेत्रातील क्रांती असे म्हटले जाते, या पाठीमागे युरोपियन अभ्यासक, तत्त्ववेत्ते आणि विचारवंत यांचा इस्लामी संहितांचा अभ्यास होता, असे डेव्हिड लिंडबार्ग (२००७ युनुस मोहम्मद यांनी उद्धृत केल्याप्रमाणे) यांनी म्हटले आहे.*

पाश्चात्त्यांनी अनेक गोष्टी इस्लामी लोकांकडून भाषांतराच्या माध्यमातून उचलल्या आणि त्याचा प्रयोग करून आपल्या सिव्हिलायझेशनचा विकास केला, अशी निरीक्षणे अनेक इतिहास अभ्यासकांनी सप्रमाण सिद्ध केली आहेत.

संक्रमित

आधुनिक विज्ञानामध्ये अरेबिक शब्द मोठ्या प्रमाणात इंग्रजीत आले आहेत, हा एक त्याचा पुरावा आहे. उदाहरणार्थ, Algebra, Alchemy, Alkali. Nadir, Zenith, Hemistry, Alcohol, Admiral, Lute, Amber, Garble, Lemon, Orange, Coffee, Cafe, Guitar, Traffic, Sugar, Tambourine, Giraffe आणि अजून बरेच... हे सारे शब्द मूळ अरेबिक आहेत, असे इतिहासाचे गाढे अभ्यासक (Jim, A.K. (2010)) यांनी म्हटले आहे. यु. म. पठाण यांनी तर *फारसी-मराठी व्युत्पत्तिकोश* (२००८) तयार केला आहे. यामध्ये तर अरबी/फारसी भाषेतून मराठीत आलेल्या हजारो शब्दांची नोंद आहे. आपल्याला विश्वास वाटणार नाही, असे हे अनेक शब्द मराठीत इतके रूढ झाले आहेत की, ते आपणांस अस्सल मराठीच वाटतात. उदाहरणार्थ रजा, किरकोळ, बर्फ, लंगडा, लाचार, शहर, खाजगी, जिन्नस, भरवसा, ऐवजी, अखेर, मुलुख, आवारा, किनारा, तोफ, दप्तर, बुद्रुक (जुने गाव, फारसीमध्ये बुजुर्ग), हलकट, हरामखोर यासारख्या शिव्याही अरबी आणि फारसी भाषेतून आलेल्या आहेत.

या गोष्टी प्रत्येक सिव्हिलायझेशनमध्ये घडल्या आहेत, मग ती चायनीज सिव्हिलायझेशन असो किंवा जापनीज. बुद्धाचे तत्त्वज्ञान हे मूळ भारतीय आहे, पण त्याचा प्रसार आणि विस्तार चीन आणि जपान या संस्कृतींमध्ये झाला. हे सारे अर्थातच भाषांतराच्या माध्यमातून झाले. अलौकिकवादी उपनिषदांना प्रतिक्रिया म्हणून बुद्ध उदयास आला. अलौकिकवादातून लौकिकवाद, माणसाच्या जन्म आणि मृत्यू यामधल्या अवकाशातच मानवी अस्तित्व असते, मानवी जीवनातला अनित्यवाद या काही गोष्टींचा विकास बुद्धांनी मांडलेल्या तत्त्वज्ञानात दिसून येतो. एकेश्वरवाद ही संकल्पना अरेबिक, पर्शियन आणि ख्रिश्चन या धर्मातसुद्धा उपनिषदांकडून संक्रमित झालेली आहे, असे काही इतिहासकारांचे म्हणणे आहे. साडेचार हजार वर्षांपूर्वी सिंधू संस्कृतीतील लिपी/ठसे/चित्रे आणि काही वस्तूंचा जो व्यापार होत असे त्यातून ही चिन्हे आजच्या इराण या प्रदेशात जात असत. अरेबिक व पर्शियन या तत्कालीन भाषेत जी चिन्हे वापरली जात त्याचा याच्याशी निश्चितच संबंध लावता येतो. येथील उमटवलेले ठसे तिकडे उलट्या रूपात जात असत, त्यामुळे अशा प्रकारच्या चिन्हांचा वापर त्यांनी त्यांच्या लिपीतून केला असावा अशी निरीक्षणे काही अभ्यासकांची आहेत. प्राचीन भारतीय संस्कृतीचा या अंगाने अनेक इतिहासतज्ज्ञांनी अभ्यास केला आहे. प्राचीन

भारतीय संस्कृतीचा अशा चिन्हांतराच्या (भाषांतर/अनुवाद) माध्यमातून प्राचीन काळात असा प्रवास झाला असावा.[१]

ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्याचे महत्त्वाचे कार्य भाषांतरांतून होत असते. संस्कृतीच्या आदान-प्रदानाला भाषांतराने नेहमी साथ दिली आहे. या अशा अनेकविध दृष्टिकोनांतून भाषांतराकडे पाहावे लागेल. म्हणजे भाषांतरे का होतात? त्यांचे उद्देश काय असतात? हे कळू शकते. थोडक्यात, भाषांतराची व्याप्ती ही बहुविध स्वरूपाची असते, त्यामध्ये दोन संस्कृतीचे (किंवा दोनपेक्षा अधिक) हितसंबंध (आर्थिक आणि राजकीय) गुंतलेले असतात, सत्तासंघर्षाची बीजे त्यात रुतलेली असतात, हे लक्षात येत जाते.

झाक देरिदा (१९३०-२००४) यांचा प्रभाव हा गेल्या काही दशकांत मोठ्या प्रमाणावर सर्व ज्ञानक्षेत्रांवर पडलेला आहे. अगदी मार्क्ससारखाच अनेक प्रकारच्या लेखनात त्यांचाही उल्लेख होतो. मराठी अभ्यासकांमध्ये देरिदा यांच्याबद्दल फारशी कल्पना नाही, पण त्यांचा साहित्य, कला, समीक्षा आणि तत्त्वज्ञान या ज्ञानक्षेत्रांमध्ये नेमका कुठल्या कारणांमुळे उल्लेख होत असतो, याचे आकलन होत नाही. अशी संभ्रमावस्था अनेक नव्या अभ्यासकांमध्ये आणि संशोधकांमध्ये असू शकते, असे माझे आकलन आहे.

देरिदा यांच्या साहित्यावर गंगाधर पाटील, मिलिंद मालशे, हरिश्चंद्र थोरात यांनी अकादमीय पद्धतीने लेखन केले आहे. विलास सारंग आणि भालचंद्र नेमाडे यांच्या लेखनातून देरिदाबद्दलचे संदर्भ आलेले आहेत, मराठीमध्ये अनेक संशोधनात्मक आणि इतरही लेखनातून देरिदा यांचा उल्लेख होत असतो.

जॉनस् हॉपकिन्स (Johns Hopkins University, Baltimore, Maryland, US) या युनिव्हर्सिटीमध्ये १९६६ साली देरिदा यांचे एक सादरीकरण झाले; त्याचा विषय होता, 'Structure, Sign and Play in the Discourse of the Human Sciences'. देरिदांच्या या सादरीकरणामुळे साऱ्या अमेरिकन अकादमीय विश्वात खळबळ उडाली. त्यांच्या या व्याख्यानामुळे अनेक शंकाकुशंका निर्माण झाल्या. आपले (पाश्चात्त्य) तत्त्वज्ञान, आपले सारे जुने तत्त्ववेत्ते परत एकदा तपासून पाहिले पाहिजेत, ही जाणीव प्रत्येकांत निर्माण झाली.

ही एक वाचनाची नवीन पद्धत होती; प्रस्थापित संहितांचे (authoritarian texts) किंवा कोणत्याही संहितांचे पुन्हा पुन्हा अगदी

उलटदेखील अर्थनिर्णयन (interpretation) करता येऊ शकते, अशा प्रकारची ही एक नवीन वाचनपद्धती देरिदा यांनी मांडली. याच वाचनपद्धतीला 'विरचनावाद' (deconstructionism) अशी संज्ञा नंतर रूढ झाली. या सर्वांमुळे पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा पुनर्विचार केला गेला. हे सारे काही हटके आणि वेगळे असे होते; अगदी अपारंपरिक आणि वादग्रस्त, पारंपरिक दृष्टिकोनाचा पाठपुरावा करणाऱ्या व त्याला अनुसरून वर्तन करणाऱ्या लोकांना हे धक्का देणारे होते. पाश्चात्त्य तत्त्वज्ञान, धर्मसंस्था, साहित्य, कला, भाषा आणि इतर अनेक माध्यमातून म्हणजे एकूणच मानवी विचार करण्याच्या पद्धतीला प्रश्नांकित करण्याचे काम देरिदा यांनी केले. हे असे यापूर्वी कधीही झाले नव्हते. ही एक अभूतपूर्व अशी वाचनपद्धती आणि संहितेला अर्थ/अनर्थाच्या भोवऱ्यात अडकवणारी आणि त्यातून तिला बाहेर काढणारी आणि परत त्यात अडकवणारी अशी होती. याचमुळे फ्रेंच बुद्धिवादाचा एक नवा आणि विलक्षण असा अवतार म्हणून देरिदा यांचा विचार होऊ लागला. हॉपकिन्स विद्यापीठातील सादरीकरणाने अमेरिकेतील विचारविश्वामध्ये वादळ निर्माण झाले. साऱ्या पाश्चात्त्य तात्त्विक दृष्टिकोनाला, विचारविश्वाला देरिदा यांनी उलटेपालटे करून टाकले. या घटनेनंतर १९६७ मध्ये त्यांनी एकापाठोपाठ एक अशी तीन पुस्तके लिहिली; पण ती नंतर वेगवेगळ्या साली प्रसिद्ध झाली- *Speech and Phenomenon* (1973), *Of Grammatology* (1976) आणि *Writing and Difference* (1978).

आज 'विरचनावाद' (deconstructionism) ही एक महत्त्वाची चळवळ बनली आहे किंवा नाही, यापेक्षा या तत्त्वज्ञानाने एक नवीन वाचनपद्धती रूढ केल्यामुळे सर्वच संहिता संशयाने पाहण्याचे एक नवे तंत्र त्यांनी आज उपलब्ध करून दिले आहे. विचारवंत कसे विचार करतात, याबद्दलचे मोठे परिवर्तन देरिदा यांच्या विरचनावाद या तात्त्विक विचारामुळे झाले.

देरिदा यांच्या विरचनावादी वाचनपद्धतीचा (mode of deconstructive reading, जो त्यांच्या प्रमुख सिद्धांताचा भाग आहे) विचार आपल्याला येथे करावयाचा नाही. भाषांतर या विषयावर देरिदा यांचे फारसे साहित्य उपलब्ध नाही. देरिदा यांचे तीन ते चार स्रोत मला उपलब्ध झाले, पण या प्रत्येक स्रोतावर विचार करायचा झाल्यास, त्यावर स्वतंत्रपणे लिहावे लागेल इतका दीर्घ आणि व्यापक असा त्याचा गुंता आहे. या निबंधात

भाषांतरासंदर्भात देरिदा यांच्या What Is a ‘Relevant’ Translation? (2001) या लेखाचा प्रामुख्याने विचार केला आहे. त्या अनुषंगाने इथे काही विवेचन करण्याचा प्रयत्न करणार आहे. भाषेच्या अनुषंगाने त्यांनी केलेले सिद्धांतन आणि त्याचे भाषांतर आणि भाषांतरणीयता यासंदर्भात नोंदविलेली निरीक्षणे, याची चर्चा प्रामुख्याने येथे करावयाची आहे.

सर्व ज्ञान म्हणजे उदाहरणार्थ, इतिहास, मानववंशशास्त्र, वाङ्मय, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, विज्ञान याकडे उत्तरसंरचनावादी ‘संहिता’ (text/ textual) म्हणून पाहतात. सर्व ज्ञान हे संकल्पनांनी बनत नसते, तर ते संहितांतून, चिन्हांतून किंवा शब्दांतून बनते. म्हणजे ज्ञानात संकल्पना नसतात, तर शब्द असतात, असे यांचे म्हणणे आहे. संहितेतून निर्माण होणाऱ्या या ज्ञानाचे आकलन, अर्थनिर्णयन आणि अर्थांतरण सतत बदलत असते. ते कधीही बंदिस्त (fixed) नसते. फर्निदां द् सॅस्यूर (१८५७-१९१३) यांनी मांडलेल्या संरचनात्मक भाषाविज्ञानात (Structural Linguistics) हस्तक्षेप करत देरिदा यांनी अनेक आक्षेप घेतले. हाच उत्तरसंरचनावादाचा आरंभ होय. पुढे संरचनात्मक भाषाविज्ञान या ज्ञानशाखेचा उपयोग हा साहित्य, वाङ्मय, चिन्हशास्त्र (Semiotics), लोकसाहित्य (Folklore), मानववंशशास्त्र (Anthropology) अशा अनेक ज्ञानशाखांत होऊ लागला. जगातल्या सर्व भाषांमध्ये एक अमूर्त संरचना (abstract structure) असते आणि भाषेचे यादृच्छिक (arbitrariness) वैशिष्ट्य सॅस्यूर यांनी आपल्या विवेचनात अधोरेखित केले आहे, हीच गोष्ट देरिदा यांनी भाषेच्या या वैशिष्ट्याला धरून आपले काही सिद्धांतन केले आहे (अर्थात, यात बराच तपशील आणि गुंता आहे तो आपला विषय नसल्यामुळे त्याची चर्चा येथे अभिप्रेत नाही). किंबहुना, काही महत्त्वाची निरीक्षणे नोंदविणे आवश्यक आहेत. ‘यादृच्छिक’ म्हणजे भाषेतील अनेक प्रश्नांची उत्तरे आपणाला देता न येणे. चिन्हे (उदा. /क/ /ळ/, signifiers) आणि चिन्हित (/काळ/ हा शब्द याला काही मराठी भाषेमध्ये अर्थ आहे, signifieds) यांच्यामध्ये तार्किक संबंध आणि त्यातून त्याचे आकलन करता येत नाही. मराठी भाषेत /क/ किंवा /ळ/ ही चिन्हे एका विशिष्ट पद्धतीनेच का लिहिली जातात? याला काही उत्तर नाही. जर असलेच, तर हा एक सामाजिक संकेत म्हणावा लागेल किंवा मराठी भाषा बोलणाऱ्या/वापरणाऱ्या सर्व समूहाने हा ठरवलेला एक संकेत किंवा सामूहिक करार आहे, असे म्हणावे लागेल. म्हणून भाषेतून व्यक्त होणाऱ्या अर्थांतरणाच्या/ अर्थविवरणाच्या समस्या जटिल होतात.

म्हणजे एकाच भाषेतील अर्थांतरणाचे प्रश्न जर इतके जटिल असतील, तर ते दुसऱ्या भाषेत अभिसरित/स्थानांतरित करताना (भाषांतरित करताना) कोणती परिस्थिती निर्माण होऊ शकेल/शकते? याबद्दल केवळ कल्पनाच केलेली बरी. देरिदा यांचे याबद्दलचे काय विवेचन आहे, ते सारांशरूपाने येथे पाहू या.

अर्थांतरण किंवा अर्थबोधन (Interpretation) ही मूलतः एक भाषांतर कृती (an act of translation) आहे/असते, कारण भाषांतर करताना आपण दुसऱ्या संहितेत किंवा त्या भाषेतील इतर कुठल्या माध्यमात (संस्कृती) किंवा ज्ञानात्मक संज्ञांच्या (cognitive terms) आधारे ती घेऊन जात असतो. हे होत असताना काही वैशिष्ट्यपूर्ण अडथळे, प्रतिरोध हे भाषांतरणीयतेत (translatability) होत राहतात. भाषांतरणीयतेच्या प्रश्नांबद्दल वर जी काही चर्चा आली आहे, यातून एक गोष्ट स्पष्ट होते की, भाषांतर हे केवळ शब्दांच्याच माध्यमातून होणारी कृती नसते. अशा परिस्थितीमध्ये भाषांतर ही एक अर्थबोधन कृती म्हणून कितपत साहाय्यकारी ठरू शकते? विशेषतः non-textual म्हणजे जे शब्दातून व्यक्त झाले नाही/होत नाही, किंवा जे संहितात्मक नाही, अशा घटकांना भाषांतराच्या माध्यमातून आपण घेऊन जाऊ शकतो का? भाषांतराच्या आणि भाषांतरणीयतेच्या प्रश्नाबद्दल इथे आपण काय करू शकतो? हा एक तिढा आहे. इतर काही मार्गाने हा प्रश्न सोडवता येतो का? १९९६ मध्ये वल्शगन (Wolfgang) येथे Symposia "On Translatability" या विषयावर एक गोलमेज परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत देरिदा धरून बारा तज्ज्ञांनी[२] या विषयावर चर्चा केली. त्याचा अहवाल *सरफेसिज* (Surfaces, Wolfgang,1996) या नियतकालिकात प्रसिद्ध झाला आहे. देरिदा यांनी आपल्या काही सहकाऱ्यांबरोबर केलेली चर्चा आणि त्याचे संक्षिप्त विवेचन या ठिकाणी केल्यास, देरिदा यांची भाषांतर आणि भाषांतरणीयता याबद्दलची मतमतांतरे समजू शकतील.

संहितेचे अर्थबोधन होत असताना काही पूर्वगृहितके किंवा संहितेची स्थितिगती कार्यरत असते. भाषांतर ही मूलतः अर्थांतरण/अर्थनिर्णयन किंवा अर्थबोधनाची (interpretation) कृती असते. हे होत असताना ही कृती ज्या भाषेत स्थानांतरित होत असते तिथे अर्थनिर्णयनाची चर्चा होणे अधिक महत्त्वाचे असते. मग हे होत असताना अर्थनिर्णयनाची अवस्था

(conditions) काय आहे/असते? हा प्रश्न देरिदा यांना कळीचा (central question) वाटतो.

अर्थनिर्णयनाचीदेखील एक मर्यादा असू शकते. हे विशेषतः उदाहरणार्थ, एखादी भारतीय संहिता परकीय भाषेत घेऊन जात असताना हे घडू शकते. राजन गवस यांची *ब, बळीचा* (२०१३) ही कादंबरी इंग्रजीत अनुवादित करत असताना असे निदर्शनास आले की यात 'च्यायला' ही शिवी जवळपास पन्नास ते साठ वेळा आली आहे. प्रत्येकवेळा 'च्यायला'चे संदर्भ (contexts) बदलतात. या संहितेचा अर्थ अनेकदा संहितेच्या बाहेर जातो. म्हणजे, 'च्यायला' = एक खणखणीत शिवी, संताप, क्रोध व्यक्त करणारी भावना, तगमग, अस्वस्थता व्यक्त करणारी तळमळ, आनंद आणि हर्षभाव व्यक्त करणारी अभिव्यक्ती, किंवा कुठलाच अर्थ किंवा भाव व्यक्त न करणारी (empty meaning)... अशी अनेक अर्थनिर्णयनाची मालिका या विशिष्ट शब्दामध्ये ('च्यायला' abuse, swear word) मला जाणवली. कुठले एकच एक निश्चित (fixed) असे अर्थनिर्णयन यामध्ये करता येत नाही. याच कादंबरीतील किंवा गवस यांच्याच *तणकट* (१९९९) याही कादंबरीतील अशी अनेक उदाहरणे देता येतील. मग अशा वैशिष्ट्यपूर्ण परिस्थितीत काय करावे, असा एक पेच निर्माण होतो. यासाठी वल्शगन ईझर (ब्रिटिश उच्चार, Wolfgang Iser) या जर्मन भाषांतर समीक्षकाने 'recursive looping' ही एक उपाययोजना सांगितली आहे; 'recursive looping' (Wolfgang Iser 1996 : 5-6) याचा अर्थ म्हणजे परत परत होय. (recursive पुनरावृत्त) परत परत एकात एक फास अडकवत एखादी साखळी आपण तयार करत जातो, तशा प्रकारचे हे जोडकाम आहे, असे म्हणता येईल. शिंप्याने अनेक कपड्यांच्या तुकड्यांना एक-एक असे तुकडे जोडत निर्मिती करत जाण्यासारखे हे आहे.

देरिदा यांना भाषांतर आणि अर्थनिर्णयन यामध्ये एक तणाव दिसतो. विज्ञानक्षेत्रातील संहिता उदाहरणार्थ, भौतिकशास्त्र भाषांतरित करत असताना असे घडते का? हा ताण तिथे जाणवतो का? असा एक प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. मानवी संस्कृतीमध्ये असणाऱ्या अनेक श्रेणी (hierarchies in culture; इथे कुठल्यातरी संस्कृतीचे दुसऱ्या संस्कृतीवर असणारे वर्चस्वदेखील आपण गृहीत धरू शकतो), उघडपणे व्यक्त न होणारे, पण संबंधित लोकांना माहीत असलेले, सूचित आणि गर्भित असे संघर्ष असतात, युद्धजन्य परिस्थिती असते, त्यांची दाहकता ही भाषांतरामुळे मर्यादित करता

येते. म्हणजे भाषांतर आणि भाषांतरणीयता या दोन्हीही गोष्टी हा संस्कृती दाह आणि संघर्ष कमी करण्याचे कार्य (a pacifying function) करत असतात, असे देरिदा यांनी या गोलमेज परिषदेत म्हटले आहे (Derrida, Jacques 1996 : 5-6). यामुळे संस्कृती-संस्कृतींमध्ये असलेला हा भेद कमी होण्यास साहाय्य होते. एका अर्थाने भाषांतराचे हे महत्कार्यच देरिदा यांनी येथे अधोरेखित केले आहे.

परक्या किंवा अपरिचित संस्कृतीमधील इतरत्व/परत्वाचे (otherness) अर्थनिर्णयन करत असताना ते संपूर्णतः करता येत नाही, त्याची काही सदृश्य किंवा बाह्य लक्षणे, चिन्हे, किंवा खुणा यांचा विचार करून अर्थनिर्णयन करावे लागते. संस्कृतीतील इतरत्व किंवा 'पर'ची आपणास जी सदृश्य आणि बाह्य रूपे दिसतात, ती खरे तर प्रत्यक्षात अर्थनिर्णयन करत असतानाच लपली जातात, लपलेली असतात किंवा लपवली जातात. अशा वेळी मग आपण काय करतो किंवा करायला हवे? हा प्रश्न खूप महत्त्वाचा ठरतो. अर्थनिर्णयनातून हाती लागलेली सदृश्य किंवा बाह्य लक्षणे, चिन्हे, किंवा खुणा यांच्या साहाय्याने अजून एक तिसरे अंग आपल्या हाती लागू शकते. थोडक्यात, भाषांतराचे भाषांतर (translation of translation) किंवा अर्थनिर्णयनाचे अर्थनिर्णयन (interpretation of interpretation) असे होणे शक्य असते. भाषांतराला एक संहितांचा ढीग म्हणूनही ओळखता येते. पण ती केवळ संहिता (text) नसते. म्हणूनच सर्व वाङ्मयांचे स्रोत हे भाषांतरण कृतीमध्ये दडलेले असतात आणि ते परत परत भाषांतराच्या कृतीमधून व्यक्त होत राहतात. भाषांतरांतून अनेक अर्थ सातत्याने निर्माण केले जातात/होत राहतात. त्या अर्थांचे वितरण सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरणातून सतत होत असते. ते वेगवेगळ्या रूपांतून आपल्यापर्यंत पोचतात. म्हणूनच, भाषांतर ही केवळ एक संहितात्मक स्थानांतरणाची गोष्ट राहत नाही. त्याच्या मर्यादा ओलांडून ती अनेकविध अशा प्रकारच्या रूपातून व्यक्त होत राहते आणि त्याचे पडसाद हे कायम उमटत राहतात.

जे. मिलर हिल यांनी भाषांतर हे एक शाश्वत हद्दपारीमधील संहितेचे भटके अस्तित्व असते. (Translation is 'the wandering existence of text in a perpetual exile', as quoted by Ganesh Devy, 1999, pp. 182-88). या ठिकाणी पाश्चात्त्य मॅटाफिजिक्सच्या दृष्टिकोनातून पाप-पुण्याच्या संकल्पना आणि 'मूळ' (Original) ती 'खरी संहिता' आणि भाषांतर ही त्याची नक्कल (म्हणजे Fall) अशा काही गोष्टी यात अनुस्यूत

आहेत असे दिसते. हा प्रश्न आपण थोडासा बाजूला ठेवू या. पण भाषांतराच्या माध्यमातून मानवी संस्कृतीमधील भेद, श्रेणी, संघर्ष, युद्धजन्य परिस्थिती कमी कशी करता येईल, हा मुख्य प्रश्न आहे/असला पाहिजे, असे देरिदा यांचे म्हणणे आहे. यासंदर्भात देरिदा यांनी 'युद्ध' आणि 'शांती' (war and peace) ह्या प्रतिमा वापरल्या आहेत. युद्धजन्य परिस्थिती ही भाषांतराच्या माध्यमातून शांतीकडे घेऊन जाता येते. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आशयाच्या माध्यमातून मानवी जीवनाचा एक सामंजस्याचा मेळ निर्माण करता येतो किंवा टिकवताही येतो.

२००१ साली प्रकाशित झालेल्या *शिकागो जर्नल*मध्ये "What is a Relevant Translation?" या नावाचा देरिदा यांचा एक लेख आहे. खरे तर, हे त्यांचे उत्स्फूर्त असे भाषण आहे आणि ते लेखाच्या रूपात नंतर लिप्यंतर करण्यात आले आहे. अनुवादशास्त्रातील आपण तज्ज्ञ नाही हे कबूल करून, देरिदा भाषेत असलेल्या अनेकविध गुंत्यांबद्दल (multiplicity of complexes) बोलत राहतात. 'Relevant' या एकाच शब्दाच्या अनुषंगाने त्यांनी नोंदविलेली निरीक्षणे पाहण्यासारखी आहेत. What is most often called "relevant"? Well, whatever feels right, whatever seems pertinent, apropos, welcome, appropriate, opportune, justified, well-suited or adjusted, coming right at the moment when you expect it-or corresponding as is necessary to the object to which the socalled relevant action relates: the relevant discourse, the relevant proposition, the relevant decision, the relevant translation. A relevant translation would therefore be, quite simply, a "good" translation, a translation that does what one expects of it, in short, a version that performs its mission, honors its debt and does its job or its duty while inscribing in the receiving language the most relevant equivalent for an original, the language that is the most right, appropriate, pertinent, adequate, opportune, pointed, univocal, idiomatic, and so on (Derrida 2001 : 177).

'Relevant' या एका विशेषणासाठी right, pertinent, apropos, welcome, appropriate, opportune, justified, well-suited

संवादिनी

or adjusted ही अनेकविध समानार्थी विशेषणे त्यांनी दिली आहेत. थोडक्यात, त्यांच्या दृष्टिकोनातून 'Relevant translation' हा चांगल्या प्रकारचा अनुवाद म्हणायला हवा, ज्या भाषेत तो जात आहे, तिथे त्याने त्याचे काम व्यवस्थित बजावले आहे का आणि तो 'मूळ' संहितेच्या जवळ जाणारा आहे किंवा समानता (equivalence) प्राप्त करणारा आहे का? हे पाहायला हवे. पुढे ते म्हणतात, 'As a matter of fact, I don't believe that anything can ever be untranslatable-or, moreover, translatable' (Derrida 2001 : 178). अभाषांतरणीयता (untranslatability) ही गोष्ट अशक्यप्राय नसते; प्रत्येकाचे भाषांतर हे होऊ शकते. दोन भाषा, दोन संस्कृती, दोन सामाजिक आणि ऐतिहासिक सांस्कृतिक स्मरणांचे (cultural memories) ज्ञान आणि या ज्ञानाचा आधार भाषांतरकाराकडे असेल तर तो या दोन संस्कृतीतील ज्ञानाचे वहन आणि आदानप्रदान सहजरीत्या अनुवादाच्या माध्यमातून करू शकतो. शब्दार्थांच्या अनुषंगाने व्यक्त होणारा आशय (semantic content) अशा अनुवादकाला सहजरीत्या ज्या भाषेत अनुवाद पोहोचवायचा आहे (लक्ष्यभाषा संस्कृती) त्या वाचकांपर्यंत तो पोहोचवू शकतो.

प्रथमतः भाषांतर हा शब्द आहे; पण शब्दशः भाषांतराला भाषांतर म्हणता येणार नाही. देरिदा ही गोष्ट अमान्य करतात. भाषांतरात शब्दासाठी-शब्द (word-for-word) यापेक्षा दुसऱ्या पद्धती (converting, turning) वापरणे अधिक परिणामकारक ठरू शकते. शब्दशः भाषांतर पद्धतीचा (literal translation) प्रारंभ हाच अंत असू शकतो. याचबरोबर एखाद्या शब्दाचे, संकल्पनेचे किंवा भाषांतरित न होणाऱ्या घटकाचे glossing करणे म्हणजे त्याचा अर्थ तळटीप टाकून स्पष्ट करणे, त्याबद्दलचे विवरण करणे, हादेखील भाषांतराचा अंतच आहे. भाषांतरामध्ये तळटीपा देण्यापेक्षा स्रोत संहितेचा अर्थ, त्यामध्ये असलेल्या अनेक घाटांचे आणि रूपांचे परिणामकारक अभिसरण वाचकांपर्यंत पोहोचवणे, हे relevant भाषांतराचे लक्षण आहे. While indicating that the meaning and formal effects of the text haven't escaped the translator and can therefore be brought to the reader's attention, the translator's note breaks with what I call the economic law of the word, which defines the essence of translation in the strict sense,

the normal, normalized, pertinent, or relevant translation (Derrida 2001 : 181).

भाषांतरातील पारंपरिक संकल्पना आणि विचार लक्षात घेत असतानाच, या सादरीकरणामध्ये खास देरिदीयन म्हणता येईल, अशा प्रकारचे विवेचन या निबंधात प्रतिबिंबित झाले आहे. हे लक्षात घेता, भाषांतरात ही प्रक्रिया किती व्यापक आणि पुनरावृत्तीची असते, ती वंश, वंशजाणीव, धर्म, तत्त्वज्ञान, वर्ग, राजकारण, आर्थिक प्रश्न, संस्कृती, समाजकारण...असे अनेकविध मानवी पेच यामध्ये कशी गुंतलेली असते, याबद्दलची फारशी कल्पना पारंपरिक मीमांसेत (discourse) येत नाही याबद्दलची धक्कादायक, आगळी आणि अगदी नव्या प्रकारची निरीक्षणे आपल्या समोर येत जातात आणि relevant भाषांतर म्हणजे काय, याविषयी अत्यंत अपारंपरिक मते देरिदा मांडतात.

To know what a relevant translation can mean and be, it is necessary to know what the essence of translation, its mission, its ultimate goal, its vocation is (Derrida 2001 : 182).

यासाठी देरिदा यांनी विल्यम शेक्सपिअर यांच्या *The Merchant of Venice* (1951) या नाटकातील काही अवतरणे घेऊन भाषांतराचे मूलतत्त्व काय आहे (the essence of translation), त्याचे मूलभूत स्वरूपाचे असे कोणते कार्य आहे (its mission), आणि त्याचे अंतिम लक्ष्य (its ultimate goal) काय आहे/असते, याचे सविस्तर असे विवेचन केले आहे. त्याबद्दलची चर्चा थोडक्यात करू या. या नाटकातील एका प्रसंगावर देरिदा यांनी आपले लक्ष केंद्रित केले आहे. शॉयलॉक हा 'ज्यूईश'[३] व्यापारी आहे. त्याने अँटोनिओबरोबर एक कायदेशीर करार केला आहे. जर अँटोनिओने त्याला दिलेले पैसे वेळेत परत केले नाहीत तर त्याच्या हृदयाजवळचे एक पाउंड मांस (अर्थातच, त्याला जखमी करून) शॉयलॉक कापून घेईल. हा जवळपास एक प्रकारचा अँटोनिओचा खून आहे/मृत्यूच आहे. या न्यायालयात पुरुषाच्या रूपात वेषांतर केलेली प्रत्यक्षातील पोर्शिया[४] ही स्त्री, अँटोनिओची वकील म्हणून हजर होते. वेषांतर हेदेखील एक भाषांतरच आहे का? मुख्य अर्थाखेरीज इतर शब्दांचा आधार घेऊन दुसरा किंवा सूचित वा सहचारी शब्द वापरून भाषांतर करता येते का? कायद्याची भाषा ही अनेक अंतर्विरोधामुळे कायद्याच्या पलीकडे जाते (मराठीत 'कायदा गाढव आहे'

असे काहीतरी म्हटले जाते, ते याच संदर्भात असावे का?), अशक्यप्राय अशा प्रकारचे कायद्याचे एक समर्थन पुरुषाच्या रूपात वेषांतरित स्त्रीने केलेले, हेदेखील भाषांतरच? का अभाषांतरणीय (untranslatability) म्हणता येईल? का हे भाषांतराचे भाषांतर आहे? म्हणजे अजून एक प्रकारचे भाषांतर? भाषांतर हे जेवढे आवश्यक असते, तेवढेच ते अशक्यही होऊन जाते. एक अशक्यप्राय गोष्ट, न करता येण्यासारखी, कर्ज न फेडता येण्यासारखी, एक पाउंड मांस शरीरातून तुम्ही कसे काय काढून देणार? हा खून/मृत्यूच नाही का? मग भाषांतर हा मृत्यू असतो का? असला तर कुणाचा मृत्यू होतो? आणि कुणाचा पुनर्जन्म? न भाषांतरित होण्यासारखे हे असे या नाटकातील दृश्य आहे.

देरिदा यांनी यासंदर्भात चार निरीक्षणे नोंदविली आहेत.

१. इथे एक शपथ आहे; न टिकणारी आणि पूर्ण होऊ न शकणारी, एका खोट्या साक्षीचा धोका पत्करून. न फिटू शकणारे कर्ज, म्हणजे हे एक कारस्थान किंवा ही एक चाल आहे. भाषांतराचा विचार हा यासंदर्भामध्ये (context) करता येतो का? भाषांतर हे एक न फेडता येणारे कर्ज असते? का मूळ संहितेशी प्रामाणिक राहण्याची एक शपथ (an oath of fidelity) असते का? हा एक कॉन्ट्रॅक्ट, एक बंध, दिला गेलेला शब्द (promise) असतो का? हे सारे अंतर्विरोध कायद्यात असतात तसेच आहेत. शब्द न पाळता येण्यासारखी ही साम्यता (correspondence), हार्मनी, समतुल्यता (equivalence) [भाषांतराच्या संदर्भात दोन भाषा आणि दोन संस्कृती] अभिसरित न होऊ शकणारी आणि म्हणून ही शपथ न पाळता येण्यासारखी असते. अशा प्रकारची शपथ घेणे किंवा शब्द पाळण्याचे वचन देणे, हे खरे तर, न्यायालयात खोटी साक्ष देण्यासारखे नाही का?

२. भाषांतरामध्ये शब्दांच्या काटेकोरपणाला (economy as the law of translation) खूप महत्त्वाचे स्थान असते/आहे.

३. एक पाउंड वजनाचे मांस किंवा कर्ज म्हणून फेडायचे पैसे (आता शॉयलॉक पैसेही घ्यायला तयार नाही, त्याला अँटोनिओच्या शरीराचे एक पाउंड वजनाचे मांसच हवे आहे) ही आवश्यक असणारी बाब जरी असली, तरी ती शब्दशः पाळायची आणि न फिटणाऱ्या पैशाचा अव्यवहारी अशा प्रकारचा व्यवहार करायचा (भाषांतर हादेखील एक कर्जाचा व्यवहार असतो का?) यादृष्टीने भाषांतर हे एक व्यवहाराचे

चिन्ह (sign) आहे. थोडक्यात, भाषांतर हे एक कर्ज असते किंवा दिलेले वचन पूर्ण करण्यासाठीचे बंधन असते, किंवा कर्तव्य व दायित्व असते.

४. या दृश्यामधील संवाद (संवाद हेदेखील एक भाषांतराचे रूप आहे, Cicero सिसरो यांनी म्हटल्याप्रमाणे, as quoted by Derrida) म्हणजे 'मूळ' (the source text or original) खरोखरीचे रक्तमांस (literal flesh) आणि पैशाचा जो करार झाला तो (monetary sign), यामधील हे एक अशक्यप्राय असे भाषांतर आहे. शॉयलॉक हा 'ज्यूईश' ('ज्यू' हा शब्द अप्रतिष्ठित किंवा मानहानिकारक [derogatory] मानला जातो त्यापेक्षा अधिक योग्य शब्द 'ज्यूईश' हा आहे) आहे (देरिदा हेदेखील 'ज्यूईश' आहेत). शॉयलॉकचे 'ज्यूईश' असणे आणि इतर सर्वजण ख्रिश्चन असणे यात देरिदा यांना इथे एक धर्मद्वंद्व दिसते आहे. हा न्यायालयातील वाद एक प्रकारचा शॉयलॉकचे सक्तीने ख्रिश्चन धर्मात धर्मांतर करण्याचा प्रयत्न आहे, असे एक निरीक्षण या विवेचनात आहे (भाषांतर हे एक धर्मांतर म्हणूनदेखील पाहता येते?). पारंपरिक अर्थाने 'ज्यूईश' असणे, ही एक बाह्य (म्हणजे शरीर आणि अक्षर, चिन्ह या अर्थाने, the body and the letter) बाजू आहे; म्हणजे एका विधीची पूर्तता (compliance of a ritual) आणि ख्रिश्चन असणे, हे आत्मा किंवा शुद्ध आंतरिक चैतन्य (spirit) किंवा ज्ञानेंद्रिय (sense) म्हणजे थोडक्यात, ख्रिश्चन धर्म माणसाच्या आंतरिक आध्यात्मिकतेला अधिक महत्त्व देणारा, याउलट, ही गोष्ट 'ज्यूईश'मध्ये अनुपस्थित आहे, म्हणून धर्मांतराची आवश्यकता. म्हणजे भाषांतरव्यवहार हा ज्यूईश आणि ख्रिश्चन त्यांच्यामधील जणू काही अब्रहामिक वस्तू असावी असे हे प्रकरण आहे. इथेच relevance किंवा relevant translation बद्दलचा आपला मुद्दा देरिदा जोरकसपणे मांडतात.

मूळ करारामधील जे शब्द लिहिलेले होते (IOU मध्ये) [५] त्याचा शपथेवर शॉयलॉकने स्वीकार केलेला आहे. या करारातील मूळ शब्दाबरहुकूम (literally, शब्दशः) विचार केल्यास शॉयलॉकला स्वतःच्या शरीरातील एक पाउंड मांस अँटोनिओ देणे लागतो. पोर्शिया (वेषांतरित पुरुष रूपातील वकील) या एक पाउंड मांसाच्या बदल्यात करार झालेल्या रकमेच्या तीन पट अधिक पैसे दिले जावेत, असा युक्तिवाद करते. हा युक्तिवाद शॉयलॉक

नाकारतो. मूळ करारातील शब्दांशी अप्रामाणिक (खोटी साक्ष दिल्यासारखी) राहिल्यासारखा हा व्यवहार होईल (मूळ शब्दांशी अप्रामाणिक राहण्याचा व्यवहार म्हणजे भाषांतर होऊ शकते का?) असे म्हणून तो उद्गारतो :

An oath, an oath, I have an oath in heaven, Shall I lay perjury upon my soul? No not for Venice (MV 4.1. 224-26).

या उद्गारामुळे पोर्शिया मूळ करार (IOU) हा खोटा आहे, असा अनुमान काढल्याचे सोंग आणते आणि त्यामधील जे काही परत करायचे राहिलेले पैसे (due) अँटोनिओ देणे लागतो, तेही आता तो देणे लागत नाही, असा युक्तिवाद करून शॉयलॉकला व्यापाऱ्याच्या हृदयाजवळचे एक पाउंड मांस कापून घेण्याचा कायदेशीर हक्क आहे असे म्हणते. Why this bond is forfeit, And lawfully by this the Jew may claim A pound of flesh, to be by him cut off Nearest the merchant's heart. (226-29) पण हे करण्यापेक्षा शॉयलॉकने तीन पटीत दिली जाणारी रक्कम घ्यावी, व्यापाऱ्यावर दया करावी, (Take Be merciful, and take thrice the money, bid me tear the bond) अशी ती विनवतेसुद्धा. पण शॉयलॉक याला परत नकार देतो.

शपथ ही मानवी भाषेमध्येच घेतली जात असली तरी, ही शपथ भाषेच्या पलीकडे जाते. 'मी दिलेल्या वचनाला/शब्दाला जागणारा माणूस आहे आणि माझेच शब्द मी फिरवणार नाही', असे शॉयलॉक म्हणत आहे. खोटी साक्ष देते ही गंभीर पापकृती आहे. भाषांतरामध्ये याला 'मूळ शब्दांशी एकनिष्ठ राहणे' (fidelity/faithful to the source text) असे म्हटले जाते. ही भाषांतराची 'शपथ' (oath) आहे किंवा भाषांतरामधील हा 'करार' (bond) आहे. शेक्सपिअर यांचे हे नाटक म्हणजे या 'शपथ' किंवा 'करारा'ची अविश्वसनीय वाटावी अशी कथा आहे. या अपूर्व करारातील विनिमय मूल्यांचे (exchange-values) भाषांतर होऊ शकत नाही. म्हणजे, शॉयलॉकला 'पैशाचे' स्थानांतरण/रूपांतरण 'एक पाउंड मांस'मध्ये करता येत नाही. भाषांतरामध्ये हे विनिमय मूल्य फार महत्त्वाचे असते. कशाच्या तरी बदल्यात काहीतरी प्राप्त होऊ शकते; म्हणजे प्रतीकात्मक अर्थाने, या ठिकाणी शॉयलॉकला 'पैशाच्या' ठिकाणी अँटोनिओचे 'एक पाउंड मांस' मिळणे दुरापास्त आहे. म्हणून, भाषांतर ही एक अशक्यप्रायच गोष्ट असते. दोन भाषांमधील होणारा हा व्यवहार केवळ भाषिक नसल्यामुळे आणि तो

सांस्कृतिक व बऱ्याच अंगाने जात असल्यामुळे, तो जवळपास अशक्य होतो. तरीही भाषांतरे होऊ शकतात; करार/शपथ/वचन (स्त्रोत भाषा) ही पाळून किंवा न पाळतादेखील हे भाषिक व्यवहार पूर्ण करता येतात/केले जातात. देरिदा यांचे या अर्थाने, 'भाषांतर' ही गोष्ट 'अशक्य' आणि त्याचबरोबर 'शक्य' ही असू शकते. म्हणजेच, भाषांतरांच्या 'विनिमय मूल्यां' चे विनिमय/आदान प्रदान/देवघेव होणे जसे होऊ शकत नाही, तसेच ते होण्याच्या शक्यता दुर्मीळ असतात, असेही म्हणता येत नाही.

सुरुवातीला, पोर्शिया करारामध्ये असलेल्या या सर्व गोष्टी अँटोनिओला मान्य करायला लावते; तो ते सारे मान्य करतो. जी गोष्ट तो नाकारत असतो, ती तो इथे मान्य करतो, हे लक्षणीय आहे. आरशात असलेली व्यक्ती आपणच असतो. खरे तर भाषांतरात साधारणपणे हेच तत्त्व वापरले जाते. मग पोर्शिया अँटोनिओच्या कबुलीनंतर शॉयलॉकला दया दाखवण्याचा/माफ करण्याचा आदेश देते (Then must the Jew be merciful.) इथे सर्वसाधारणपणे ज्यू/जूईश समाजाला उद्देशून हे सर्वनाम म्हणून आले आहे. इथे ख्रिश्चन सत्ता आणि ख्रिश्चन राज्य (the Christian power and the Christian State) आणि ज्यू/ज्यूईश यांच्यातील धर्मयुद्धाच्या खूणा आहेत. संपूर्ण ज्यूईश आणि पाश्चात्त्य यांच्यातला 'क्षमा/याचनेचा तात्त्विक इतिहास' समोर उभा राहतो... आर्थिक, श्रममूल्य, व्यापारी, पोटार्थी, बाजारू वृत्ती, माफी, क्षमा, बक्षिसे, प्रलोभने, व्यवस्था, वरवरच्या बाह्य शब्दांतून, चिन्हांतून व्यक्त झालेले अर्थ आणि त्याचबरोबर उदात्तता, गुणवत्ता, श्रेष्ठता वगैरे अर्थही उभे राहतात. वास्तविक पाहता, हा भाषांतराचाच इतिहास आहे. ज्यू/ज्यूईश यांनी क्षमा/याचना करायला हवी; ख्रिश्चनाने नाही. हा अर्थ इथे अभिप्रेत आहे. ख्रिश्चन किंवा कॅथॅलिक्सने नेहमी क्षमा का मागावी? या जगात सगळीकडे पाप भरून राहिले आहे, असेच येशू ख्रिस्ताला वधस्तंभावर प्राण सोडत असताना वाटले होते. शॉयलॉकला पोर्शियाचे म्हणणे समजत नाही आणि तो आपला आग्रह कायम ठेवतो : In virtue of what obligation, what constraint, what law must I be merciful?

दया/क्षमा या गोष्टीं श्रेष्ठ आहेत, असे पोर्शिया म्हणते. त्याचे वैश्विक महत्त्व, मानवी जगामध्ये असलेले अविश्वसनीय किंवा दैवी स्थान, त्याचे सार्वभौमत्व... सर्व मानवी मूल्यांचा पराभव करणारे आहे वगैरे गोष्टी ती सांगते. या नाटकातील पोर्शियाचे हे वक्तव्य दीर्घ आणि केवळ ग्रँण्ड आहे. दया/क्षमा ही अहेतुक आहे/असते; न मागितलेली आहे/असते. ती एक सार्वभौमसत्ता

आहे; कदाचित सार्वभौमसत्तेच्याही वर आहे. ती अनुभवातीत असते; अलौकिक असते; दैवी असते, किंवा ती मानवात वसणारी अतिमानवीय ताकद असते. दया/क्षमेच्या या व्यवहाराला म्हणूनच कोणाच्याही मान्यतेची आवश्यकता नसते.

एक भाषिक व्यवहार म्हणून, ही दोन संभाषिते (discourses) एकमेकांना प्रतिबिंबित करतात. एक संभाषित शॉयलॉकचे आणि दुसरे पोर्शियाचे; एक ज्युईश/ज्यू आणि दुसरे ख्रिश्चन. दोघेही आपापली बाजू मांडतात. मात्र, पोर्शियाच्या कायदा-संभाषितात ख्रिश्चन धर्माची अस्मिता दडलेली आहे. शपथ/क्षमा (the oath, forgiveness) या गोष्टी मानवी भाषांच्या पलीकडे जाणाऱ्या आहेत. कायद्यामध्ये अन्युस्यूत असलेले मानवी हक्क आणि कर्तव्ये, हेही शपथ/क्षमा यांच्या पलीकडे असतात. म्हणून पोर्शिया म्हणते की, ‘क्षमा’ हे कायदा/न्याय्य (just) याच्या पलीकडे जाणारे आहे. थोडक्यात, दया/क्षमा याची ताकद भाषेच्या आणि कायद्याच्या पलीकडची आहे. हे सारे एखाद्या प्रार्थनेसारखे (prayer) आहे. प्रार्थनेचा गाभा हा दया/क्षमा यांच्याशी संबंधित आहे; कायदा आणि सत्ता याच्याशी नाही. प्रार्थना आणि क्षमा यांचे सार आणि मूळ एकच आहेत.

मग भाषांतराचे ‘शक्य’ आणि ‘अशक्य’ संभाषित काय असू शकेल? याला प्रार्थनेचे संभाषित म्हणणे शक्य आहे? का प्रार्थनेवर आधारलेली दुसरी एक प्रार्थना? क्षमा ही प्रार्थना आहे आणि ती आशीर्वादात्मक आहे. याच्या दोन बाजू आहेत; एक, जो यासाठी विनंती करतो (शॉयलॉक/ज्यू) आणि दुसरी, जो याला मान्यता देतो (ख्रिश्चॅनिटी).

पण प्रत्यक्षात हे मात्र, सारे शॉयलॉकला घाबरवण्याचे ढोंग/फसवेगिरी असते; युक्ती आणि हुशारीने केलेल्या या योजना आणि डावपेच असतात. शॉयलॉकला दरिद्री बनवत असताना, त्याच्या आवाक्यातील सर्व संपत्ती काढून घेतली जात असताना, त्याला ही उदात्त क्षमेची दैवी कथा त्याचे लक्ष विचलित करण्यासाठी सांगितली जाते. त्याचे लक्ष दुसरीकडे वेधले जावे म्हणून हा डाव रचला जातो आणि परिणामी, त्याला क्रूर शिक्षा ठोकता यावी, हा इरादा या पाठीमागे असतो.

शॉयलॉक याचा निषेध करतो, तक्रार करतो, मला न्याय मिळाला पाहिजे म्हणून कुरकुरतो. शॉयलॉक आपले म्हणणे मागे घेत नाही. मग पोर्शिया शॉयलॉकची मागणी मान्य करते, पण.... you know it well: the challenge to cut flesh without shedding one drop of blood...

रक्ताचा एक थेंबही न पडता तुला हे एक पाउंड मांस घेता येईल. आणि 'भाषांतराच्या या व्यवहारात' (translation of transaction) शॉयलॉक सर्व काही हरवून बसतो. त्याचा पैसाअडका, एक पाउंड वजनाचे मांस आणि त्याचा धर्मही तो हरवून बसतो.

That thou shalt see the difference of our spirit
I pardon thee thy life before thou ask it:
For half thy wealth, it is Antonio's,
The other half comes to the general state,
Which humbleness may drive unto a fine.
[MV 4.1.264-69]

ख्रिश्चॅनिटी, ख्रिश्चन भाषा या 'भाषांतरित व्यवहारात' शॉयलॉकला अडकवले जाते. म्हणजे, 'ज्यू' शॉयलॉकचे ख्रिश्चन होणे असे हे प्रकरण आहे. हे एक सक्तीचे धर्मांतर आहे.

कायद्यात असलेला हा करार शॉयलॉकला पूर्ण करता येत नाही, म्हणून त्याला जबर शिक्षा देण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य न्यायालयाकडे असतानासुद्धा, त्याच्यावर दया दाखवून त्याला क्षमा केली जाते. [शॉयलॉक आपल्याला शिक्षा होत असेल तर न्यायालयाने आपल्यावर दया दाखवू नये, क्षमा करू नये असे म्हणतो]. यातून अजून एक ढोंग समोर येते. शॉयलॉकला संपूर्णतः निर्धन आणि भिकारी बनवून त्याची सर्व संपत्ती पैसा-अडका जप्त करून, ज्यू समाज आणि लोकांबद्दल ख्रिश्चन धर्म हा किती उदात्त आणि उदारमतवादी आहे, याचे हे प्रदर्शन. दया/क्षमा/शांती, सार्वभौमत्व या संभाषिताची/ भाषिक (म्हणजेच भाषांतराची) व्यवहाराची ही चाल, हा एक लबाडीचा खेळ खेळला जातो.

अशा या भयानक अवस्थेत जिथे जिवंतपणी मरणाच्या यातना भोगण्यापेक्षा प्रत्यक्ष मरणे, हे शॉयलॉक अधिक पसंत करतो :

You take my house, when you do take the prop That doth sustain my house: you take my life When you do take the means whereby I live (MV 4.1.270-73).

आणि मग रंगमंचावरून ज्यू अदृश्य होतो; ज्यू शिल्लक राहत नाहीत. त्यांचे धर्मांतर होते; ते सारे ख्रिश्चन होतात.

या नाटकातील नंतरच्या एका अवतरणावर देरिदा आपले लक्ष केंद्रित करून भाषांतर, आणि relevant भाषांतर या समस्यांवरील विवेचन करून काही निष्कर्षापर्यंत येऊन पोहचतात. खालील अवतरण पहा :

It is enthroned in the hearts of kings, It is an attribute to God himself; And earthly power doth then show likest God's When mercy seasons justice. यातील, "When mercy seasons justice" या वाक्यांशाला धरून त्यांनी काही निरीक्षणे नोंदवली आहेत. शाश्वत शक्ती किंवा सत्ता (earthly power) ही ईश्वरासमान असते आणि याचाच अर्थ 'mercy seasons justice'. व्हिक्टर ह्युगो यांनी 'seasons' या शब्दाचे भाषांतर 'tempers' असे केले आहे. ही निवड फार काही योग्य म्हणता येणार नाही, असे देरिदा यांना वाटते. 'seasons' म्हणजे एकमेकांत मिसळणे, परावर्तित व्हायला मदत करणे, एखादी गोष्ट थोडीशी बदलणे, किरकोळ बदल किंवा दुरुस्ती व्हायला मदत करणे, स्वयंपाक घरातील रेसिपी, खाद्य पदार्थांना चव आणण्यासाठी काही मसाले वगैरे मिसळणे, वगैरे वगैरे.

व्हिक्टर ह्युगो यांचे भाषांतर 'tempers' हे अमान्य करत (तरीदेखील, ते फार काही वाईट भाषांतर नाही असे गृहीत धरून) ते relevant भाषांतर नाही, असे ते म्हणतात आणि 'seasons' या शब्दाचे 'releve' असे भाषांतर पसंत करतात. जेव्हा दयेला (mercy) उंचावले जाते, नको तेवढे महत्त्व दिले जाते किंवा आत्मिक किंवा 'स्व' पातळीवर नेले जाते तेव्हा न्याय (justice or the law) ही गोष्ट टिकविण्याच्या प्रयत्नात ती नाकारली जाते. म्हणजे थोडक्यात, दयेचे माध्यम न्याय ही गोष्ट नष्ट करते.

देरिदा यांनी यासंदर्भात तीन समर्थने दिलेली आहेत.

१. Relever या शब्दातून रेसिपी आणि पाकशास्त्रातील अर्थ व्यक्त होतो. एखाद्या खाद्यपदार्थाला मसाले वगैरे घालून चव आणणे, पहिल्या चवीला थोडेसे बदलून नवीन चव निर्माण करणे. म्हणजे हे होत असताना जे काही एतद्देशीय होते, त्याची तीव्रता कमी करून एका नवीन लागवडीची (cultivation) चव उत्पन्न करणे. दया (mercy) न्यायाची चव बदलत असताना ती टिकवून ठेवते. मग दया आणि न्याय यांच्यात फारसा फरक राहत नाही. यांच्यात जवळपास साम्यता (correspondence) निर्माण होऊ लागते. दुरुस्तीच्या आणि उन्नतीच्या माध्यमातून, धर्मांतरित होऊनदेखील, हे धर्मांतरित न होण्यासारखे असते. न्याय आपला आशय (चव) कायम टिकवून ठेवत असतो. यात मुक्ती नसते.

२.	सत्ता, राजा, शाश्वत शक्ती वगैरे या पलीकडे Relever हा शब्द उन्नती, उंचावले जाणे अशा अर्थाचे भाव परिणामकारकरीत्या व्यक्त करतो. सामाजिक, सांस्कृतिक अर्थाने दया ही 'न्याया'ला उदात्तीकरणाकडे किंवा त्याचे अस्तित्व अगदी फिकट करते, नाहीसे करते.

३.	राजकीय आणि धार्मिक संघर्ष असेदेखील कंगोरे या ठिकाणी आहेत. ईश्वराच्या जवळपास जाणारे राजाचे सार्वभौमत्व. ख्रिस्ती धर्माप्रमाणे राजवंश आणि उदात्तता, पृथ्वीवरील शाश्वत जग आणि स्वर्ग अनेक गोष्टी यामध्ये येऊ शकतात. ख्रिस्ती धर्माचा युक्तिवाद किंवा कपट कटकारस्थान म्हणून शॉयलॉक एक पाउंड मांसाचा आग्रह कायम ठेवतो, ही शायलॉकची कृती देरिदा यांना कौतुकास्पद वाटते (देरिदा हे ज्यू आहेत, हे येथे लक्षात ठेवले पाहिजे). याचे एक कारण असे असावे की, आपले मूळ (एतद्देशीयता, blood and flesh) टिकवावी, असे शॉयलॉकला वाटते. वॉल्टर बेंजमिन (१८९२-१९४०) यांनी भाषांतराच्या माध्यमातून संहितेला दीर्घ आयुष्य लाभते, ती जगत राहते, एवढेच नव्हे तर तिच्या मृत्यूनंतरही तिला मृत्योत्तर (life after death किंवा after-life) जीवन प्राप्त होते, असे म्हटले आहे (Benjamin 2009).

भाषांतरात अर्थाचे वहन कसे होते/कसे केले जाते, याचबरोबर कसे होत नाही/कसे केले जात नाही यावरून भाषांतराचे स्थान, किंमत, सत्याचे जतन, अर्थाचा अन्वय या व अशा गोष्टींचा relevance ठरत जातो. अर्थ घडवण्याचे काम भाषांतर करत असते, ही गोष्ट अर्थातच अत्यंत उघड आहे. अर्थ हे एक मूल्य म्हणून, एक संकल्पना म्हणून स्वीकारले तर... म्हणजे एका अर्थाचा अजून एक दुसरा अर्थ; 'अर्थाचा अर्थ' (meaning of meaning), हा जपून ठेवलेला, जतन केलेला अर्थ भाषांतराच्या शोकात्म अनुभवातून जन्म घेत असतो. भाषांतर हे एक शोकात्म आणि एकनिष्ठ स्मरण आहे (mournful and faithful memory), या अनुभवाची ती शक्यता आहे. पण कशापासून काय मुक्त केले जात आहे? अर्थाला शरीर प्राप्त करून देणे, हे भाषांतराचेच प्रमुख कार्य असायला हवे.

वर केलेली सर्व चर्चा भाषांतर या संभाषिताबद्दल, एकूणच मानवी भाषाव्यवहाराबद्दल एक वेगळाच आणि अपारंपरिक दृष्टिकोन देणारी आहे. देरिदा यांना Relevant (योग्य, समर्पक, प्रसंगोचित) भाषांतर याबद्दल नेमके काय म्हणायचे आहे? Relevant भाषांतर होण्याच्या शक्यता असतात का?

संवादसेतू

असे भाषांतर होऊ शकते का? याचे उत्तर ‘होय’ आणि ‘नाही’ असे दोन्ही पद्धतीने द्यावे लागेल. ही परत एक ‘खास देरिदीयन’ पद्धत म्हणता येईल. लबाडी, धूर्तपणा, भ्रष्टाचार, फसवणूक, नाडलेपणा, हितसंबंध, स्वार्थ, वर्चस्व, सत्तेचे राजकारण, हिंसा, लढाया, युद्ध, धर्मांधता, अज्ञान, दारिद्र्य, मागासलेपणा, अत्याचार; आपल्याकडच्या गोष्टी लक्षात घेता जात, जातीमधल्या जाती आणि उपजाती, वर्ण, श्रेणी, जातीय/जमातीय दंगली, सामूहिक बलात्कार, विशिष्ट जाती/धर्माच्या लोकांना लक्ष्य बनवून केलेला भयंकर संहार, जीवघेण्या धमक्या... अशा कितीतरी गोष्टी Relevant भाषांतर होण्यासाठी अडथळे म्हणून उभ्या राहतात, त्याचबरोबर या अडचणींवर आणि समस्यांवर मात करण्याची क्षमता असणारे भाषांतरकारही असतात. तरीही, या अशा संघर्षातून काही भाषांतरे फसतात आणि काही यशस्वी म्हणूनही उभी राहतात. भाषांतराचे व्यवहार म्हणून मानवी इतिहासात महत्त्वाचे ठरलेले आहेत.

कोण कसली भाषांतरे करत असतात? ती कोण प्रसिद्ध करतात? त्यांना फंडिंग कोणाचे असते? ती Relevant भाषांतरे असतात/होतात, का केवळ लोंबकळत ठेवली जातात? गेल्या दशकभरात आपल्याकडे धार्मिक साहित्याची फार मोठ्या प्रमाणात भारतीय भाषांमध्ये भाषांतरे सुरू आहेत. चित्रपट, टेलिव्हिजन, सिरियल्स, मल्टिमीडिया, संकेतस्थळे, गुगलसारख्या अनेक संकेतस्थळांवर वेगवेगळ्या स्वरूपाच्या माहितीवजा आणि ज्ञानवजा हजारो संहिता रोज लिहिल्या जातात, हजारो लाखो व्हाट्सअप ग्रूपवर रोज धुमाकूळ सुरू असतो... हे सर्व का होत आहे? याला कोणाचा वरदहस्त आहे का? राजकीय-सांस्कृतिक राजकारण यात हस्तक्षेप करत असते का? हे लक्षात आल्यानंतर इथे Relevant भाषांतराचा प्रश्न आपोआपच आकळायला लागतो.

भाषा ही मुळातच वाहती, सतत बदलणारी, परिवर्तनशील, नेहमी वेगवेगळ्या अर्थांना कवटाळणारी असते. शब्दांचे ढिगावर ढीग असतात, इतक्या हजारो वर्षांपासून हे शब्द आपण वापरत आलो आहोत, त्याचे वेगवेगळे अर्थ, अर्थांतरणे, अर्थविवरणे... खरे तर, वापरून वापरून हे शब्द चोथा झालेले असतात, निरर्थक; उसातील सर्व रस काढून घेतलेला आणि उरलेला चोथा वाटावा असे. पुन्हा पुन्हा या शब्दांना वापरण्याचे, पुनरावृत्तीचे, त्यांना सतत नवे अर्थ निर्माण होण्याचे / प्राप्त होण्याचे हे लक्षण खास भाषेचे आहे. पुनर्वाचनातून म्हणूनच या वापरलेल्या शब्दांतून पुन्हा पुन्हा नवे अर्थ

प्राप्त होतात. यालाच देरिदा यांनी विरचित वाचनपद्धती (deconstructive reading) असे म्हटले आहे. असे असले तरी, भाषा समाजातील सर्वंकष मानवी व्यवहाराला चिन्हित करत असते. एका संस्कृतीतील हे अनेकपदरी भाव दुसऱ्या संस्कृतीला समजण्यापलीकडचे असतात, तिथे ते घेऊन जात असताना (म्हणजे भाषांतर) Relevant भाषांतर कसे करायचे/ हे कसे होते? म्हणजे दोन्ही संस्कृतीतील तत्त्वज्ञान, इतिहास, धर्मकारण, अर्थकारण, समाजकारण, राजकारण, मानववंश, मानसशास्त्र, मनोवैज्ञानिक दृष्टिकोन, कला, संगीत, गीत, चित्र, अशा कितीतरी मानवी चिन्हित (अर्थ) गोष्टींना लक्षात घेऊन, उत्तम भाषांतर करता येते, असा एक दिलासा देरिदा देतात असे वाटते.

भाषांतर हे प्राचीन काळापासून सतत घडत आलेले एक मानवी संस्कृतीतील घटित आहे. अनेक श्रेणी (hierarchies in culture) उघडपणे व्यक्त न होणारे, पण संबंधित लोकांना माहीत असलेले, सूचित आणि गर्भित असे संघर्ष असतात, युद्धजन्य परिस्थिती असते, त्यांची दाहकता ही भाषांतरामुळे मर्यादित करता येते. म्हणजे भाषांतर आणि भाषांतरणीयता या दोन्हीही गोष्टी हा संस्कृतिदाह आणि संघर्ष कमी करण्याचे कार्य (a pacifying function) करत असतात. एका अर्थाने भाषांतराचे हे महत्कार्य आहे.

शेक्सपिअरच्या एका नाटकातील दृश्यावरून मानवी व्यवहारांचे किती क्लिष्ट आणि खोलवर आकलन करून घेता येते. मानवी व्यवहार हे सरळ साधे नसतात, त्यात अनेक गोष्टी सामावलेल्या/गमावलेल्या असतात; अगदी फसवणुकीपासून धर्मांतरापर्यंत. योग्य भाषांतरासाठी यातील सम्यक गोष्टींचे आकलन करून घेणे आवश्यक असते, असा एक निष्कर्ष यावरून काढता येईल, असे वाटते.

टीपा

१. इतिहास संशोधक आणि अभ्यासक रवींद्र इंगळे चावरेकर यांच्याशी ज्या चर्चा झाल्या त्यातून उमगलेली ही निरीक्षणे आहेत.

२. Wolfgang Iser, Hazard Adams, Ernst Behler, Hendrick Birus, Jacques Derrida, Murray Krieger, Hillis Miller, Ludwig Pfeiffer, Bill Readings, Ching-hsien and Wang Pauline Yu

participated in this Roundtable Discussion. The discussion was held on, "On Translatability".

३. 'ज्यूईश' धर्म म्हणून जुडाईझम, अॅब्रहमिक, मोहम्मदीयन अशी याची अनेक रूपे आहेत. 'ज्यूईश' लोकांनी ख्रिश्चन धर्मामध्ये धर्मांतर केल्याचा मोठा इतिहास आहे. वास्तविक, बायबल हा धर्मग्रंथ मुळात 'हिब्रू' या भाषेत लिहिला गेला आणि नंतर त्याची अनेक भाषांतरे जगातल्या जवळपास सर्व प्रमुख भाषांमध्ये झालेली आहे. ही भाषा 'ज्यूईश' लोकांची आहे आणि याच लोकांनी मोठ्या प्रमाणात ख्रिश्चन धर्मामध्ये जाणे हा मोठा विरोधाभास आहे. त्याला बरीच राजकीय कारणे आहेत. ज्यूईश लोक हे मूलतः भटके राहिले. प्रामुख्याने मिडलईस्ट, युरेशिया आणि नंतर युरोप आणि अमेरिका या देशांमध्ये ते स्थलांतरित झाले. हे सर्व सांगण्याचे कारण म्हणजे, इथे शायलॉकच्या धर्मांतराचा उल्लेख देरिदा यांनी केला आहे. भाषांतर हे एक धर्मांतर म्हणून येथे पाहता येते.

४. Portia and Nerissa go to Venice disguised as a lawyer and clerk. In the courtroom, the Duke asks Shylock to show some compassion and Bassanio offers 6000 ducats to repay Antonio's loan. Portia appears, disguised as Balthazar. He (she) speaks about mercy and tries to persuade Shylock to drop the case but he refuses.

५. An IOU, a phonetic acronym of the words "I owe you," is a document that acknowledges the existence of a debt. An IOU is often viewed as an informal written agreement rather than a legally binding commitment.

* या संदर्भाला कोणताही पृष्ठ क्रमांक नाही. हा लेख लिहीत असताना डॉ. श्रद्धा कुंभोजकर, इतिहास विभाग प्रमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली मोहम्मद युनूस यांचे 'Muslim Contributions to Science' हे अप्रकाशित डिझरटेशन मला उपलब्ध करून दिले. डॉ. श्रद्धा कुंभोजकर यांचे मनापासून आभार.

संभाषित

संदर्भ

इंग्रजी

ग्रंथ

1. Benjamin, Walter (2009) : 'The Task of the Translator' in *The Translation Studies: A Reader*, (Ed: Lawrence Venuti), Routledge, London and New York.
2. Derrida, Jacques (1973) : *Speech and Phenomenon*, (Tr. David Allison), NorthWestern U. P, Evanston
3. Derrida, Jacques (1976) : *Of Grammatology* tr. Gayatri Spivak, Johns U. P.
4. Derrida, Jacques (1978) : *Writing and Difference* (Tr. Alan Bass), U. Chicago
5. Devy, G. N. (1999) : 'Translation and Literary History: An Indian View' in Susan Bassnett and Harish Trivedi (Eds.) *Post-Colonial Translation: Theory and Practice*, Routledge London and New York.
6. Jim, A. K. (2010) : *The Golden Age of Arabic Science,* Penguin Books India Pvt Ltd, New Delhi, India.
7. Lewis, Bernard (1994): *Islam and the West,* Oxford University Press, London.
8. Lindbarg, David C. (2007) : *The Beginning of the Western Science*, (Second Edition), Chicago USA.
9. Shakespeare, William (Ed. John Russell Brown, 1951) *The Merchant of Venice*, Vol. 23 of The Arden Edition of the Works of William Shakespeare, London.

नियतकालिक

1. Derrida, Jacques and Lawrence Venuti (Winter, 2001), "What Is a 'Relevant' Translation?" Critical Inquiry, Vol. 27, No. 2 University of Chicago Press, Chicago.
   Stable URL: http://www.jstor.org/stable
2. P. Iser, Wolfgang (1996) : Symposia On Translatability published in Surfaces, Vol. VI.106 (v.1.0A).

मराठी

१. गवस, राजन (१९९९) : *तणकट*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

२. गवस, राजन (२०१३) : *ब, बळीचा*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

३. पठाण, यु. म. (२००८) : *फारसी-मराठी व्युत्पत्तिकोश*, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई.

४. सारंग, विलास (१९८३) : *एन्कीच्या राज्यात*, मौज प्रकाशन, मुंबई.

संशोधन

आदिवासी समूहांचे शिक्षण : धोरणात्मक तरतुदी, आव्हाने व उपाययोजना

विजय गायकवाड

सल्लागार
याहामोगी आदिवासी बहुउद्देशीय विकास संस्था
धडगाव, जि. नंदुरबार
drvcgaikwad@gmail.com

संशोधन

प्रस्तावना

आदिवासींना मूळनिवासी, आदिम जाती, वन्यजाती व गिरीजन अशा वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते. भौगोलिकदृष्ट्या विलग अशा भूभागात वास्तव्य करणारे, स्वत:ची वेगळी अशी जीवनशैली, विशिष्ट संस्कृती, भाषा व इतर समुदायांच्या सामाजिक व आर्थिक व्यवस्थेपासून अलिप्त वास्तव्य करणाऱ्या समुदायांना आदिवासी असे संबोधले जाते. राज्यघटनेच्या कलम ३४२ नुसार भारतात ७०३ आदिवासी जमाती निश्चित केल्या आहेत. महाराष्ट्रात ४५ आदिवासी जमाती असून कोलाम, गोंड व कातकरी यांना आदिम जमाती म्हणून घोषित करण्यात आले आहे. २०११ च्या जनगणना अहवालानुसार अनुसूचित जमातींची लोकसंख्या १,०५,१०,२१३ असून ती राज्याच्या लोकसंख्येच्या ९.३५ टक्के इतकी आहे.

आदिवासी समूहांचा उदरनिर्वाह प्रामुख्याने पारंपरिक पद्धतीने अस्थायी स्वरूपाची शेती तसेच वनउपजांवर आहे. मात्र विविध विकास प्रकल्पांमुळे रोजगाराचे बदलते स्वरूप तसेच शेती क्षेत्राची अनिश्चितता यामुळे मोठ्या प्रमाणात आदिवासींचे स्थलांतर होत आहे. परिणामी, आदिवासींच्या उदरनिर्वाहाच्या साधनांमध्येही बदल झाल्याने त्यांना परात्मतेला सामोरे जावे लागते, अशी मांडणी मुन्शी करतात (Munshi 2012 : 1-22). आदिवासी समूह रोजगारासाठी शहरांना प्राधान्य देत आहेत. मात्र तेथे त्यांना असंघटित क्षेत्रावर अवलंबून राहावे लागत आहे. यावर प्रभावी उपाय म्हणून आदिवासींच्या जीवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी शिक्षण, आरोग्य व आदिवासीबहुल प्रांतात उपजीविकेच्या संधी निर्माण होतील, अशा धोरणांची आवश्यकता आहे.

प्रस्तुत लेखात आदिवासी समूहांसाठीच्या शिक्षणविषयक धोरणात्मक तरतुदींचा ऊहापोह केला आहे. या आधारे आदिवासींच्या शिक्षणाच्या सद्य:स्थितीची मांडणी केली आहे. शेवटच्या भागामध्ये धोरणात्मक तरतुदींच्या आधारे शिफारशी सुचवून समारोप केला आहे.

आदिवासी समूहांच्या कल्याणासाठीची धोरणे

भारतासारख्या विकसनशील देशामधील धोरणनिर्मितीची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासता असे लक्षात येते की, वसाहतकाळात तत्कालीन धोरणकर्त्यांनी भारतीय समाजातील जातीय स्तरीकरण व गुंतागुंत नेमकेपणाने समजून न घेता आखलेल्या धोरणांमुळे अधिकाधिक समुदायाला कमीत

कमी लाभ मिळाला. अशा प्रकारच्या धोरण रणनीतीत आर्थिक सेवांना अधिक प्राधान्य दिले गेले. परिणामी, सामाजिक सेवांचा लाभ सर्व स्तरातील समुदायांना समन्यायी तत्त्वावर होऊ न शकल्याने धोरणांना अधोगामी स्वरूप प्राप्त झाले. अशी रणनीती पुढे काही प्रमाणात कायम राहिल्याने विविध भौगोलिक क्षेत्रांतील आदिवासी समूहांच्या विकासासाठी बहुविध आव्हानांचा सामना करावा लागत आहे. यासाठी आदिवासींच्या कल्याणासाठी धोरणे व कृतिकार्यक्रम ठरविताना एकच संदर्भबिंदू वापरणे इष्ट ठरत नाही. कारण आदिवासींची समूहपरत्वे तसेच भौगोलिक प्रदेशानुसार समस्यांची तीव्रता कमीअधिक असल्याने आदिवासींचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी गरजांवर आधारित धोरणनिर्मिती आवश्यक आहे.

स्वातंत्र्योत्तर भारताने कल्याणकारी राज्यव्यवस्थेचा स्वीकार केला असला तरी परंपरेनुसार समूहांची प्रतीकात्मक ओळख याआधारे सामाजिक व राजकीय संघर्षातून सामाजिक वर्जिततेची प्रक्रिया घडते. सामूहिक पातळीवर एक समूह दुसऱ्या समूहांना सेवा, लिंगभाव, वांशिकता तसेच धार्मिकतेच्या आधारावर अडथळे निर्माण करतो (Ambagudia, 2011 : 33-43). प्रत्येक समुदायात प्रामुख्याने लिंगभाव, कुळ, वर्ण, शारीरिक विकलांगता, वर्ग तसेच धार्मिक या आधारावर वर्जितता आढळते. अनुसूचित जातसमूहांमध्ये आढळणारी वर्जितता ही प्रामुख्याने कर्म (Deeds) व कर्तव्य (Duties) यावर आधारित असल्याचे कुमार यांनी प्रतिपादन केले आहे (Kumar 2014 : 57-74). मात्र आदिवासींच्या वर्जिततेची कारणे यापेक्षा वेगळी आहेत. यामध्ये प्रामुख्याने आदिवासींची संस्कृती, धार्मिक परंपरा, भाषा आणि जीवनपद्धती यांचा समावेश होतो. तसेच विलग अशा भौगोलिक स्थितीमुळे आदिवासी समुदाय विकसित समाजापेक्षा आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात मागे राहण्यास कारणीभूत ठरत आहेत (राव २०१६). राज्यघटनेत वेळोवेळी झालेल्या सुधारणांतून आदिवासी लोकसंख्या आधारावर झालेली राज्यनिर्मिती वगळता आदिवासींच्या सांस्कृतिक, भाषिक समावेशनासाठी फारसे प्रयत्न होताना दिसत नाहीत. शिक्षणासारख्या सामाजिक परिवर्तनाच्या घटकात आदिवासींना मुख्य प्रवाही संस्कृतीच्या निम्न स्तरावर राहून तडजोड करावी लागत आहे.

आदिवासींचा विकास साधण्यासाठी १९७५-७६ मध्ये भारत सरकारच्या निर्देशानुसार ५० टक्क्यांपेक्षा अधिक आदिवासींची लोकसंख्या असलेल्या गावांचा समावेश एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांमध्ये

करण्यात आला. ज्याद्वारे आदिवासीबहुल प्रांतांमध्ये शिक्षण, आरोग्य व उपजीविकेच्या संधी व सुविधा निर्माण करणे सुलभ होईल, अशी अपेक्षा ठेवण्यात आली. आदिवासींचे विलग अशा भूप्रदेशातील वास्तव्य विचारात घेऊन धोरणनिर्मितीत प्रारंभीच्या कालखंडात विलगतेचे धोरण, धर्मतत्त्वज्ञानावर आधारित दृष्टिकोनाचा प्रभाव होता. स्वातंत्र्योत्तर काळात समूहकेंद्री, कल्याणकारी दृष्टिकोनाच्या आधारे गरीबी निर्मूलनाला प्राधान्य देताना संमिलीकरण व आदिवासी उप-योजना दृष्टिकोनाच्या आधारे धोरणनिर्मिती करण्यात आली. आदिवासींचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी प्रामुख्याने दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या पंचवार्षिक योजनांच्या कालखंडात एकात्मिक दृष्टिकोन समोर ठेवून त्यादृष्टीने धोरणे ठरविण्यात आली. एकात्मिक स्वरूपाची धोरणे ठरविताना विकास व मानवी कल्याणाबरोबरच शिक्षण या घटकाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. कारण, शिक्षणामुळे मानवी मूल्ये, ज्ञान व कौशल्ये विकसित होण्यास मदत होते.

आदिवासींच्या शिक्षणासाठी धोरणात्मक तरतुदी व वास्तवता

घटनेतील कलम ४६ आदिवासींना शिक्षणाचा हक्क प्रदान करतो. यानुसार समान संधी व सुविधांचा पुरस्कार केला आहे. 'वांद्रेकर समिती'च्या शिफारशीनुसार, १९४७ पासून आश्रमशाळा समूह योजनेच्या माध्यमातून आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी निर्माण झाल्या आहेत. यानुसार आदिवासींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सुरुवातीच्या काळात राज्यसंस्थेने उत्प्रेरकाची भूमिका घेऊन १९५३-५४ मध्ये जनजाती शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये ऐच्छिक प्रयत्न व स्थानिक साधनसंपत्तीवर भर, हा दृष्टिकोन समोर ठेवून कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून आश्रमशाळा सुरू करण्यास मान्यता देण्यात आली (अधिक माहितीसाठी: आश्रमशाळा संहिता २००५). आजमितीला महाराष्ट्रात एकूण ११०९ इतक्या आश्रमशाळा आदिवासी विकास विभागामार्फत चालविल्या जात आहेत. याद्वारे आदिवासी विद्यार्थ्यांना शाळेत येणे सहज शक्य होत आहे.

मात्र जनगणना अहवालानुसार, एकूण साक्षरता व आदिवासींच्या साक्षरतेतील तफावतीत फारशी सुधारणा झालेली नाही. आदिवासींच्या कल्याणासाठीच्या धोरणात्मक तरतुदी अभ्यासता, पाचव्या पंचवार्षिक योजनेत घोषित केलेल्या आदिवासी जनजातीय उप-योजना क्षेत्रामुळे (TSP)

आदिवासींच्या सर्वांगीण विकासाच्या योजना प्राधान्याने राबविण्यासाठी अधिकच्या निधीतरतुदीला प्राधान्य देण्यात आले आहे. प्रस्तुत लेख शिक्षणाविषयी भाष्य करणारा असल्यामुळे एकूणच सर्व धोरणात्मक तरतुदींचा ऊहापोह करण्याऐवजी शिक्षणकेंद्री तरतुदींचा ऊहापोह केला आहे. यानुसार, चौथ्या व सहाव्या पंचवार्षिक योजनेत व्यावसायिक शिक्षण तसेच कौशल्यविकासाद्वारे गुणात्मक शिक्षणाकडे विशेष लक्ष द्यावे, असे सुचविण्यात आले आहे. तसेच सातव्या पंचवार्षिक योजनेत मानवी संसाधनाच्या क्षमताविकासाचे साधन म्हणून शिक्षणाची महत्त्वाची भूमिका असल्याचे सूतोवाच केले आहे. १९८६च्या शिक्षण धोरणात क्षमताविकासावर भर दिला आहे. विद्यार्थ्यांचा क्षमताविकास होण्याच्या दृष्टीने शिक्षकांना संप्रेषणाच्या प्रभावी पद्धतींच्या वापराद्वारे विविध उपक्रम राबविण्यास मोकळीक असावी, असे सुचविले आहे. आदिवासींना त्यांच्या सभोवतालच्या वातावरणाच्या आधारे शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी ताराबाई मोडक, अनुताई वाघ यांचे दिशादर्शक पाऊल असल्याचे सर्वज्ञात आहे. यासाठी आदिवासी भागात उपक्रमशील शिक्षकांची आवश्यकता आहे.

शिक्षणाचे वाढते महत्त्व विचारात घेऊन अकराव्या पंचवार्षिक योजनेत (२००७ - १२) शिक्षणाकडे 'समावेशक शिक्षण' म्हणून पाहताना डोंगराळ, दुर्गम, सीमावर्ती व मागास भागात राहणाऱ्या आदिवासी समुदायांना शिक्षण मिळण्यासाठी संस्थात्मक साहाय्य देण्याची तरतूद करण्यात आली. तथापि, अयोग्य पद्धतीने मार्गक्रमण झाल्याने आदिवासी भागातील शाळांच्या पायाभूत सुविधांची स्थिती चिंताजनक असल्याबाबतचे निरीक्षण बाराव्या पंचवार्षिक योजनेत नोंदविण्यात आले आहे. भौगोलिक विलगता, पायाभूत सुविधांचा अभाव व डोंगराळ भाग यामुळे औपचारिक शिक्षणाचे जाळे या भागात पसरण्यास अनेक अडथळयांना आजही सामोरे जावे लागत आहे. आदिवासी विद्यार्थी असे अडथळे पार करून शाळेत पोहचतात. मात्र शिक्षणाचा दर्जा, पोषक शालेय वातावरण हे प्रश्न आजही अनुत्तरीत आहेत.

राज्यसंस्थेची धोरणे व कृतिकार्यक्रमांनुसार आदिवासी भागात शाळांची संख्या वाढत आहे. मात्र वाढत्या संख्येनुसार शिक्षणातील गुणवत्ता, दर्जा, व समानतेचा पुरस्कार करणे आवश्यक आहे. शिक्षण घेणे व त्यातून सर्वांसाठी संधींची उपलब्धता ही गुंतागुंतीची प्रक्रिया झाली आहे. शिक्षण उपलब्धीत सामाजिक स्तरनिहाय तफावतींमुळे काही गटांनाच संधी

मिळतात. यावर मात करण्यासाठी धोरणप्रक्रिया व अंमलबजावणी दरम्यान विविध स्तरावरील कर्त्यांची (नोकरशहा) भूमिका महत्त्वाची आहे.

आदिवासींच्या शिक्षणातील आव्हाने

शिक्षणप्रक्रियेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण व सुविधा मिळत नाहीत. त्यामुळे होणारे समावेशन आदिवासींच्या दृष्टीने नकारात्मक ठरल्याने वर्जिततेला सामोरे जावे लागते. पण एका बाजूने राज्यसंस्था प्रतिपादन करते की, भौतिक पातळ्यांवर शाळांची उपलब्धता म्हणजे आदिवासी विद्यार्थ्यांचे समावेशन झाले. मात्र क्साक्सांच्या मते, आदिवासी विद्यार्थ्यांचे होणारे समावेशन त्यांच्या नजरेतून प्रतिकूल समावेशन (Adverse Inclusion) ठरते (Xaxa 2011 : 1-34). यासंदर्भातील अधिकची मांडणी करावयाची झाल्यास स्वातंत्र्योत्तर काळापासून आदिवासीबहुल जिल्ह्यांतील कोणत्याही शाळा महाविद्यालयांमध्ये अध्यापनाची भाषा म्हणून आदिवासींच्या भाषेचा वापर झाला नाही. यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांची शिक्षणात समरसता वाढविण्यास अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. आदिवासींना दिल्या जाणाऱ्या शिक्षणाविषयी क्साक्सा प्रतिपादन करताना पुढे म्हणतात की, आदिवासी मुलांच्या दृष्टीने अयोग्य अध्यापनपद्धतीमुळे त्यांना शिकवल्या जाणाऱ्या पाठ्यक्रमाशी ते समरस होत नाहीत (Dev & Xaxa 2012 : 23-35). आदिवासी प्रभागातील शाळांमध्ये शिकविल्या जाणाऱ्या पाठ्यक्रमांमधून आदिवासींचे वेगळेपण दर्शविण्यासाठी त्यांची संस्कृती, रूढी, परंपरांचा दाखला देणे आवश्यक आहे. आदिवासींच्या शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी धोरणनिर्मितीत तसेच अंमलबजावणीच्या पातळीवर सुधारणा आवश्यक असून त्यादृष्टीने शिफारशी सुचविण्यात आल्या आहेत.

शिफारशी

आदिवासींच्या सामाजिक व शैक्षणिक विकासासाठीच्या उपाययोजना धोरणात्मक रणनीती अंमलबजावणी तसेच प्रशासकीय सुधारणा विचारात घेऊन मांडल्या आहेत.

- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ मधील कलम ३ अन्वये सर्व शासकीय प्राधिकरणांबरोबर शासकीय अर्थसाहाय्य घेणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या सेवा अधिसूचित करण्याबाबत सूचित केले आहे.

यानुसार राज्यांतील शासकीय तसेच अनुदानित शाळांनी आश्रमशाळा संहिता २००५ व २०१९ मधील तरतुदींच्या आधारे शिक्षणासंदर्भात सेवा अधिसूचित करणे अपेक्षित आहे. यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाबरोबर वेळेत शैक्षणिक सुविधा उपलब्ध होतील. याकरिता पुरेशा प्रमाणात प्रचारप्रसिद्धी आदिवासी विकास विभाग तसेच आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत करणे आवश्यक आहे.

- अनुदान वितरणप्रक्रियेत अनुदानित आश्रमशाळांतील पटसंख्या निश्चितीकामी विद्यार्थ्यांचे आधारकार्ड वापरास प्राधान्य देण्यात यावे.
- नवीन शिक्षण धोरण २०१९ मध्ये 'स्कूल कॉम्प्लेक्स' ही संकल्पना मांडली आहे. याद्वारे शैक्षणिक सुविधांच्या एकत्रीकरणाला प्राधान्य दिले आहे. मात्र बहुतांशी आश्रमशाळा दुर्गम व पायाभूत सोयिसुविधांचा अभाव असलेल्या ठिकाणी आहेत. अशावेळी यासारख्या तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी विद्यार्थीकेंद्री निर्णय अपेक्षित आहे.
- आश्रमशाळा संहितेच्या निकषांनुसार सुसज्ज प्रयोगशाळा, ग्रंथालय, स्वच्छतेसंदर्भातील सोयिसुविधा यांची खातरजमा करावी. अनुदानित आश्रमशाळांना अनुदान मिळविण्यासाठी शाळेमध्ये विद्यार्थी संख्या व निकषानुसार शैक्षणिक व भौतिक सुविधा उपलब्ध आहेत, अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागते. या प्रतिज्ञापत्रांची त्रयस्थ अभिकरणांमार्फत मत्ता तपासणी करावी. सदरील त्रयस्थ अभिकरणाच्या अहवालानुसार निकषपूर्ती केलेल्या आश्रमशाळांना अनुदान वितरणाची कार्यवाही करावी.
- आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, हा मुख्य उद्देश ठेवून शैक्षणिक तसेच पायाभूत सोयिसुविधांबाबत अनुदानित तसेच शासकीय आश्रमशाळा, अशी तफावत कमी करावी.
- शिक्षणप्रक्रियेत समूहसहभाग असावा अशी धोरणात्मक तरतूद आहे. यानुसार, आश्रमशाळा संहिता २०१९ नुसार आश्रमशाळांतील घडामोडी तसेच तेथील रचनात्मक आणि गुणात्मक स्थिती समजून घेऊन आश्रमशाळांमधील समस्या दूर करण्यासाठी तसेच प्रगतीसाठी व्यवस्थापन, विद्यार्थी आणि समाजातील इतर घटकांनी पुढाकार घ्यावा, यासाठी 'सामाजिक अंकेक्षण' सुचविले आहे. सदर तरतुदीच्या

प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी प्रशिक्षणांद्वारे आवश्यक प्रचारप्रसिद्धी गरजेची आहे.

- आश्रमशाळा विभाग व वसतिगृह विभाग स्वतंत्रपणे कार्यरत असावा.
- आदिवासींची सांस्कृतिक मूल्ये अबाधित राखण्यासाठी बहुभाषिक तसेच पाठ्यक्रमाधारित शब्दकोशनिर्मिती तसेच बहुशाखीय संशोधनांना चालना मिळावी, यासाठी आदिवासी संशोधन संस्थांच्या सक्षमीकरणाला विशेष महत्त्व द्यावे.
- District Institute of Education and Training (DIET) यांच्या प्रशिक्षणात आदिवासी संस्कृती, लोकरूढी, परंपरा यांविषयी आशय असावा. त्यानुसार आश्रमशाळांतील शिक्षकांना प्रशिक्षण द्यावे.
- वाचन-लेखन हमी योजना, ज्ञानरचनावाद यांची सुयोग्य अंमलबजावणी करताना प्राथमिक स्तरावर स्थानिक भाषा अवगत असणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्याला प्राधान्य द्यावे. याबरोबर आदिवासींच्या शिक्षणासाठी महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या ताराबाई मोडक, अनुताई वाघ, यांनी ज्यापद्धतीने स्थानिक संदर्भ वापरून मुलांचे मन शाळेशी जुळवून घेण्यासाठी प्रयत्न केला त्यानुसार अध्यापनपद्धतीत स्थानिक परिस्थितीनुरूप बदल करावेत व त्यासाठी प्रोत्साहन द्यावे.
- आदिम जमातींच्या विकासासाठी अधिकाधिक संशोधनांबरोबर जमातीनिहाय स्वतंत्र कक्ष स्थापन करावा.
- आदिवासी विभागाकडे शिक्षणासंदर्भात Domain Knowledge चा अभाव असल्याचे विविध अहवाल व संशोधनांतून मांडले गेले आहे. याकरिता आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत शिक्षण विभाग व राज्याच्या शालेय शिक्षण विभागामध्ये परस्परसमन्वय व सुसंवाद असणे आवश्यक आहे. शिक्षणासंदर्भात धोरणात्मक निर्णय व कार्यपद्धती ठरविण्यासाठी शालेय शिक्षण विभागामार्फत निर्गमित करण्यात येणारे शासननिर्णय व शासन परिपत्रकात आदिवासी विकास विभागाचा अंतर्भाव असावा.

धोरणात्मक तसेच अंमलबजावणीच्या पातळीवरील वर उल्लेखलेल्या शिफारशी विचारात घेता आदिवासींच्या शिक्षणातील समस्यांच्या निराकरणासाठी मार्गदर्शक उपाययोजना म्हणून निश्चितच फलदायी ठरतील. मात्र आदिवासी समूहांना दर्जेदार शिक्षणाबरोबर श्रमबाजारात उपलब्ध

संधींमध्ये समानतेचा पुरस्कार करणाऱ्या शिक्षणाची आवश्यकता आहे. परंतु शिक्षणाच्या वर्तुळात संधीमधील असमानता व सामाजिक, आर्थिक परिस्थितीमुळे आदिवासी समूह वर्जितता अनुभवतात. वर्जितता प्रामुख्याने सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रक्रियांमधून त्या-त्या समूहांच्या वाट्याला येत असली तरी ती बहुतांशी मनुष्यनिर्मित असते, याला काही अंशी धोरणात्मक कृतिकार्यक्रम जबाबदार ठरतात. मात्र, धोरणांची प्रामाणिकपणे आणि निष्ठापूर्वक अंमलबजावणी झाल्यास आदिवासींचा सामाजिक व आर्थिक दर्जा बदलण्यास मदत होईल. याबरोबरच शैक्षणिक सहभाग अधिक परिणामकारक होण्यास मदत होईल.

संदर्भसूची

इंग्रजी

1. Ambagudia, Jagannath (2011) : 'Scheduled tribes and the politics of inclusion in india', *Asian Social Work and Policy review*-5. Blackwell publishing Asia Pvt Ltd.
2. Dev and Xaxa Virginius (eds.) (2012) : 'Tribes and Development Retrospect and Prospect', in Nathan, *Social Exclusion and Adverse Inclusion Development and Deprivation of Adivasis in India.* OXFORD University Press, New Delhi.
3. Kumar, Vivek (2014) : 'Situating Social Exclusion in the Context of Caste: A Case of Dalit in India', in Judge. Paramjit (ed.): *Mapping Social Exclusion in India Caste, Religion and Borderlands*, CAMBRIDEGE University Press, Delhi.
4. Munshi, Indra (ed.) (2012) : The Adivasi Question Issues of Land, Forest and Livelihood, Orient Blackswan Pvt. Ltd., Hyderabad.

1. National Policy on Education 1986 - Retrieved from http://mhrd.gov.in/sites/upload_files/mhrd/files/document-reports/NPE86-mod92.pdf, Date,19.04.21.

5. Xaxa, Virginius (2011) : 'The Status of Tribal Children in India:

A historical Perspective', UNICEF Working Paper Series, Paper No-7, UNICEF: *Institute of Human Development, India*.

मराठी

१. आश्रमशाळा संहिता, २००६. महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग.

२. आश्रमशाळा संहिता, २०१९. महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग.

३. राव, श्रीनिवास (२०१६) : 'वंचितांचे शिक्षण: मुद्दे, आव्हाने आणि पुढे जाण्याचा मार्ग', योजना, अंक ३, जानेवारी २०१६, भारत सरकार, माहिती व प्रसारण मंत्रालय, नवी दिल्ली.

पुस्तक परीक्षण

संभाषित

आत्मनिर्भरतेचा प्रवास :
विरंगी मी! विमुक्त मी!

मानसी गानू

प्रभारी प्राचार्य
श्रीमती राजमती नेमगोंडा पाटील कन्यामहाविद्यालय, सांगली.
mansi.ganu1@gmail.com



(परीक्षित पुस्तक : विरंगी मी! विमुक्त मी! लेखक : अंजली जोशी, प्रकाशक : शब्द पब्लिकेशन, बोरिवली, मुंबई, प्रकाशन वर्ष : जून २०१६, पृष्ठे : ३३६, मूल्य : ३८० रुपये)

विरंगी मी! विमुक्त मी! ही अंजली जोशीलिखित कादंबरी लैंगिकतेवर निर्भीड भाष्य करते. लेखिकेने कादंबरीच्या अर्पणपत्रिकेत 'आत्मनिर्भरतेचा प्रवास करणाऱ्या सर्वांसाठी', असे लिहिले आहे. १९२९ मध्ये कॅन्सस शहरातल्या विचिटा गावात जन्मलेली एक चित्रकार व लेखिका बेटी हिच्या जीवनावर आधारलेली ही कादंबरी एक स्वतंत्र सर्जनशील निर्मिती आहे. कादंबरीची नायिका बेटी हिचा आत्मनिर्भर होण्यापर्यंतचा प्रवास आणि स्वतःबरोबर इतरांना आत्मनिर्भर करण्याचे तिचे धाडसी प्रयत्न वाचकांना चकित करतात.

अकरा वर्षांच्या स्वप्न पाहणाऱ्या बेटीला अचानक लहान भावाच्या बालगीत म्हणण्याने जाग येते, इथून कादंबरीची सुरुवात होते. शालेय वयात बेटीला चित्रकलेत रस असतो. कार ड्रायव्हिंगचं आकर्षण असतं. रोनाल्ड नावाच्या माणसाच्या गॅरेजमध्ये गाडी विकत घेण्यासाठी गेलेली असताना, तो तिच्याशी शारीरिक लगट करतो. स्त्री म्हणून ती सावध होते. *'अवेकन'*

वर्तमानपत्रातल्या जाहिरातीचे काम करताना त्यांची खाद्यपदार्थांची स्पर्धा जिंकल्यामुळे बेटीला पुरस्कार म्हणून न्यूयॉर्कची ट्रीप करायला मिळते. तिथे ती 'नॅशनल अकॅडमी ऑफ डिझाईन' या संस्थेत कला शिक्षणासाठी प्रवेश घेते. तिथल्या उत्तम कामगिरीमुळे उच्च शिक्षणाकरिता 'आर्ट स्टुडन्ट लीग'मध्ये तिला प्रवेश मिळतो. परिपूर्ण चित्र काढता यावे, या उद्देशाने नग्न चित्रांसाठी मॉडेल म्हणून जायला ती सुरुवात करते. एका आर्ट गॅलरीमध्ये असिस्टंट असताना, डायरेक्टर मार्टिनपासून तिला दिवस जातात. मार्टिनने जबाबदारी नाकारल्याने, एका बेकायदेशीर सेंटरमधून ती गर्भपात करून घेते. कालांतराने मार्केटिंग डिपार्टमेंटच्या फ्रेडशी लग्न करते. तिचं स्टुडिओचं स्वप्न पूर्ण होतं. पुढे त्यांचा घटस्फोट होतो आणि बेटी दारूच्या आहारी जाते. व्यसनमुक्ती केंद्राची सभासद झाल्यावर त्यातून बाहेरही येते. 'सीआर ग्रूप'च्या स्त्रीवादी चळवळीच्या कार्यक्रमांना जायला लागते. पुढे पोर्नोग्राफीच्या प्रचाराच्या मुद्द्यावर मतभेद झाल्याने बेटी चळवळीतून बाहेर पडते. तिने लावलेल्या लैंगिक स्वानुभवाच्या चित्रप्रदर्शनाला लोकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळतो. पण सरकार त्यावर बंदी घालते. व्हर्जिनियाबरोबर बेटी समलिंगी संबंध ठेवते. हस्तमैथुनावर पुस्तक लिहिते. समाज तिची अवहेलना करतो. उर्वरित आयुष्यात तिच्या कार्यशाळा बंद पडतात. चित्रे विकली जात नाहीत. तिला आर्थिक चणचण जाणवू लागते. याकाळात लॉन स्वच्छ करण्यापासून ते ब्ल्यू फिल्मचं डिझाईन मेकिंग करण्यापर्यंतची सगळी कामे बेटी करते. पुढे एका संस्थेकडून तिला मानद पीएच.डी. मिळते. ८० वर्षे पार केल्यानंतर कॅलरीन नावाची एक स्त्री बेटीचे शिष्यत्व पत्करून तिच्या विचारांचा प्रसार करायचं ठरवते. आपले म्हणणे कधी तरी लोकांना समजेल, या विचाराने बेटी डोळे मिटून घेते. इथे कादंबरी संपते.

प्रस्तावनेत लेखिकेने लिहिलेले एक विधान अतिशय महत्त्वाचे आहे, ते म्हणजे, "पन्नास वर्षांपूर्वी ती स्त्रियांच्या लैंगिकतेबद्दल जे भाष्य करत होती ते आजच्या समाजातल्या स्त्रियांनाही तितकेच लागू आहे...." (पृष्ठ ७) यावरून कादंबरीच्या विषयाचे महत्त्व अधोरेखित होते. काळानुसार समाजात सर्व स्तरांवर बदल होत असतात. तरीही पन्नास वर्षांनंतरही कादंबरीचा विषय समकालीन ठरणं, ही गोष्ट समाजाची मानसिकता उघड करणारी आहे. एकूणच 'लैंगिकता' हा कादंबरीचा विषय आजच्या समाजातही तितकाच महत्त्वाचा ठरतो.

संभाषित

हा विषय ज्या कथानकाच्याद्वारे आपल्यासमोर येतो त्या कथानकाची काही वैशिष्ट्ये सांगता येतात. कादंबरीचे कथानक नाट्यपूर्ण रीतीने उलगडत जाते. बेटीला पडलेल्या स्वप्नवर्णनापासून ते शेवटी भूतकाळातील आयुष्यावर बेटीने टाकलेल्या नजरेपर्यंत पुढे काय घडणार, याची उत्कंठा वाचकाला लागते. तिच्या आयुष्यातील घटनांचे वर्णन करता करता तिच्या मानसिक आंदोलनांचीही चित्रे लेखिका वेळोवेळी रेखाटते. बेटीच्या आयुष्याबद्दल वाचता वाचता आपण तिच्या वैचारिक- मानसिक स्थितीत ओढले जातो. अनेक अनुभवांनंतर बेटीची भक्कम झालेली वैचारिक बैठक, लैंगिकतेविषयी सुस्पष्ट जाणीव आणि दृढ होत गेलेल्या धारणा, या सगळ्याचे वाचक म्हणून आपण साक्षी बनतो. तिच्या आयुष्यातील घटनांचे वर्णन करता करता जे संवाद येतात, ते वाचकाला गुंतवून ठेवतात. तिच्या आयुष्यातील चांगल्या- वाईट अनुभवांचे वर्णन वाचताना प्रत्येक वेळी तिच्या व्यक्तिमत्त्वामध्ये होत गेलेला बदल, कटू अनुभव पचवण्याची तिची क्षमता आणि या सगळ्यामुळे कणखर बनलेले तिचे व्यक्तिमत्त्व आणि तिच्या विचारांना आलेली समृद्धी लक्षात आल्याशिवाय राहत नाही. कथानक केवळ घटना आणि संवाद यामुळे नाट्यपूर्ण होत नाही तर परिस्थितीप्रमाणेच बेटीच्या आयुष्यात आणि वैचारिक जाणिवेत झालेला बदल प्रकर्षाने लक्षात राहतो. कथानक अतिशय चित्रदर्शी आहे. बेटीसारख्या जाणकार चित्रकाराच्या आयुष्यात चित्रकलेला महत्त्वाचे स्थान नसले तरच नवल! संपूर्ण कादंबरीत बेटीचे आयुष्य आणि तिची चित्रकला समांतरपणे जाताना दिसतात. समांतर या अर्थी की, दोन्ही विषय तेवढेच महत्त्वाचे. तरीही चित्रकला बेटीच्या आयुष्यात मिसळून गेली आहे. तिच्या आयुष्यघडणीत चित्रकलेचा फार मोठा वाटा आहे. लेखिकेचा चित्रकलेविषयीचा अभ्यास कौतुकास्पद आहे. शाळेत असल्यापासून बेटी चित्रकलेच्या तासाची वाट पाहायची. पुढे नग्नचित्रांसाठी मॉडेल म्हणून जाणे, नग्न चित्रांचे प्रदर्शन भरविणे, नूयॉर्कमध्ये असताना मोठमोठ्या म्युझियमला भेटी देणे, तिथली चित्रे अभ्यासणे आणि लैंगिकता या आपल्या अभ्यास विषयाकरिता चित्रकलेचा वापर करून, तो विषय सोपा करून समाजापर्यंत पोहोचवणे यावरून चित्रकलेप्रती असणारे बेटीचे प्रेम कळून येते. चित्रकलेचा अभ्यास तिने केवळ कला म्हणून केला नाही तर माणूस समजून घेण्यासाठी तिने त्याचा उपयोग केला. मायकल अँजेलोची चित्रं बघून तिला वाटते, “कपड्यांना एक फार मोठं सामाजिक अंग आहे. सामाजिक स्थान उच्च- नीचता, उपाध्या,

शिक्षण अशा अनेक बिरुदावल्या ते वाहत असतात. ते काढले की, आत असतो तो खराखुरा नैसर्गिक माणूस." (पृ. ६७) एवढा विचार करून ती थांबत नाही तर आपल्याला स्वतःची 'ओळख' आहे आणि ती निव्वळ स्त्री किंवा पुरुष असण्याच्या पलीकडची आहे. त्या 'ओळखी'वरच आता लक्ष केंद्रित करायचं. हा निश्चय पुढे जाऊन ती करते. तिच्याशी संबंध आलेल्या पुरुषांबरोबरचे नाते जेव्हा जेव्हा आनंददायी ठरत नाही तेव्हा तेव्हा ती ते निकराने तोडताना दिसते आणि निराशेच्या सावटाखालून प्रत्येक वेळी हिंमतीने बाहेर पडते. कादंबरीमध्ये येणारी चित्रवर्णने, निसर्गाची वर्णने, बेटीच्या मानसिक आंदोलनांची वर्णनेही चित्रदर्शी आहेत. बेटीबरोबर वाचक त्यात रंगून जातो. कारण एखादे चित्र उभे करण्याचे सामर्थ्य या वर्णनांमध्ये आहे. उदाहरणार्थ, "रुंद प्रवेशद्वारावरची पितळी कोरीव अक्षरं त्यांचे स्वागत करत होती. प्रवेशद्वारातून आत आल्यावर क्लबचा भव्य परिसर तिच्या नजरेस आला...... प्रवेशद्वारापासून थेट आतपर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी चेरीचे व ओकचे लाल पिवळया व केशरी फुलांनी लगडलेले वृक्ष एकमेकांना बिलगून उभे होते" (पृ. ६१). 'एंजलवूड फील्ड क्लब'चे केलेले हे वर्णन पुरेसे बोलके आहे.

कादंबरीतील महत्त्वाची व्यक्तिरेखा म्हणजे बेटी. तिच्याभोवती संपूर्ण कादंबरीचे कथानक गुंफले गेले आहे. असे असले तरी तिचे आई-वडील, भाऊ, काका, तिच्या आयुष्यात तिला प्रत्येक वळणावर भेटलेले पुरुष, तिचे सहकारी, मैत्रिणी या प्रत्येकाचा, त्यांच्या वागण्याचा तिच्या आयुष्याच्या घडणीत वाटा आहे. कारण तिला या सर्वांकडून मिळालेल्या कमी-अधिक प्रेमाबरोबर मोठ्या प्रमाणावर कटुताही आहे आणि तिने ती पचवली आहे.

'लैंगिकता' या विषयाचा तिने आयुष्यभर अभ्यास केला. बेटीने कादंबरीमध्ये मांडलेला आत्मनिर्भरतेचा मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे. 'लैंगिक स्वातंत्र्य हा स्त्रीमुक्तीचा पाया आहे', असे तिचे मत होते. त्यासाठी हस्तमैथुनाचा प्रसार तिने केला. ग्रँटबरोबर या विषयासंदर्भात कार्यशाळा घेतल्या. स्त्रियांनी कामपूर्तीसाठी पुरुषावर अवलंबून राहण्याची गरज नाही असे तिला वाटे. त्यामुळे आपल्या कार्यशाळांमधून ती स्त्रियांना हस्तमैथुनाची प्रात्यक्षिके दाखवीत असे. मुळात आपल्याला हव्या असलेल्या लैंगिक सुखाची जोडीदाराकडे मागणी करणे; ते आपल्याला हवे तसे मिळत नसेल तर तसे बोलून दाखवणे, एखाद्या पुरुषाने तिला हवे असलेले देण्याचे नाकारले किंवा मनासारखे संबंध जुळले नाहीत तर त्याच्यापासून विभक्त होणे,

हस्तमैथुनाद्वारे लैंगिक स्वावलंबनाचा अवलंब करणे. इतक्या धाडसी गोष्टी बेटीने आयुष्यभर केलेल्या दिसतात. पाप-पुण्याच्या, परंपरेच्या कोणत्याही आडकाठ्या तिने मानल्या नाहीत. मोकळेपणाने नग्न चित्रे काढता यावीत, यासाठी स्वतः नग्न चित्रांची मॉडेल म्हणून तिने काम केले. हस्तमैथुनासंबंधी ग्रँटशी जसे ती मोकळेपणाने बोलते तितक्याच मोकळेपणाने स्वतःच्या आईशीही चर्चा करते व व्हर्जिनियासारख्या मैत्रिणीशी समलिंगी संबंध ठेवते. बेटीचा हा धाडसी प्रवास वाचकाला अचंबित करतो. "मग अगदी आपल्या मनातल्या गोष्टींचंसुद्धा चित्र काढता येईल?" (पृ. १३) असे आपल्या वडिलांना विचारणारी बेटी आयुष्यातील अनेकविध अनुभवांनी समृद्ध होत जाते. बेटीला सोडून गेल्यावर ग्रँटचे एक पुस्तक प्रकाशित होते. त्या पुस्तकाच्या अर्पणपत्रिकेत तो लिहितो, "सर्वांग सुंदर प्रेमाचा परिसस्पर्श करून स्त्री-पुरुष संबंधांचं व्यापक भान देणाऱ्या माझ्या प्रिय मैत्रिणीस, प्रेमपूर्वक अर्पण" (पृ. ३१०). यावरून बेटीच्या समृद्ध जगण्याची कल्पना आपल्याला येते. कादंबरीच्या शेवटी पूर्वायुष्याबद्दल स्वतःच्या मनाशी बोलताना दिसते. तेव्हा ती म्हणते, "मनःपूर्वक जगलो. स्वतःचा शोध घेतला. आपला शोध स्वतःपुरता ठेवला नाही. स्वतः सुखी झालो आणि इतरांनाही सुखी करण्याचा प्रयत्न केला" (पृ. ३३६). यावरून तिच्या आत्मनिर्भरतेच्या प्रवासाचे महत्त्व वाचकाला पटल्यावाचून राहत नाही.

प्रस्तुत कादंबरी १९२९मधील बेटी डॉडसन या चित्रकार स्त्रीच्या चरित्राविषयीची कादंबरी आहे. न्यूयॉर्कमध्ये घडलेली तिची चित्रकलेची कारकीर्द, नग्न चित्रांचे प्रदर्शन, लैंगिक प्रशिक्षणाच्या तिने घेतलेल्या कार्यशाळा, हस्तमैथुनावर लिहिलेली पुस्तके, स्त्रीवादी चळवळीतील तिचे काम, या तिच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना सोडल्या तर संपूर्ण कादंबरी कल्पनेच्या आधाराने रंगवली आहे, असे लेखिका म्हणते. नायिकेची वैचारिक व भावनिक वाटचाल ही संपूर्णतः काल्पनिक आहे. ती स्वतंत्र सर्जनशील निर्मिती आहे, असे प्रस्तावनेत अंजली जोशी यांनी नमूद केले आहे. चरित्रात्मक तरीही स्वतंत्र, अशा या कादंबरीचे आव्हान लेखिकेने समर्थपणे पेलले आहे. बेटीचा प्रवास वाचल्यावर लक्षात येते की, आयुष्यातील नानाविध प्रसंगाने ती समृद्ध आणि प्रगल्भ झाली. तिच्या आयुष्यातील केवळ महत्त्वाच्या घटनांचे वर्णन म्हणजे ही कादंबरी नव्हे तर तिच्या आयुष्याभोवती लेखिकेने काल्पनिकरित्या ज्या घटना गुंफल्या आहेत, त्या वाचताना कुठेही अतिशयोक्तीपूर्ण वाटत नाहीत; कारण त्या

सगळ्या घटनांमधून प्रगल्भ होत जाणारे बेटीचे व्यक्तिमत्त्व सतत जाणवत राहते. बेटीचे असामान्य धैर्य, प्रत्येक अनुभवाचा स्वीकार, तिची चित्रकला, स्पष्टवक्तेपणा, विश्लेषक वृत्ती या सर्व गोष्टी लक्षात घेऊन केलेली कादंबरीची मांडणी कल्पित असूनही वाचकाच्या मनावर शेवटपर्यंत पकड कायम ठेवते. कादंबरीतील वातावरण हे त्याकाळच्या अमेरिकन संस्कृतीचे आहे. तेथील सामाजिक चालीरीती, स्त्री-पुरुषसंबंध, अभिरुची आपल्यापेक्षा वेगळे असले तरी कुठेही आस्वादाच्या आड येत नाहीत. वाचक त्याच्याशी एकरूप होतो. महत्त्वाचे कारण म्हणजे लैंगिकता आणि त्यासाठी असणारे स्त्रीचे पुरुष परावलंबित्व. आयुष्यभर बेटी ज्या आत्मनिर्भरतेसाठी लढली, तो विषय कोणत्याही सामाजिक संस्कृतीतील स्त्रीसाठी महत्त्वाचा ठरतो. कादंबरीत बेटीने एके ठिकाणी केलेले विधान तिचे माणूसपण अधोरेखित करते. ती म्हणते, "लैंगिक स्वातंत्र्याचा अर्थ हा जास्त व्यापक आहे. लैंगिक स्वातंत्र्य म्हणजे शरीरासह मनालाही प्रगल्भ पातळीवर नेणारं प्रेम करण्याचं स्वातंत्र्य. असं स्वातंत्र्य प्रत्येक स्त्री- पुरुषांना मिळालं तर समाज सुखी होईल" (पृ. २०८). बेटीचे हे विचार स्त्री-पुरुषांना कोणत्याही काळात माणूसपणाकडे नेणारे आहेत. भाषेच्या पातळीवर विचार करता असे लक्षात येते की, मुळात बेटीचे आयुष्य चित्रकलेने व्यापलेले होते. चित्रकला तिच्या आयुष्यातून वेगळी निघू शकत नाही. तिची कलाभिरुची उच्च दर्जाची आहे. त्यामुळे तिची भाषाही सौंदर्यपूर्ण आणि कलात्मक आहे. कादंबरीचा प्रवास बेटीच्या सामान्य आयुष्यापासून सुरू होऊन तिच्या एका प्रगल्भ माणूस होण्यापर्यंत जातो. त्यामुळे कादंबरीची भाषा ही एका पातळीवर कलात्मक आणि दुसऱ्या पातळीवर तात्त्विक बनली आहे. एक संपूर्ण वेगळी संस्कृती आपल्या भाषेत आणताना लेखिकेने ही भाषा कुठेही बोजड केलेली नाही.

बेटीने इसवी सन १९६० ते १९८० या काळात स्त्रीवादी चळवळीत प्रत्यक्ष काम केले होते. संस्कृती वेगळी असली तरी स्त्रियांना दिली जाणारी विषमतेची वागणूक, त्यांची होणारी लैंगिक घुसमट, त्या काळातले पुरुषधार्जिणे कायदे या गोष्टी आपल्याकडेही होत्या. आजच्या काळातही लैंगिकतेकडे पाहण्याची संकुचित वृत्ती मोठ्या प्रमाणात समाजात टिकून आहे. त्यामुळे स्त्री- पुरुषसंबंध आजही निर्भेळ मोकळे नाहीत. कुठलीतरी अढी, बंधने आहेतच. अशा वेळी बेटीने मांडलेली आत्मनिर्भरतेची संकल्पना अतिशय महत्त्वाची ठरते. तिने मांडलेल्या हस्तमैथुनाच्या मुद्द्याची कोणी

उघड चर्चा करीत नसले तरी लैंगिक स्वावलंबनाचा तो एक मार्ग आहे, हे नाकारता येणार नाही.

बेटीचे आयुष्य चकित करणारे नक्कीच आहे. लैंगिक स्वातंत्र्याच्या बाबतीत तिने मांडलेले मुद्दे कदाचित धाडसी वाटू शकतात. तिने केलेला हस्तमैथुनाचा प्रसार, नग्नचित्रांचे प्रदर्शन याबाबतीतही हे आपल्या संस्कृतीत बसणारे नाही, असे वाटू शकते. परंतु या सगळ्याच्या शेवटाकडे जाताना बेटीला जे वाटते ते महत्त्वाचे आहे. ती म्हणते, "त्या रंगांनी आपल्याला त्यांच्याही पलीकडे नेलं. विरंगी केलं, विमुक्त केलं. मनाला पडलेल्या बेड्या त्याने तोडून टाकल्या. आपल्याला सांगितलं त्यांनी की तुला जे वाटतं ना तेच कर, बाकी कशाचीही पर्वा करू नकोस" (पृ. ३३५). बेटीने हे आयुष्यभर पाळले. सतत कुठल्यातरी बंधनात जगणाऱ्या आपल्यासारख्या माणसांना, बेटीची आत्मनिर्भरता स्वप्नवत वाटली तरी अंतिमत: ती माणूसपणाकडे नेणारी आहे. एकमेकांमधील भेद संपवणारी आणि स्वावलंबी बनवणारी आहे. प्रस्थापित नीतिनियमांशी टक्कर देत, बेटीने केलेला प्रवास निश्चितच अंतर्मुख करणारा आहे.

थेरीगाथा : नवे आकलन

श्रद्धा कुंभोजकर

प्रमुख, इतिहास विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
shraddhakumbhojkar@gmail.com



(परीक्षित पुस्तक : थेरीगाथा : नवे आकलन, संपादक : देवेंद्र उबाळे, प्रकाशक : डॉ. आंबेडकर वाङ्मयीन अभ्यासमंडळ, नाशिक, प्रकाशन वर्ष : २०२१, पृष्ठे : १६०, मूल्य : ३०० रुपये)

जागतिक तत्त्वज्ञानामध्ये भारताचं योगदान लक्षात घेता अनेक तात्त्विक विचार दाखवता येतील. त्यांमध्ये सर्वाधिक प्रभावी विचार म्हणजे गौतम बुद्धांचं तत्त्वज्ञान. मानवाच्या दु:खमुक्तीची आवश्यकता रुजवणाऱ्या या विचारांचा उदय इसवी सनपूर्व पाचव्या शतकामध्ये झाला. त्या काळी प्रचलित असलेल्या सनातन धर्मविचारांविरुद्ध प्रत्येक बाबतीत विद्रोह करत गौतम बुद्धांनी आपले विचार समाजाच्या सर्व स्तरांत पोचवले. विशिष्ट जात, धर्म, लिंगभाव, प्रदेश, भाषा यांचं प्रभुत्व नाकारलं. “अत्तदीपा विहरथ अत्तसरणा अनञ्ञसरणा” (महापरिनिब्बान सुत्त, २.२६) म्हणजे ‘कुणी दुसरा मार्ग दाखवेल, या आशेवर राहाणं सोडून द्या. एखाद्या द्वीप म्हणजे बेटासारखे निर्लेप राहून आपला मार्ग आपण शोधा.’ असा जगरहाटीच्या प्रवाहात राहूनही स्वत:ला अलिप्त ठेवण्याची शिकवण देणारा हा विद्रोही विचार पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रेरक वाटला आणि त्यांनी बौद्ध धम्माच्या स्थापनेनंतर अडीच हजार वर्षांनीही आधुनिक विचारांचं

संवाद

अधिष्ठान ठेवण्याइतकी वैचारिक मोकळीक देणाऱ्या या धम्माची दीक्षा घेतली. त्यांच्या अनुयायांच्या, एकूणच आंबेडकरी चळवळीच्या दृष्टीनं बौद्ध तत्त्वज्ञानाचा अभ्यास आणि पुनर्शोध हा व्यक्तीच्या आणि समष्टीच्याही दु:खमुक्तीसाठीच्या प्रयत्नांचा अविभाज्य भाग राहिलेला आहे. या बौद्ध तत्त्वविचारांच्या प्राचीनतम संग्रहांमधील *सुत्तपिटका*तील खुद्दकनिकायामध्ये असणाऱ्या थेरीगाथांचं स्थान अनन्य आहे. तत्त्ववादिनी स्त्रियांची कथनं भारतीय वाङ्मयात थेरीगाथेपूर्वीदेखील आली आहेत. परंतु ज्या प्रगल्भतेनं थेरी म्हणजे गौतम बुद्धांच्या तत्त्वज्ञानाच्या अनुयायी झालेल्या आदरणीय स्त्रियांनी आपले अनुभव आणि विचार गाथांमधून शब्दांकित केले आहेत, तशी अभिव्यक्ती अद्वितीयच म्हणावी लागेल.

अशा या थेरीगाथांचे वेगवेगळे आयाम अभ्यासून आजच्या जगण्याशी त्यांचा कुठेकुठे संबंध येतो, हे तपासण्याचा प्रयत्न देवेंद्र उबाळे यांनी संपादित केलेल्या *थेरीगाथा: नवे आकलन* या पुस्तकाद्वारे केला आहे. आंबेडकरी चळवळीच्या परिप्रेक्ष्यामधून आजच्या सामाजिक वास्तवाला भिडताना थेरीगाथांचा प्रभाव कोणकोणत्या क्षेत्रांमध्ये जाणवतो अथवा कसे, याची एक तपासणी या प्रकाशनाच्या निमित्ताने 'डॉ. आंबेडकर वाङ्मयीन अभ्यासमंडळ' या संस्थेने केलेली आहे. प्रखर आत्मटीका आणि आत्मपरीक्षण हे आंबेडकरी चळवळीचं अतिशय मौलिक असं वैशिष्ट्य या निमित्तानं अधोरेखित व्हावं, असं वाटतं. *लाल दिव्याच्या गाडीला हाये कुनाचं योगदान?* अशा लोकप्रिय कलाकृती असोत, अथवा या पुस्तकाच्या निमित्तानं मांडलेला आंबेडकरी चळवळ आणि बौद्धविचार यांमधल्या अंत:संबंधांचा ताळेबंद असो – आत्मपरीक्षण करणं, ही या चळवळीचं सकस असं अंत:सत्व दाखवून देणारी अभिव्यक्ती आहे असं वाटतं.

ज्ञानेश्वर पवार, श्यामल गरूड, सुनील हेतकर, सचिन गरूड, मोतीराम कटारे आणि उर्मिला पवार या अभ्यासकांनी मानसशास्त्र, आंबेडकरी स्त्रियांची आत्मकथने, संत स्त्रियांची आत्मकथने, स्त्रीमुक्तीचा इतिहास, सौंदर्यविचार आणि थेरीगाथेच्या कालजयी महत्त्वावर लेख लिहिले आहेत. ज्ञानेश्वर पवार यांनी मानसशास्त्रासारख्या आधुनिक विज्ञानाच्या माध्यमातून थेरीगाथेची चिकित्सा करण्याचा प्रयत्न केला आहे. तर मोतीराम कटारे यांनी प्रा. रा. ग. जाधव यांनी बौद्ध सौंदर्यशास्त्र उभे करता येईल काय, अशी जी अपेक्षा *निळी क्षितिजे*मधून व्यक्त केली होती, तिच्या दिशेने पाऊल टाकत थेरीगाथेतील सौंदर्यविचाराविषयी मांडणी केली आहे. उर्मिला पवार

यांनी आपल्या अनुभवसिद्ध लेखामधून आजच्या स्त्रीपुरुषांनी थेरीगाथेतून लखलखीतपणे प्रकाशणाऱ्या समतेच्या संदेशाकडे डोळसपणे पाहण्याची गरज अधोरेखित केली आहे. आंबेडकरी स्त्रियांनी बंडखोर थेरींचा वारसा जपावा आणि आत्मसन्मानाचं शस्त्र उगारताना त्याची मुळं थेरीगाथेत शोधावी, अशी अपेक्षा श्यामल गरूड यांनी व्यक्त केलेली आहे. सचिन गरूड यांच्या लेखातून थेरीगाथेचं एक अलक्षित वैशिष्ट्य समोर येतं, की स्त्रीला मोक्ष मिळवायचा तर कोणत्या तरी मार्गाने लिंगबदल होण्याची पूर्वअट थेरीगाथापूर्व विचारांमध्ये अभिप्रेत होती. परंतु 'बुद्धांनी भिक्षुणीसंघाद्वारे भौतिक व आध्यात्मिक मुक्तीचा आदर्श उभा करून वर्णजातस्त्रीदास्यपूरक पुनर्जन्मवादाचा व तज्जन्य लिंगबदलवादाचा पराभव केला.' (पृ. १०८) यातील भाषेची दुर्बोधता सोडल्यास बाईला मोक्ष मिळवायचा तर बाईपण सोडावं लागण्याची गरज नाही, हे थेरींच्या माध्यमातून गौतम बुद्धांनी सिद्ध केलं, हे महत्त्वाचं प्रतिपादन आहे.

सुनील हेतकर यांच्या लेखामध्ये त्यांनी थेरीगाथा आणि महाराष्ट्रीय संत स्त्रियांची आत्मचरित्रे यांच्यामधील साम्यस्थळे आणि विसंगती जाणून घेण्याचा लक्षणीय प्रयास केलेला आहे. 'ओरसा धीता बुद्धस्स' – म्हणजे 'आम्ही बुद्धाच्या वारसदार, त्याच्या लेकी' आहोत हा आत्मविश्वास असणाऱ्या थेरींनी बुद्धांचा दु:खक्षालनाचा मार्ग स्वीकारत निब्बाणप्राप्ती केली. तसंच महाराष्ट्रीय संत स्त्रियांनाही पुरुष संतांमुळे मुक्तीची द्वारे खुली झाली, हे साम्य त्यांनी अधोरेखित केले आहे. श्रीचक्रधरांनी 'धर्मीचिया चाडा एथ बाइया का नसाव्या? तुमचे काई जीव आन् त्यांच्या जीऊलिया' असं म्हणून अधिकारवाणीने स्त्रीपुरुषांच्या समतेचा विचार सांगितला. परंतु प्रत्यक्षात मात्र महदाइसा, मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई यांना त्यांच्या काळाच्या धारणेपलीकडे पोचणे अवघड होते. त्यांना सामाजिक व्यवहाराची चौकट न बदलता आल्याने धर्मक्षेत्रामध्ये समता मांडत असतानाच जगण्याच्या कुरुक्षेत्रात – म्हणजे व्यवहारात मात्र वर्णाश्रमधर्माच्या विषमतेच्या दावणीला बांधलेलं जगणं असं द्विधा स्थितीचं अचूक निरीक्षण हेतकर यांनी मांडलेलं आहे. या मांडणीला पुढे न्यायचं झालं तर तत्कालीन भौतिक वास्तवाचाही पाया विचारात घेणं उपयुक्त ठरेल असं वाटतं. भक्ती ही भावनाच सामंतशाहीच्या भौतिक वास्तवाची जोडीदार असल्याने व्यक्तीने आपल्या सकल निष्ठा या श्रेष्ठ मानलेल्या व्यक्ती अथवा संकल्पनेस वाहिलेल्या असणेच भक्तीमध्ये अभिप्रेत होते. त्यामुळे या मार्गाने कितीही

प्रवास केला तरी तो प्रत्यक्ष समतेच्या मुक्कामी पोचणं शक्य नव्हतं आणि नाही, हे अधिक स्पष्ट होऊ शकतं.

प्रा. आशालता कांबळे आणि अरविंद सुरवाडे यांचे लेख हे थेरीगाथा आणि आंबेडकरवादी विचार यांच्या सहसंबंधांचं विश्लेषण करतात. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे आत्मपरीक्षण हे या विचारांना कसदार बनवणारं वैशिष्ट्य या दोन लेखांमधून विशेषत्वानं प्रतीत होतं. प्रा. कांबळे यांचा लेख आंबेडकरी स्त्रियांच्या लेखनावर थेरीगाथांचा कितपत प्रभाव पडला, याची साधकबाधक चर्चा करतो. त्यात स्त्रीत्वाचा अभिमान अथवा भीती न बाळगता स्वत:कडे माणूस म्हणून पाहायचं आणि कर्तृत्व, आंतरिक सामर्थ्य विकसित करायचं, असा थेरीगाथेचा इत्यर्थ मांडला आहे. ‘बुद्धकन्या’ हा आपला वारसा आहे असे येथील ‘भीमकन्या’ म्हणजे आंबेडकरवादी विचारांच्या पाईक असणाऱ्या लेखिका म्हणू लागल्या, असं सागून त्यांनी हिरा बनसोडे, आशालता कांबळे, गाथा सोनावणे, रूपा कुलकर्णी ‘बोधी’, सुशीला मूल-जाधव, प्रज्ञा पवार, छाया कोरेगांवकर, धम्मसंगिनी रमा गोरख, उर्मिला पवार आणि मीनाक्षी मून अशा विस्तृत पटावरील लेखिकांच्या कलाकृतींचा आणि संशोधनाचा आढावा घेतला आहे. प्रत्यक्ष थेरींवर लिहिणे आणि थेरींनी स्वीकारलेली बंडखोरीची मानव मुक्तिवादी मूल्ये प्रमाण मानून साहित्यनिर्मिती करणे, अशा दोनही प्रक्रियांचा सजग धांडोळा प्रा. कांबळे यांनी घेतला आहे. तो घेताना काही लेखिकांनी भाबडेपणाने केलेल्या चित्रणाकडे लक्ष वेधून त्यांनी अधिक गांभीर्याने लेखन करण्याची गरजही त्या चिकित्सकपणे नोंदवतात.

अरविंद सुरवाडे यांचा लेख थेरीगाथांच्या आंबेडकरवादी साहित्या-वरील प्रभावाची चर्चा करतानाच एकूणच या चळवळीच्या मूल्यभानाची, अधिष्ठानाची समीक्षा करतो. धम्मचक्रप्रवर्तनानंतर बुद्ध तत्त्वज्ञान आणि डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असणारी स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या मूल्यांना साहित्यनिर्मितीत स्थान देणे क्रमप्राप्त असताना आक्रोशाला अधिक महत्त्व दिले गेले आणि पहिल्या पिढीतील आंबेडकरवादी साहित्यिकांनी डॉ. आंबेडकरांनी समोर ठेवलेल्या पर्यायी व्यवस्थेची अपरिहार्यता जोरकसपणे अभिव्यक्त केली नाही, अशी खंत लेखक व्यक्त करतात. सुशिक्षित आणि उच्चशिक्षित असतानाही या साहित्यिकांनी ‘बौद्ध आयडेंटिटी’ऐवजी ‘दलित आयडेंटिटी’ स्वीकारल्याने बौद्ध संस्कृतीतील मूल्यकल्पनांवर साहित्यनिर्मिती होऊ शकली नाही, अशी त्यांच्यासारख्या जुन्याजाणत्या

अभ्यासक कार्यकर्त्याने मांडलेली कारणमीमांसा विचारार्ह आहे. त्यामानाने आताच्या काळात अधिक सजगपणे ही उणीव भरून काढली जात असल्याचे निरीक्षणही ते नोंदवतात. प्रेमानंद गज्वी, अरुण मिरजकर, अशोक हांडोरे, योगीराज वाघमारे, प्रा. गौतमीपुत्र कांबळे, देवेंद्र उबाळे, संजय डोंगरे, सिद्धार्थ देवधेकर अशा नव्या-जुन्या साहित्यिकांनी केलेला बौद्ध तत्त्वज्ञान आणि मिथकांचा वापर ते अधोरेखित करतात. बुद्ध तत्त्वज्ञानातून प्रसवणारा मानवी कल्याणाचा अंत:प्रवाह वाहता ठेवून समकालीन जगण्याला भिडणाऱ्या कलाकृतींची निर्मिती होणे गरजेचे आहे, अशी अपेक्षा ते व्यक्त करतात.

या सर्व लेखांना संपादक देवेंद्र उबाळे यांनी आपल्या प्रस्तावनेच्या सूत्रामधून यथोचित संदर्भासह सादर केले आहे. तसेच कौतुकास्पद गोष्ट म्हणजे संपादकाने बहुतेक सर्व लेखांमध्ये गरज लागेल तसतशा ससंदर्भ तळटीपांमधून व्यक्ती किंवा ग्रंथांची योग्य ती पूरक माहिती दिली आहे. मुखपृष्ठावर दिसणारा कापलेल्या प्राचीन वृक्षाच्या खोडामधून वाढू पाहणारा हिरवागार धुमारा अन्वर्थक आणि सुंदर आहे. संशोधनाच्या पद्धतिशास्त्राच्या दृष्टीने जाणवणारी एकच उणीव म्हणजे अनेक साहित्यिकांचे आणि त्यांच्या कलाकृतींचे उल्लेख लेखांमधून आले तरी त्या प्रत्येकाच्या कलाकृतींचा तपशील टीपांमधून अथवा संदर्भांमधून मिळत नाही. उदाहरणार्थ, बहिणाबाई, चक्रधर, अशोक हांडोरे, गौतमीपुत्र कांबळे. परंतु ही जिज्ञासा जागृत करणाऱ्या या पुस्तकाच्या मूल्याला त्याने मोठा धक्का लागत नाही. थेरीगाथा आणि त्यांच्या अनुषंगाने आजच्या जगण्याचं आकलन नव्याने तपासणाऱ्या, आत्मपरीक्षण करणाऱ्या या ग्रंथाचं प्रत्येक वाचकानं स्वागत करायला हवं.

बाँबे बिफोर मुंबई : एसेज इन ऑनर ऑफ जिम मॅसेलॉस

विद्या प्रभू

इतिहास विभागप्रमुख
सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे.
vdyprabhu@yahoo.com

संग्राहित



(परीक्षित पुस्तक : बाँबे बिफोर मुंबई : एसेज इन ऑनर ऑफ जिम मॅसेलॉस (Bombay Before Mumbai : Essays in Honour of Jim Masselos, संपादक : प्रशांत किदंबी, मंजिरी कामत, रेचेल ड्वायर, प्रकाशक : पेंग्विन वायकिंग, भारत, प्रकाशन वर्ष : २०१९, पृष्ठे : ४२८, मूल्य : ९९९ रुपये)

वसाहतकालीन बाँबे ते आजच्या वर्तमानातील मुंबईविषयी इतिहासकार, समाजशास्त्रज्ञ, संशोधक, कलावंत, सिनेजगत या सर्वांना नेहमीच कुतूहल व आकर्षण राहिले आहे. *बाँबे बिफोर मुंबई : एसेज इन ऑनर ऑफ जिम मॅसेलॉस* ह्या पुस्तकाच्या शीर्षकावरून लक्षात येते की हे पुस्तक बाँबे ते मुंबईपर्यंतच्या या शहराच्या वाटचालीचा धांडोळा घेणारे आहे.

मुंबई विद्यापीठ, लेस्टर विद्यापीठ व लंडन विद्यापीठातील स्कूल ऑफ ओरिएंटल अँड आफ्रिकन स्टडीज या तीन विद्यापीठांनी संयुक्तपणे डॉ. जिम मॅसेलॉस यांच्या सन्मानार्थ जानेवारी २०१७ मध्ये आंतरराष्ट्रीय इतिहास परिषद आयोजित केली होती. या परिषदेमध्ये आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या संशोधकांनी मुंबईच्या इतिहासावर शोधनिबंध सादर केले. लेस्टर

विद्यापीठाचे डॉ. प्रशांत किदंबी, मुंबई विद्यापीठाच्या माजी इतिहास विभाग प्रमुख, प्रोफेसर मंजिरी कामत, लंडन विद्यापीठ (SOAS) च्या प्रोफेसर रेचेल ड्वायर यांनी ह्या शोधनिबंधांचे संपादन प्रस्तुत पुस्तकात केले आहे.

डॉ. प्रशांत किदंबी यांनी पुस्तकाचा परिचय करून देताना डॉ. जिम मॅसेलॉस यांच्या मुंबईवरील संशोधनाचा व त्यांनी उलगडलेल्या इतिहासाच्या नव्या पैलूंचा आढावा घेतला आहे. डॉ. जिम मॅसेलॉस यांनी एकोणीसाव्या शतकातील येथील राष्ट्रवादी चळवळीचा अभ्यास केला. १९७० व १९८० च्या दशकात त्यांनी मुंबईच्या इतिहासाची नवीन दालने आपल्या अभ्यासाने उजेडात आणली. मुंबईतील वस्त्या, मोहल्ले, तेथील जमाव आणि लोकप्रिय संस्कृती यांची या शहराच्या जडणघडणीतील भूमिका, अंत:स्थ संबंध, ताणतणाव यांचे विश्लेषण डॉ. जिम मॅसेलॉस यांनी केले आहे. १९८० नंतर मॅसेलॉस यांनी महायुद्धांच्या अंतरकाळात काँग्रेसच्या नेतृत्वाखाली झालेल्या चळवळीतील सामान्यांचा सहभाग व त्यांची भूमिका मांडली आहे. मुंबईचा इतिहास मांडताना त्यांनी तळागाळातील लोकांच्या सहभागाचीही दखल घेतली व त्यांचा दुर्लक्षित इतिहास मांडला.

डॉ. जिम मॅसेलॉस यांचे संशोधन प्रामुख्याने शहरातील विविध समुदाय, शहरातील जागा (space) व वस्त्या, विविध स्तर व गटांकडे असणारी ताकद (power) आणि राष्ट्रवाद असल्याने या चार विषयांतर्गत लेखांची मांडणी करण्यात आली आहे.

पुस्तकातील पहिला लेख मुंबईचे स्थानिक इतिहासकार मुरली रंगनाथन यांनी मुहम्मद अली रोगे यांच्यावर लिहिला आहे. एकोणीसाव्या शतकातील मुंबईतील अग्रगण्य व्यापारी मुहम्मद अली रोगे हे कोंकणी मुस्लीम होते. प्रसिद्ध उद्योजक व व्यापारी सर जमसेटजी जीजीब्वॉय यांच्याशी त्यांची व्यवसाय भागीदारी होती. चीनबरोबरच्या व्यापारामध्ये त्यांनी अपार संपत्ती प्राप्त केली. मुहम्मद अली रोगे यांच्या सार्वजनिक जीवनावर लेखकाने प्रकाश टाकला आहे. १८३४ मध्ये मुंबईचे पहिले भारतीय जस्टीस ऑफ पीस होण्याचा मान त्यांना मिळाला. शिक्षण, वैद्यकीय कार्यासाठी विशेषत: ग्रॅण्ट मेडिकल कॉलेज, कॉलरा साथीच्या इस्पितळाला दिलेल्या देणगीचा आढावा महत्त्वाचा आहे. त्यांनी कोंकणी मुस्लीम समाजाचे नेतृत्व केले असले तरी ते आज फार ज्ञात नाहीत. कोंकणी मुस्लीम समाजावर पुढे संशोधन व्हावे, असे रंगनाथन यांनी सूचित केले आहे.

जेसी पालसेटिया यांनी ''पारसिज अँड बॉंबे सिटी : कम्युनिटी अँड आयडेंटिटी इन दि नाईनटिन सेंच्युरी'' या लेखामध्ये मुंबईच्या सार्वजनिक

जीवनाला आकार देण्यात पारशी समुदायाच्या भूमिकेचे व हितसंबंधांचे विश्लेषण केले आहे. एकोणीसाव्या शतकात, चीनबरोबरच्या व्यापारात मोठ्या प्रमाणात नफा प्राप्त झाल्यानंतर पारशी उद्योजकांनी मुंबई शहराच्या विकासामध्ये योगदान देऊन सार्वजनिक जीवनात आपला ठसा उमटवला. हे साध्य करत असताना आपली सामाजिक प्रतिष्ठा वाढविणे व ब्रिटीश शासनव्यवस्थेत प्रभाव वाढवणे, हे अंत:स्थ हेतू मान्य केले तरी शहराला कॉस्मोपोलिटीयन स्वरूप प्राप्त करून देण्यात व कॉस्मोपोलिटीयन नागरिक तयार करण्यात पारशी समाजाची महत्त्वाची भूमिका असल्याचा युक्तिवाद लेखकाने केला आहे.

सिमीन पटेल यांनी "दि ग्रेट पर्शियन फॅमिन ऑफ १८७१, पारसी रेफ्युजिस अँड दि मेकिंग ऑफ इराणी आयडेंटिटी इन बॉंबे" या लेखाद्वारे मुंबईतील पारशी समुदायाने पर्शियामधून स्थलांतरित होऊन आलेल्या दुष्काळग्रस्तांचे मुंबईत केलेले पुनर्वसन विशद केले आहे. या वर्गाला पारशी समाजाने सामावून घेतले असले तरी सामाजिक चौकटीत 'गरीब पारशी' म्हणून खालचा दर्जा प्राप्त होता. या कारणास्तव विसाव्या शतकाच्या पूर्वाधात स्थलांतरित पारशी लोकांनी 'इराणी' ही स्वतंत्र ओळख कशी निर्माण केली, याचे लेखिकेने उत्तम विश्लेषण केले आहे. मुंबईत आलेल्या प्रत्येक स्थलांतरिताने आपली जागा (space) व ओळख निर्माण करण्याच्या प्रयत्नांचे हे एक उदाहरण म्हणता येईल.

डग्लस हेन्स यांचा बॉंबेज "युरोपियन कम्युनिटी ड्युरिंग दि इंटरवॉर पिरियड" हा लेख मुंबईतील युरोपियन समुदायाच्या विशेषत: १९३० च्या दशकातील मुंबईतील वास्तव्यावर प्रकाश टाकतो. मुंबईतील युरोपियन समाज, वर्ग व भिन्न राष्ट्रीयत्वामध्ये विभाजीत होता. अनेकदा तात्पुरते, कमी काळाच्या वास्तव्यामुळे अनिश्चितता व अस्थिरता असे. १९३० च्या दशकात युरोपियन लोकसंख्येत घट झाली; भारतातील राजकीय आणि आर्थिक परिस्थिती बदलली होती. या पार्श्वभूमीवर स्वतःचे वांशिक श्रेष्ठत्व दर्शविण्यासाठी व वेगळेपण टिकवण्यासाठी क्लब, क्रीडा, पार्टी आयोजनांद्वारे आपली वेगळी ओळख अबाधित ठेवण्यासाठी केलेल्या युरोपियनांच्या प्रयत्नांचे लेखकाने उत्तम विश्लेषण केले आहे.

एरीका वॉल्ड यांनी "रिडिंग स्पेशल स्पेसेस: दि लाईफ ऑफ दि बॉंबे थिएटर, १७७०-१८४३" या निबंधात १७७० साली स्थापन झालेल्या बॉंबे थिएटरची मनोरंजन व सामाजिकीकरणातील भूमिका मांडली आहे. फोर्ट या युरोपियन वर्चस्व असलेल्या भागात, या कला संस्थेचा आस्वाद युरोपियन

घेत असले तरी संस्थेचे आश्रयदाते श्रीमंत भारतीय असल्याने वांशिक सीमा नक्की ओलांडल्या जात असाव्यात. १८४३ मध्ये हे थिएटर बंद पडले. १८५३ मध्ये बहुसंख्य भारतीय निवासी असलेल्या ग्रॅण्ट रोड भागात थिएटरची स्थापना झाली. प्रारंभ इंग्रजी नाटकांनी झाला असला तरी लवकरच पारशी थिएटरची सुरुवात झाली. भारतीयांनी युरोपियन आश्रयाशिवाय मनोरंजनाचे आपले अभिक्षेत्र कसे निर्माण केले, याचे परीक्षण या लेखात केले गेले आहे.

अबिगेल मॅक्गोवेन यांनी "सेलिंग होम : मार्केटिंग होम फर्निशिंग्ज इन लेट कलोनियल बाँबे"मध्ये महायुद्धांच्या अंतरकाळात मुंबईतील फर्निचर रिटेल बाजारपेठेत घडून आलेल्या बदलांचा धांडोळा घेतला आहे. मुंबईतील विशिष्ट बाजारपेठा ह्या या शहराची खास ओळख होती. विशिष्ट भाग हे विशिष्ट बाजारपेठांसाठी प्रसिद्ध होते. अगदी घरोघरी फिरणाऱ्या फेरीवाल्याकडून सर्व वस्तूंची विक्री होत असे. १८९० मध्ये उच्चभ्रू व विशषत: युरोपियन वर्गासाठी वस्तू परदेशातून आयात केल्या जाऊ लागल्या. महायुद्धांच्या अंतरकाळात मुंबईत स्थापन झालेली शोरूम्स, डिपार्टमेंटल स्टोअर्स, रिटेल विक्रेत्यांनी फर्निचर, शोभिवंत वस्तूंची विक्री करताना नवीन कल्पना रुजविल्या. ग्राहकाला आकर्षित करणाऱ्या जाहिराती व छापील माहितीबरोबर शोरूमच्या भव्य दालनातील वस्तूंची मांडणी करून घरांची प्रतिमा व कल्पना कशा बदलू लागल्या होत्या, याचे सुंदर विश्लेषण यात दिले आहे. त्याकाळातील आर्मी अँड नेव्ही, कामदार, गोदरेज, बाँबे स्वदेशी या डिपार्टमेंटल स्टोअर्सची माहिती या लेखात मिळते.

अश्विनी तांबे यांनी "सोशल ज्योग्रफिज ऑफ बाँबेज सेक्स ट्रेड, १८८०-१९२०" या लेखात मुंबई शहरातील 'रेड लाईट' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कामाठीपुरा वस्तीतील स्तरीकरण मांडले आहे. शहराच्या या भागात असलेल्या कुंटणखान्यांमुळे या वस्तीतील सामाजिक अन्याय, संघर्ष, शोषण व सामाजिक स्तरीकरण यांचे विदारक वर्णन लेखिकेने केले आहे. शहरातील या भागात युरोपियन व भारतीय स्त्रिया शरीरविक्री करत असल्या तरी त्यांच्यामध्ये सामाजिक अंतर व वांशिक भेदभाव मोठ्या प्रमाणावर होता. पोलीस यंत्रणेकडून दोन्ही वर्गाला मिळणाऱ्या वेगळ्या वागणुकीचे त्यांनी परीक्षण करून भारतीय स्त्रियांची अवहेलना नमूद केली आहे.

प्रिती चोप्रा यांनी "वर्दी ऑब्जेक्ट्स ऑफ चॅरिटी : गव्हर्नमेंट, कम्युनिटीज अँड चॅरिटेबल इन्स्टिट्यूशन्स इन कलोनियल बाँबे" या लेखात ब्रिटीश राजवटीतील दानधर्म व परोपकारी कार्याचा आढावा घेतला आहे. भारतात दानधर्म करण्याची प्रथा पुरातन काळापासून होती. ब्रिटीश राजवटीत

धनिकांनी शाळा, इस्पितळांना देणग्या दिल्या. दानधर्माचे स्वरूप धार्मिक किंवा आपल्या ज्ञातीच्या लोकांपुरते मर्यादित असे. परोपकारी कामे सरकार व दानशूर नागरिकांच्या सहकार्यातून झाली. लेखिकेने ब्रिटिशांचे, युरोपियन व भारतीयांशी संबंधित असणाऱ्या भिन्न नीतीचे परीक्षण केले आहे.

निल ग्रीन्स यांनी "प्रोलेटेरियन बॉडीज अँड मुस्लीम फेस्टिवल्स : डिसिप्लिनिंग प्लेजर इन कलोनियल बाँबे" मध्ये मुस्लीम सुफी संत हबीब अली शहा यांच्या मुंबईतील मुस्लीम गोदी कामगार आणि मिल कामगारांवरील प्रभावाचे विश्लेषण केले आहे. कामगारांनी धार्मिक सण व उत्सवादरम्यान आत्मसंयम पाळावा, मद्यपान करू नये, असा उपदेश संत हबीब अली शहा करत असत. निल ग्रीन्स यांच्यामते सरकारव्यतिरिक्त समाजातील धार्मिक शक्ती, नव्याने उदयाला येत असलेल्या कामगार वर्गामध्ये शिस्तबद्धता व त्यांना नियंत्रित ठेवण्यासाठी कार्यरत होत्या. कामगारांवरील आत्मसंयमाची शिकवण पुढील कामगार चळवळीवर दिसून येते. होळी व मोहरमदरम्यान दारूविक्रीची दुकानें बंद ठेवण्याची मागणी कामगारांनी केली होती.

वेनेसा कारू यांनी "अ पॉवरफुल वेपन फॉर दि एम्प्लॉयर्स? वर्कर्स हौसिंग अँड सोशल कंट्रोल इन इंटरवॉर बाँबे" मध्ये ब्रिटीश सरकार व उद्योजकांनी पहिल्या महायुद्धानंतर कामगार वर्गावर आपली पकड आणि नियंत्रण ठेवण्यासाठी बाँबे डेव्हलपमेंट डिपार्टमेंटमार्फत केलेल्या प्रयत्नांचे परीक्षण केले आहे. सरकार व मिल मालकांचे हितसंबंध, कामगारांची आक्रमकता व वाढत्या राष्ट्रवादाच्या पार्श्वभूमीवर कामगारांसाठी घरे बांधण्याच्या BDD योजनेला मिळालेल्या यशापयशाचे मूल्यमापन लेखिकेने केले आहे.

पुस्तकातील शेवटचे तीन लेख 'राष्ट्रवाद' या थीमखाली मुंबई शहरातील राष्ट्रवादी प्रवाहाचे विश्लेषण करणारे आहेत.

दिनयार पटेल यांनी "दि ट्रान्सनॅशनल करिअर ऑफ 'दि इंडियन एडिसन' शंकर आबाजी भिसे अँड दि नॅशनलिस्ट प्रमोशन ऑफ सायंटिफिक टॅलेंट" हा निबंध शंकर आबाजी भिसे यांचे वैज्ञानिक प्रयास व त्यांच्यामध्ये असणारी राष्ट्रीयता व उद्योजकता दर्शवणारा आहे. भिसे यांनी अनेक नावीन्यपूर्ण उपकरणे व यंत्रे तयार केली. विशेष म्हणजे त्यांनी तयार केलेल्या टाईप कास्टिंग मशिनने प्रिंटिंग उद्योगामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणला. त्यांच्या कार्यात दादाभाई नौरोजी, दिनशा वाच्छा, गोपाळ कृष्ण गोखले यांनी त्यांना केलेले साह्य व राष्ट्रीय चळवळीशी असलेल्या संबंधांचे मूल्यांकन लेखकाने केले आहे.

संशोधन

रॉबर्ट रहमान रमन यांनी “सिविल डिस्ओबिडियन्स अँड दि सिटी: काँग्रेस अँड दि वर्किंग क्लासेस इन बाँबे, १९३०-३२” या लेखात मुंबई शहरातील ‘सविनय चळवळी’चा आढावा घेतला आहे. महात्मा गांधींच्या प्रभावामुळे सुरुवातीच्या काळात, कामगार वर्गावर काँग्रेसचा प्रभाव वाढला होता. गांधी - आयर्विन करारानंतर काँग्रेसच्या बदललेल्या कार्यपद्धतीचा, कामगार सहभागावरील परिणाम व मुस्लीम समुदायाच्या बदलत्या प्रतिसादाचे परीक्षण लेखकाने केले आहे.

दानिश खान यांनी “दि पॉलिटिक्स ऑफ बिझनेस: दि काँग्रेस मिनिस्ट्री अँड दि मुस्लीम लीग इन बाँबे, १९३७-३९” या निबंधात १९३७ मधील मुंबई प्रांतातील निवडणुकीत काँग्रेस पक्षाला मिळालेल्या विजयानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीचे विश्लेषण केले आहे. प्रांतीय सरकारने शहरी मालमत्तेवर कर लावण्याच्या निर्णयाला पारशी व मुस्लीम समुदायाने विरोध केला. वर्गसंघर्षाचे रूपांतर सामुदायिक संघर्षात होऊन मुस्लीम लीगला राजकीय फायदा मिळाला व त्याचे दुर्दैवी परिणाम भविष्यात झाले, असा युक्तिवाद लेखकाने केला आहे.

पुस्तकाच्या अखेरीस ‘आफ्टरवर्ड’मध्ये “रिमेम्बरिंग बाँबे : प्रेझेंट मेमरीज, पास्ट हिस्टरीज” यात डॉ. जिम मॅसेलॉस यांनी एक जिज्ञासू व इतिहासाचे अभ्यासक म्हणून मुंबई त्यांना कशी उमगली, याचा धांडोळा घेतला आहे. १९६१ मध्ये डॉ. जिम मॅसेलॉस यांना कॉमन वेल्थ शिष्यवृत्ती मिळाली व ते डॉक्टरेट करण्यासाठी ऑस्ट्रेलियातून भारतात आले. मुंबई विद्यापीठाच्या सेंट झेवियर्स महाविद्यालयात त्यांनी पीएच.डी.साठी रजिस्ट्रेशन करून वसाहतकालीन मुंबईवर संशोधन सुरू केले. नुकतीच महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली होती. वसाहतकालीन बाँबे ते महाराष्ट्राची राजधानी म्हणून झालेली शहराची वाटचाल व बदल त्यांच्या लक्षात येऊ लागले. पुराभिलेखागारातील ऐतिहासिक साधनांचा अभ्यास करत असतानाच आपल्या सहाध्यायी मित्रांबरोबर शहरात भटकंती करताना विविध स्थळे, वस्त्या, तेथील समुदाय, बाजारपेठा यांच्या निरीक्षणातून शहराची वेगळी ओळख त्यांना झाली.विशिष्ट भाग व वस्त्यांची असणारी भिन्न ओळख, तसेच सण, उत्सव, आंदोलनप्रसंगी जमाव म्हणून असणाऱ्या नागरिकांची मनोवृत्ती, लोकसंस्कृती, त्यांच्या जिज्ञासेचे विषय बनले व त्यातून त्यांच्या संशोधनाला चालना मिळाली. कधीही न थांबणाऱ्या आणि झपाट्याने विकसित होणाऱ्या मुंबई शहराचा सामाजिक इतिहास व

लोकप्रिय संस्कृतीवर संशोधन करण्यास व अंतरदृष्टी निर्माण करण्यास बराच वाव नवसंशोधकांना आहे असे ते नमूद करतात.

पुस्तकातील प्रत्येक संशोधनात्मक लेखाची मांडणी डॉ. जिम मॅसेलॉस यांच्या संशोधनाच्या धाग्याला पकडून आहे. संशोधकांनी नावीन्यपूर्ण व कुतूहल निर्माण करणारे विषय मांडले आहेत. सदर लेख मुंबईच्या शहरीकरणाच्या प्रक्रियेतील विविध समुदायांची भूमिका, संघर्ष व हितसंबंधांवर प्रकाश टाकतात. या विविध समुदायांची स्वत:ची ओळख व स्थान निर्माण करण्याची आंतरिक ओढ विशद करण्यात आली आहे. हा प्रवास प्रत्येक समुदायासाठी कशा प्रकारे वेगळा अनुभव देणारा होता, याची उकल या ग्रंथात होते. स्थलांतरित इराणी, पारशी, युरोपियन समाजाचे भिन्न अनुभव रेखाटले आहेत. वेळोवेळी शक्तीचे प्रदर्शन व वर्चस्व निर्माण करण्याच्या प्रयत्नांचे दर्शन या लेखांमध्ये होते. तसेच वासाहतीक सरकारचा विविध समुदायांबाबत असलेल्या भिन्न दृष्टिकोनाचे व धोरणाचे विश्लेषण आहे. या पुस्तकामध्ये दोन महायुद्धांच्या अंतरकाळातील मुंबईच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक जीवनात झालेल्या बदलाचे उत्तम चित्रण करणारे हे संशोधनात्मक लेख आहेत. पारशी थिएटरची निर्मिती, रिटेल फर्निचर शोरूमचा सांस्कृतिक प्रभाव, तसेच शंकर आबाजी भिसे यांच्या पारतंत्र्यकाळातील वैज्ञानिक प्रयास हे विषय नवीन माहिती देणारे व रंजक आहेत. कामगार, शरीरविक्री करणाऱ्या स्त्रियांवरील लेख बहुआयामी दृष्टिकोनातून लिहिले आहेत. एकंदरीत पुस्तकातील लेख विविध विषय, नवीन दृष्टिकोन देणारे असल्याने एक महत्त्वाचे ऐतिहासिक व सामाजिक दस्तऐवज आहे. डॉ. जिम मॅसेलॉस यांनी म्हटल्याप्रमाणे मुंबई शहराच्या इतिहासाचे अनेक कप्पे अजून उलगडायचे आहेत. या पुस्तकाने हा प्रयत्न यशस्वी केला आहे. भविष्यात नव्याने संशोधन करणाऱ्यांना या पुस्तकाचे वाचन आवर्जून करावे लागेल.

पुस्तकात उपयुक्त नकाशे आणि चित्रे रंजक आहेत. पुस्तकाच्या शेवटी विस्तृत संदर्भसूची दिली असली तरी भारतीय भाषेतील पुस्तकांच्या सूचीचा अभाव जाणवतो. हे पुस्तक फक्त इतिहासाचे अभ्यासक, विद्यार्थीच नव्हे तर मुंबईबद्दल कुतूहल असलेल्या सामान्य माणसानेही वाचण्याजोगे व संग्रही ठेवावे असे आहे.

लेखक परिचय

संमाशिल

दीपक बोरगावे

दीपक बोरगावे १९७१ पासून इंग्रजी साहित्य आणि भाषा विषयाचे महाविद्यालयीन व पदव्युत्तर स्तरावरील अध्यापन करीत आहेत. महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी (पुणे) येथून ते निवृत्त झाले आहेत. भाषांतर आणि संस्कृती या अभ्यासक्षेत्रात त्यांनी पीएच.डी. प्राप्त केली असून त्यांनी पॅरिस आणि इंग्लंड येथील विद्यापीठांत संशोधननिबंध सादर केले आहेत. भाषांतर, उत्तरवासाहतिक, उत्तरआधुनिक साहित्य, भारतीय इंग्रजी साहित्य, संस्कृती अभ्यास तसेच भारतीय भाषांतून इंग्रजीत झालेली भाषांतरे, भाषांतरसमीक्षा अशा विविध विषयांवर त्यांनी संशोधनात्मक लेखन केले आहे. ब-बळीचा (राजन गवस), खाली जमीन वर आकाश (सुनिलकुमार लवटे) कुमारांचे कर्मवीर (द. ता. भोसले), झोत (रावसाहेब कसबे), इंग्रजीत अनुवाद आणि गुजरात फाईल्स (राणा अय्यूब), औरंगजेब (अलेक्स रदरफोर्ड) मराठीत अनुवाद यावर त्यांचे लेखन असून त्यांच्या कवितांचा हिंदीतील अनुवाद असे विपुल लेखन प्रसिद्ध आहे. याशिवाय त्यांचे मराठीतील दोन कवितासंग्रह प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.

विजय गायकवाड

विजय गायकवाड यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथून एम.फिल., पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे तसेच समाजशास्त्र या विषयातून सेट परीक्षा उत्तीर्ण केली आहे. नंदुरबार जिल्ह्यातील अतिदुर्गम धडगाव तालुक्यात २०१२ ते २०१७ या कालावधीत त्यांनी 'सामाजिक वर्जितता व आदिवासींचे माध्यमिक शिक्षण' या विषयावर संशोधनकार्य केले आहे. सदर संशोधनासाठी त्यांना जानेवारी २०१८ मध्ये पीएच.डी. पदवी प्राप्त झाली आहे. याबरोबरच ग्रामीण विकास, आदिवासी विकास यासंदर्भातील केंद्र व राज्य शासनाच्या अखत्यारितील विविध संशोधन प्रकल्प, प्रशिक्षण व क्षमता बांधणी तसेच सनियंत्रण व मूल्यमापन या प्रक्रियेमध्ये मागील दहा वर्षांपासून कार्यरत आहेत. यादरम्यान त्यांनी महाराष्ट्र शासनाची प्रथितयश संस्था 'यशदा', पुणे, 'वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा', महाराष्ट्र शासन तसेच आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेत वरिष्ठ संशोधन अधिकारी या पदावर काम केले आहे. तसेच 'यशदा', पुणे येथे बाह्य व्याख्याता म्हणून आदिवासी समूहांच्या कल्याणाची धोरणे व वास्तवता, संशोधन पद्धती व तथ्य संकलन तंत्रे या विषयांवर व्याख्याने दिली आहेत. याशिवाय गाव, जिल्हा व राज्य या स्तरांवर ग्रामीण उपजीविका, पाणलोट व्यवस्थापन व ग्रामीण विकास, लोकसेवा हक्क अधिनियम - २०१५ या विषयांवर आधारित व्याख्याने दिली आहेत. त्यांचे मासिके, वर्तमानपत्र यांमध्ये २२ लेख प्रसिद्ध आहेत. सध्या ते नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव येथील 'याहामोगी आदिवासी बहुउद्देशीय विकास संस्थे'त सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. याबरोबरच 'अश्वरूढ

फाऊंडेशन', अहमदनगर या संस्थेच्या माध्यमातून शिक्षण, ग्रामीण विकासाशी संबंधित विविध सामाजिक उपक्रम तसेच प्रशिक्षण कार्यक्रम राबवत आहेत. त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून त्यांना भारतीय लोकप्रशासन संस्था, महाराष्ट्र विभागीय शाखा, मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत दोन वेळा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला आहे.

मानसी गानू

मानसी गानू ह्या श्रीमती राजमती नेमगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, सांगली येथे प्रभारी प्राचार्या असून त्यांनी एम.ए. पीएच.डी. (मराठी) सेट, नेट पूर्ण केले आहे. त्या वरिष्ठ महाविद्यालयात गेली अठरा वर्षे अध्यापन करीत आहेत. त्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांचे 'स्वयं अध्ययन' साहित्याचे लेखन व अध्यापन करीत आहेत. 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ' यांच्या *मराठी वाङ्मयकोश खंड -३* मध्ये त्यांचे नोंदीलेखनाचे काम सुरू आहे. *साप्ताहिक विवेक*, मुंबई यांच्या नाट्यकोशात नोंदीलेखनाचे कामही त्यांनी केले आहे. *मिळून साऱ्याजणी, शिक्षणविवेक, निवेदिता पाक्षिक, रुची* इत्यादी नियतकालिकांमध्ये त्यांनी ललित लेखन केले आहे. तसेच आकाशवाणी, सांगली येथे विविध कार्यक्रमांतून सहभाग घेतला आहे. नाटक, कविता, शास्त्रीय संगीत गायन, अभिवाचन यामध्ये त्यांना विशेष रुची आहे.

श्रद्धा कुंभोजकर

श्रद्धा कुंभोजकर या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात इतिहास विभागप्रमुख आहेत. इतिहास आणि संस्कृत या विषयांत एम.ए.च्या दोन पदव्या प्राप्त केल्यानंतर त्यांनी 'महाराष्ट्रातील राष्ट्रवादी नेत्यांनी प्राचीन ग्रंथांचा नव्याने अन्वयार्थ कसा लावला' या विषयावर संशोधन करून पीएच.डी. पदवी प्राप्त केली. त्यानंतर त्यांनी आधुनिक महाराष्ट्र, सत्यशोधक व आंबेडकरी चळवळ, मराठी साहित्य व रंगभूमी, क्रमिक पुस्तके, जमातवाद, स्मृती आणि डिजिटल इतिहास अशा क्षेत्रांत संशोधनपर लिखाण करून ते युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान आणि अमेरिकेतील विद्यापीठांत सादर केले आहे. २०१९ मध्ये त्यांना जर्मनीतील ग्योटिंगेन आणि स्पेनमधील ह्यूस्तो विद्यापीठांत भारतीय इतिहासाच्या 'अतिथी प्राध्यापक' म्हणून विद्यावृत्ती प्रदान केली गेली होती. सध्या त्या आयसीएचआर, आयसीएसएसआर आणि रूसा अनुदानातून तीन संशोधन प्रकल्पांचे काम करत आहेत. इंग्रजी, मराठीतून त्या संशोधनपर लिखाण करतात. *लोकसत्ता* दैनिकात चतुःसूत्र या सदरातून त्यांनी २०२० मध्ये इतिहासविषयक लिखाण केले. त्यांनी फ्रांझ काफ़्का यांच्या कथांचा मूळ जर्मनमधून अनुवाद केला आहे. तो कथासंग्रह *रूपांतर* या नावाने २०२० मध्ये प्रकाशित झाला आहे.

विद्या प्रभू

विद्या प्रभू या सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे येथे ३४ वर्षे इतिहास विषयाचे अध्यापन करत असून त्या इतिहास विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी 'कॉलरा इन बॉम्बे प्रेसिडेंसी, सी. १८५०-१९४७' ह्या विषयावर मुंबई विद्यापीठातून पीएच.डी. प्राप्त केली आहे. याबरोबरच त्यांनी अनेक शोधनिबंध प्रसिद्ध केले असून लघुशोध प्रबंधाचे कामही पूर्ण केले आहे. विद्यापीठ पातळीवरील बी.ए. व एम. ए. परीक्षांच्या समितीच्या कार्याध्यक्ष तसेच नियंत्रक म्हणून काम पाहिले आहे. त्याचबरोबर बी.ए., एम.ए. या पदवी अभ्यासक्रम समिती सदस्य म्हणूनही त्या सक्रिय होत्या. सध्या विद्या प्रभू या 'कोकण इतिहास परिषदे'च्या सचिव आहेत.

संभाषित

संदर्भ देण्याविषयीच्या मार्गदर्शक सूचना

'संभाषण' मासिकासाठी शोधनिबंध लिहिताना शोधनिबंधकाराने **In Text parenthetical Author-Date citation** या संदर्भ पद्धतीचा अवलंब करणे अनिवार्य आहे.

In Text parenthetical Author-Date Citation ही संदर्भ देण्याची अधिक सुटसुटीत पद्धत आहे. या पद्धतीनुसार प्रत्यक्ष लेखातील मजकुरामध्ये वा विवेचनामध्ये संदर्भांचे आधार देणे अभिप्रेत असते. या पद्धतीने संदर्भ देताना लेखकाचे आडनाव, संदर्भग्रंथाचे प्रकाशनवर्ष आणि उद्धृत संदर्भाचा पृष्ठ क्रमांक नोंदविणे आवश्यक असते.
उदाहरणार्थ,
(रेगे २००४ : ७५)
सदर संदर्भग्रंथाविषयीचे अन्य तपशील लेखाच्या शेवटी जोडलेल्या संदर्भांच्या यादीमध्ये समाविष्ट केले जातात.
उदाहरणार्थ,
रेगे, मे. पुं. (२००४) **:** *विवेकवाद, विज्ञान आणि श्रद्धा,* लोकवाङ्मय गृह**,** मुंबई.

शोधनिबंधाच्या शेवटी संदर्भसाधने नमूद करताना मराठी आणि इंग्रजी भाषेतील संदर्भांची स्वतंत्र नोंद करावी. तसेच ही माहिती देताना ग्रंथ (स्वतंत्र, संपादित इत्यादी), नियतकालिक, वर्तमानपत्र, अप्रकाशित प्रबंध, प्रबंधिका, संकेतस्थळ आणि समाजमाध्यम हा क्रम पाळावा.

संदर्भ देताना ग्रंथकाराच्या,/संपादकाच्या आडनावाने प्रारंभ करून आडनावानुक्रमे नोंद करणे आवश्यक आहे.
उदाहरणार्थ,
मतकरी, रत्नाकर (१९८३) : *स्पर्श अमृताचा*, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई.
मनोहर, श्याम (१९८३) : *हे ईश्वरराव...हे पुरुषोत्तमराव...*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

एकाच लेखकाच्या एकाहून अधिक पुस्तकांचे संदर्भ येत असतील तर वर्षानुक्रम पाळावा.
उदाहरणार्थ,
नेमाडे, भालचंद्र (१९८७) : *साहित्याची भाषा*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद .
नेमाडे, भालचंद्र (१९९०) : *टीकास्वयंवर*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

एका लेखकाच्या एकाच वर्षातील एकाहून अधिक ग्रंथांचा, लेखांचा संदर्भ येत असेल तर पुढीलप्रमाणे लिहावे.

उदाहरणार्थ,

पाटील, गंगाधर (१९९१ अ) : 'चिन्हमीमांसा', *अनुष्टुभ*, मार्च –एप्रिल, पृ. ३-६.

पाटील, गंगाधर (१९९१ आ) : 'कथनमीमांसा', *अनुष्टुभ*, दिवाळी अंक, पृ. ८६ -१२७.

एकाच साधनाचा संदर्भ लागोपाठ येतो तेव्हा 'तत्रैव' शब्द वापरून पृष्ठ क्रमांक द्यावा. उदाहरणार्थ, लेखात एखाद्या पुस्तकाचा संदर्भ पहिल्यांदा येत असेल तर तो (मुक्तिबोध १९९७ : ३१) अशा पद्धतीने नोंदवावा. हाच संदर्भ सलग आल्यास (तत्रैव, पृ. ४९) असे लिहावे.

लेखाच्या शेवटी देण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या संदर्भसाधनांच्या नोंदींची प्रातिनिधिक उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत. ही उदाहरणे देत असताना IN-TEXT-CITATION पद्धतीनुसार प्रत्यक्ष विवेचनात संदर्भ कसे द्यायचे यासंबंधीचे नमुनेही देण्यात आले आहेत.

ग्रंथ (book)

एक लेखक

रेगे, मे. पुं. (२००४) : *विवेकवाद, विज्ञान आणि श्रद्धा,* लोकवाङ्मय गृह, मुंबई.

IN- TEXT-CITATION

(रेगे २००४ : २५)

दोन लेखक

मालशे, मिलिंद व जोशी अशोक (२००७) : *आधुनिक समीक्षा सिद्धांत*, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ व मौज प्रकाशन गृह, मुंबई.

IN- TEXT-CITATION

(मालशे व जोशी २००७ : ७८)

संपादक (एक)

जोशी, महादेवशास्त्री (संपा.) (१९६२) : *भारतीय संस्कृतिकोश- खंड १*, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे.

IN-TEXT-CITATION

(जोशी १९६२ : ६०)

संपादक (दोन)

भोळे, भा. ल. व बेडकिहाळ किशोर (संपा.) (२००३) : *बदलता महाराष्ट्र*, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा.

IN-TEXT-CITATION

(भोळे व बेडकिहाळ २००३ : ३६)

संपादक (दोनापेक्षा अधिक असल्यास)

नाईक, राजीव व इतर (संपा.) (१९८८) : *रंङ्गनायक,* आविष्कार प्रकाशन, मुंबई.

IN-TEXT-**CITATION**

(नाईक व इतर १९८८ : ५९)

संपादित ग्रंथातील लेखाचा संदर्भ

केळकर, अशोक (१९८१) : 'भाषावैज्ञानिक संशोधनाच्या नव्या दिशा', *भाषा व साहित्य : संशोधन,* वसंत जोशी (संपा.) , महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, पृ. ४७-६८.

IN-TEXT-**CITATION**

(केळकर १९८१ : ५०)

अनुवादित

आंबेडकर, बाबासाहेब (२००५) : दु. आ., *जातिव्यवस्थेचे विध्वंसन*, गौतम शिंदे (अनु.), सुगावा प्रकाशन, पुणे.

IN-TEXT-**CITATION**

(आंबेडकर २००५ : ३८)

संपादित आणि अनुवादित ग्रंथ

बापट, पु. वि. (संपा.) (२००१) : *धम्मपद*, पु. मं. लाड (अनु.), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

IN-TEXT-**CITATION**

(बापट २००१ : १५)

नियतकालिकातील लेख

चौसाळकर, अशोक (२०१९) : 'चिनी क्रांतीची ७० वर्षे', *समाज प्रबोधन पत्रिका,* ऑक्टोबर-डिसेंबर, पृ. ३-११.

पळशीकर, सुहास (२०२०) : 'नागरिकत्वविषयक दुरुस्तीचे वास्तव', *परिवर्तनाचा वाटसरू*, १६ ते २९ फेब्रुवारी, पृ. १८ -२४.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(चौसाळकर २०१९ : ७)

(पळशीकर २०२० : २१)

वर्तमानपत्रातील लेख

नाडकर्णी, कमलाकर (२०२०) : 'होय, बालरंगभूमीही 'प्रायोगिक' होती!', *लोकसत्ता*, २४ मे, पृ. १२.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(नाडकर्णी २०२० : १२)

ग्रंथपरिचय

फडके, अनंत (२०२०) : 'विकासनीतीची कठोर चिकित्सा (पूर्वार्ध)' अच्युत गोडबोले यांच्या *अन्वर्थ -विकासनीती : सर्वनाशाच्या उंबरठ्यावर?* या पुस्तकाचे परीक्षण, *परिवर्तनाचा वाटसरू*, १६ ते २९ फेब्रुवारी, पृ. ४६-४९.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(फडके २०२० : ४८)

मुलाखत

केतकर, कुमार (२०१७) : 'मार्क्स : प्रभाव आणि परिणाम' शेखर देशमुख (मुलाखतकार), *साधना*, मे, पृ. २२-२३.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(केतकर २०१७ : २२)

भाषण

दरेकर, प्रविण (२०१४) : 'चांगल्या शैक्षणिक धोरणाची राज्याला आवश्यकता आहे!', *विधिमंडळातील राजगर्जना,* नवता प्रकाशन, मुंबई, पृ. ५४-५७.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(दरेकर २०१४ : ५५)

अप्रकाशित प्रबंध आणि प्रबंधिका

नाईक, कृष्णा बाबली (२०१६) : 'रत्नाकर मतकरींच्या गूढकथा : स्वरूप आणि अभ्यास', अप्रकाशित प्रबंध, मुंबई विद्यापीठ.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(नाईक २०१६ : ८७)

वेबसाईट संदर्भ

संकेतस्थळावरील परीक्षण

आळवेकर, एकनाथ (२०१८) : ‘रिंगाण **:** उत्क्रांतीची नवी दिशा देणारी कादंबरी’, पीडीएफ.

http://vivekresearchjournal.org/current_issue.html

(संकेतस्थळाला भेट २७ फेब्रुवारी २०१९)

IN-TEXT-**CITATION**

(आळवेकर २०१८)

संकेतस्थळावरील लेख

कुलकर्णी, हेरंब (२०२०) : ‘शिक्षणाची कक्षा आणि कक्षेचे शिक्षण’

http://herambkulkarniarticles.blogspot.com/2020/01/blog-post_4html?m=1

(संकेतस्थळाला भेट २८ मे २०२०)

IN-TEXT-**CITATION**

(कुलकर्णी २०२०)

संकेतस्थळावरील पुस्तक

मनोहर, यशवंत (२०१२) : *विचारसत्ता*, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर.

http://yashwantmanohar.com/pdf/Bauddha%20Sanskruti%20Ani%20Sah

itya.pdf

(संकेतस्थळाला भेट १५ मे २०२०)

IN-TEXT-**CITATION**

(मनोहर २०१२)

संकेतस्थळावरील वर्तमानपत्र

हेमाडे, श्रीनिवास (२०२०) : ‘परीक्षा - विद्यार्थ्यांची आणि अस्तित्वाची’

https:// www.esakal.com/sampadakiy/shrinivas-hemade-article-about-student-299349

(संकेतस्थळाला भेट ३० मे २०२०)

IN-TEXT-**CITATION**

(हेमाडे २०२०)

समाजमाध्यम

बोरगावे, दीपक (२०२०) : ‘रोमान याकोबसन आणि भाषांतर अभ्यास’

http://www.facebook.com/story.php?story_fbid=18731

संभाषित

अधिष्ठाता, मानव्यविद्याशाखा यांचे कार्यालय,
मुंबई विद्यापीठ, आंबेडकर भवन, कलिना कॅम्पस,
विद्यानगरी, मुंबई – ४०००९८.

© 'संभाषित' या तज्ज्ञपरीक्षित संशोधन-पत्रिकेतील (Peer-Reviewed Research Journal) कोणत्याही मजकुराचे पुनर्मुद्रण पूर्वपरवानगीशिवाय करता येणार नाही.

लेख पुढील ई-पत्त्यावर (Email) पाठवावेत.
editorinchief.sambhashit@mu.ac.in with a cc to
editor.sambhashit@mu.ac.in